# ज्ञान प्रबोधिनी

## निगडी केंद्र

# कार्यवृत्त

## शके १९४४-४५

* संपर्क *

ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय

निगडी, पुणे - ४११ ०४४.

दूरभाष : ०२० - २७१६८०००

Email : info@jpnvnigdi.org / nigdi@jnanaprabodhini.org.

Website : https://jpnvnigdi.org

## ❋ शाळा समिति ❋

| | |
|---|---|
| संचालक | वाच. गिरीशराव बापट |
| कार्यवाह | श्री. सुभाषराव देशपांडे |
| केंद्रप्रमुख व प्राचार्य | श्री. मनोजराव देवळेकर |
| केंद्रव्यवस्थापक, गुरुकुल विभाग प्रमुख | श्री. आदित्य शिंदे |
| केंद्र प्रशासक, पूर्व माध्यमिक विभाग प्रमुख | श्री. शिवराज पिंपुडे |
| शिक्षण समिती अध्यक्ष | डॉ. राजीव रानडे |
| संपर्क प्रमुख | श्री. ज्ञानेश्वर सावंत |
| अर्थ कार्यालय प्रमुख | सौ. मधुराताई देव |
| पर्यवेक्षक | श्री. सुधीर कुलकर्णी |
| पर्यवेक्षिका : माध्यमिक इंग्रजी | सौ. कल्याणीताई पटवर्धन |
| मुख्याध्यापिका : प्राथमिक गट १ (१ली, २री) | सौ. मीनाताई दीक्षित |
| मुख्याध्यापिका : प्राथमिक गट २ (३री, ४थी) | सौ. सुवर्णाताई विसे |
| प्राथमिक शिक्षण समन्वयक | सौ. आरतीताई बिजुटकर |
| विभागप्रमुख : पूर्वप्राथमिक | सौ. वैशालीताई तळेगांवकर |
| क्रीडाकुल | श्री. मनोजराव देवळेकर |
| अनुभव शिक्षण मार्गदर्शक, संगणक वि. प्रमुख | सौ. अनुजाताई भंडारी |
| मुक्तिसोपान | सौ. शीतलताई कापशीकर |
| अटल धडपडालय | श्री. कल्पेश कोठाळे |
| जैवतंत्रज्ञान विभाग | सौ. संगीताताई कुलकर्णी |
| संवेद विभाग | सौ. अस्मिताताई बारसावडे |

## मंत्रणा समिती

मा. वाच. गिरीश बापट     मा. श्री. यशवंत लिमये
मा. श्री. ज्ञानेश्वर सावंत     मा. श्री. मनोज देवळेकर

# अनुक्रमणिका


**औपचारिक शिक्षण विभाग**
पूर्व प्राथमिक विभाग
प्राथमिक गट १
प्राथमिक गट २
पूर्व माध्यमिक विभाग
माध्यमिक - मराठी विभाग
माध्यमिक - इंग्रजी विभाग
गुरुकुल विभाग
क्रीडाकुल विभाग

**अनुभव लेख**
रौप्य महोत्सव सांगता
सहलीची मजा
पालक मेळावा
प्रेरणासेतू
संयम प्रकल्प

**अभ्यास पर्व**
वार्षिक उपक्रम
अभ्यासोनी अनुभवावे
अभ्यासपर्व
काश्मीर दौरा

**अनुभव शिक्षण विभाग**
संगणक
मुक्तीसोपान
अटल धडपडालय
कार्यालय
ग्रंथालय

**अभिरुची**
अनुभव
संवादिनी
हस्तकला अभिरुची

**अनुभव**
त्यास शिक्षक म्हणे
नाटकाच्या गोष्टीची गोष्ट
ध्वनिपुस्तीका

**संशोधन विभाग**
जैवतंत्रज्ञान
संवेद

गणेशोत्सव अनुभव

**अनुभव लेख** - पांडे काका

**अनुभव लेख**
योग प्रशिक्षण वर्ग
गुरुकुल स्नेहसंमेलन

**निगडी केंद्र**
**आचार्यव्रत**

**संघटन विभाग**
युवक विभाग
युवती विभाग
पालक महासंघ
स्नातक संघ आणि मेडिकल SPG

**अनुभव**
पत्रलेखन

**विस्तार केंद्रे**
मातृमंदिर विश्वस्त संस्था
चिपळूण विस्तार केंद्र

**क्रीडाकुल रौप्य महोत्सव वर्ष**
क्रीडाकुल रौप्य महोत्सव
खेळाडू विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र

**अनुभव**
अतिथी देवोभव
देणगीदारांची यादी



**प्रकाशक** : प्रशासक, ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र
**संपादन मंडळ** : सौ. वृंदा गाडगीळ, सौ. अनघा कुलकर्णी, सौ. स्वाती मोरे, सौ. सुलभा पाचभाई, सौ. राजश्री मराठे, श्री. नागेश जोशी
**मुद्रक** : प्रबोध संपदा १२४८, शुक्रवार पेठ, सुभाष नगर, गल्ली क्र. ५, पुणे - ४११०३०
**प्रकाशन दिनांक**: सौर २४ श्रावण शके १९४५ १५ ऑगस्ट २०२३

# प्रस्तावना

प्रबोधिनीमध्ये आपण उद्याचा समाज घडविणारे भावी नागरिक घडविण्यासाठी आजच्या या विद्यार्थ्यांना शिक्षण देत असतो.यासाठी रोजच्या प्रार्थनेत 'अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो', असा मंत्र आपण म्हणत असतो. 'देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' ही संधी पाहून यंदा अभ्यास पर्व हा उपक्रम आपण यशस्वीरीत्या साजरा केला. ज्यांना इतिहास घडवायचा असतो, त्यांनी त्यांचा इतिहास विसरून चालत नाही. या पंक्तीला अनुसरून यामध्ये स्वातंत्र्योत्तर भारताचा अभ्यास अनेक अंगांनी करण्यात आला. विद्यार्थी, अध्यापक, पालक, युवक, युवती आणि स्नातक अशा सर्वांचा समावेश असलेल्या ७५ अभ्यासगटातून सुमारे ७५० जणांनी त्यांच्या त्यांच्या विषयांचा सामुहिक अभ्यासाचा पराक्रमाने देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला.

शिक्षण, शेती, उद्योग, संरक्षण, संशोधन इत्यादी विविध १२ मुख्य विषयांतील ७५ उपविषयांचा अभ्यास या ७५ गटांनी केला. त्या त्या विषयात स्वातंत्र्योत्तर झालेली प्रगती, महत्त्वाच्या व्यक्ती-संस्था यांचे कार्य, त्या विषयांतील आव्हाने याचा सविस्तर अभ्यास गटांनी केला. संस्थांना भेटी देऊन प्रत्यक्ष समाजात मिसळून विषयाची माहिति घेतली. आजचे प्रश्न - उद्याची आव्हाने यावर मान्यवरांकडून मार्गदर्शन घेतले.

गटात अभ्यास करणे, पुस्तकाच्या पलीकडेही अभ्यास करायचा असतो, अभ्यासातही सामूहिक पराक्रम करायचा असतो, पालक-शिक्षक-विद्यार्थी असा विविध वयोगटात एकत्रित अभ्यास करता येतो असे अनेक संस्कार या उपक्रमांतून सर्वांवर झाले. विद्यालयातील ९, १० वीचे विद्यार्थी यामध्ये प्राधान्याने सहभागी होते. अभ्यास देशस्थितीचा... म्हणजे काय आणि तो कसा करायचा असतो याचे शिक्षण हे यंदाच्या या उपक्रमाचे फलित आहे. डॉ. अजितराव कानिटकर, पुणे प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते यांचे वर्षभर निगडीत सर्व अध्यापकांना अभ्यास गटांना यासाठी मार्गदर्शन मिळाले.

यंदाच्या वर्षीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, केंद्रातील क्रीडाकुल विभागाला २५ वर्षे पूर्ण झाली. पालक मेळावे, माजी विद्यार्थी मेळावे, निगडीतील भव्य तर प्रबोधिनीच्या पुणे, हराळी, डोंबिवली, चिखली केंद्रांवर जाऊन केलेली क्रीडा प्रात्यक्षिके आणि आयुष मंत्रालयाने मान्यता प्राप्त अशा राष्ट्रीय स्तरावरील 'क्रीडा आयुर्वेद परिषदेचे आयोजन इ. नाविन्यपूर्ण उपक्रमांनी रौप्य महोत्सव साजरा झाला. या परिषदेमध्ये क्रीडाकुलमधील प्रशिक्षक आणि आरोग्य-मानस तज्ज्ञांनी लिहिलेल्या तेहेतीस लघु शोध निबंधांच्या संकलनाचे पुस्तक प्रकाशित झाले. ६ राज्यांमधील सुमारे २५० वैद्य आणि क्रीडा प्रशिक्षकांनी यात सहभाग घेतला. क्रीडाकुल संकल्पनांची राष्ट्रीय स्तरावर मांडणी झाली हे विशेष घडले.

गुरुकुलाची मातृभूमी परिचय शिबिरे, अभिरुची योजना, पालक संघ उपक्रम, अनुभव शिक्षणाचे विविध उपक्रम, १० वी शालांत तसेच शासकीय शिष्यवृत्ती आणि चित्रकला अशा परीक्षांमधील यश या नित्याच्या गोष्टीही उत्तमतेने झाल्या. नित्य नूतन सुचणे आणि करणे हे तर प्रबोधिनीपण ! यंदा नव्याने मुक्ती सोपान संगीत विभागाने ध्वनिपुस्तिका प्रकाशित केली, केंद्रातील नऊ अध्यापकांनी आचार्य व्रताचा स्वीकार केला, अभ्यास पर्वच्या एका गटाने काश्मीर दौरा केला. या सगळ्याचे सविस्तर वृत्त येथे सदर केले आहे.

यंदा वृत्ताचे स्वरूप बदलून लेखांच्या स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून केंद्राचे कार्य अधिक रंजकपणे पोहोचवावे हीच इच्छा. ते वाचून या कामाला आपला सदैव पाठिंबा-प्रोत्साहन मिळावे, हीच अपेक्षा !

कळावे,

आपला,

**मनोज देवळेकर,**

क्रेंद्रप्रमुख

औपचारिक शिक्षण विभाग

# पूर्व प्राथमिक विभाग

## बालसभा

बाल शिक्षण, म्हणजे हसत खेळत आनंददायी शिक्षण हे जणू समीकरणच आहे. आणि या आनंदाला उधाण आणणारा विशेष कार्यक्रम यावर्षी व्यक्तिमत्त्व विकसन या खात्यांतर्गत झाला. तो म्हणजे बालसभा. दर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात शिशुवर्ग व बालवर्ग एकत्र मिळून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिनाभरात ज्या मुलांचे वाढदिवस झाले त्यांचे एकत्रित वाढदिवस साजरे केले. मुलांचे औक्षण करून उपासना करण्यात आली. त्याचबरोबर संस्कृत व मराठी गीतांमधून मुलांना शुभेच्छा देण्यात आल्या. मुलांसाठी अध्यापकांनी गोष्टीचे नाट्यीकरण करून दाखवले. यात काही सण-उत्सवांचे महत्त्व सांगणाऱ्या गोष्टी, पपेट शो, संगीतावरील मुक्त हालचाली, खाऊ अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. अभ्यासक्रमातील गोष्टींचा यामध्ये सहभाग होता तर मुलांच्या श्लोक, गायन, वादन, अशा काही सुप्त गुणांना येथे वाव देण्यात आला. यामध्ये काही मुलांनी तबला, पखवाज, पेटी अशी वाद्य वाजवून दाखवली तर काही मुलांनी पोवाडा, गवळण यांसारखे गाण्यांच्या प्रकारांचे सादरीकरण केले. यात बालदिनानिमित्त ही बालसभा संध्याकाळी ठेवून बालभवनमध्ये उभारलेल्या पालखेडच्या लढाईच्या प्रतिकृती आणि पालखेडच्या लढाईचे प्रत्यक्ष दर्शन ध्वनिचित्रफितीतून दाखवले. याबरोबरच मुलांशी गप्पागोष्टी, मैदानावरील संध्याकाळचे आकाशदर्शन यांचाही यात समावेश होता.

मुलांना आंतरिक गुणांची ओळख व्हावी, आपल्या मित्रमैत्रिणींच्या आनंदात सहभागी होता यावे आणि विविध गुणांचा अनुभव एकाच व्यासपीठावर उपलब्ध व्हावा हे या बालसभांमागचे मुख्य उद्दिष्ट होते. आम्हीही काहीतरी करू शकतो या उत्साहाने मुलांनी अनेक स्पर्धांमध्ये यश मिळवले आणि स्नेहसंमेलनात उत्साहाने सहभाग नोंदवला हे या उद्दिष्टांचे फलित मानायला हवे.

**अभिनंदन** – अलाईव्ह आयोजित चला चिऊ वाचवू या अभियानांतर्गत चित्रकला स्पर्धेमध्ये पूर्व प्राथमिक विभागातील भरत गटातील चि. अद्वैत नितीन बोडके याला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

बालसभेत मुलांचे साजरे केलेले वाढदिवस मुलांच्या मनावर एका चांगल्या संस्कारांची रुजवणूक करत होते. याचा प्रत्यय मुलांच्या घरीसुद्धा अशाच प्रकारे वाढदिवस साजरा झालेला बघून आला.

**शैक्षणिक साधन साहित्य स्पर्धा : रोज नवे ज्ञान दिवे चेतवायचे !**

या काव्यपंक्तीनुसार विभागातील शिक्षक रोज नवा विचार करत असतात. विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट आणि दृढ व्हाव्यात यासाठी सतत नवनवीन योजना आणि साधनांचा उपयोग करावा असे सर्वच शिक्षकांना वाटत असते. दर वर्षी या संकल्पना स्पष्टीकरणासाठी नवे प्रश्न उभे राहतात तशी नव्या विचारांना संधी मिळत असते. या संधीचा फायदा घेऊन विभागातील शिक्षकांनी अनेक शैक्षणिक साधनांची निर्मिती यावर्षी केली. शैक्षणिक गुणवत्ता या खात्यांतर्गत शैक्षणिक साधन साहित्य स्पर्धेचे आयोजन केले होते. साधनांच्या निर्मितीत आणि उपयोजनात उत्तमता यावी या हेतूने या उपक्रमाला स्पर्धेचे स्वरूप दिलेले होते. उपक्रम मुलांना शिकवत असताना साधन साहित्य वापरले जातच होते परंतु काही संकल्पना दृढ होण्याकरिता नवीन साधन साहित्याची गरज वाटू लागली. हाच विचार मनात ठेऊन आपली कल्पकता वापरून शिक्षकांनी साहित्य निर्मिती केली. साहित्यामध्ये वाचन, गणन, बौद्धिक खेळ, विज्ञान, शारीरिक, भाषा या विषयांचा समावेश होता. फक्त स्पर्धा हा हेतू समोर नसल्यानेच सर्व शिक्षकांनी मिळून याची एक छोटी मांडणी स्पर्धेपूर्वी केली आणि त्यात एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करून आवश्यक तिथे भर, बदल दुरुस्ती करून त्याचे सुंदर सादरीकरण स्पर्धेदिवशी केले. स्पर्धेला परीक्षक म्हणून प्राथमिक गट क्रमांक दोनच्या विभागप्रमुख सौ. सुवर्णाताई विसे आणि संगणक विभागाच्या प्रमुख अनुजाताई भंडारी उपस्थित होत्या. परीक्षकांनी सर्वांचे साधन साहित्य पाहून खूप कौतुक केले, शिवाय या उपक्रमाला प्रोत्साहनही दिले. हा उपक्रम इथेच थांबला नाही तर नवनिर्मित साधन साहित्याचा वापर सुरू व्हावा यासाठी त्याची रचना अभ्यासक्रमातही समाविष्ट केली. या उपक्रमाला वरिष्ठांच्या कौतुकाची थाप तर मिळालीच शिवाय विद्यार्थ्यांच्या अध्ययन गतीवर होणारा सकारात्मक बदल आम्हाला नवी उर्जा देऊन गेला.

## विभागाचे वर्षभराचे उपक्रम

- **दिंडी**– विभागातील सर्व छोट्या वारकऱ्यांनी शुक्रवार दिनांक ८जुलै २०२२ रोजी दिंडी सोहळा लहान गट आणि मोठा गट अशा दोन गटात साजरा केला. कार्यक्रमाच्या दिवशी सगळे बालचमू वारकरी, थोर संत, विठ्ठल रुक्मिणी अशा विविध वेषभूषेत कार्यक्रमासाठी उपस्थित होते. गजर करत धून म्हणत होते. प्रत्येक वर्गाने दिंडीची छोटीशी फेरी केली. मुलांनी रिंगण घालत विठूनामाचा गजर

करत धून म्हणत टिपऱ्या खेळत, फुगड्या घालत सोहळा पूर्ण केला. यात मुलांना संतांची छायाचित्रे दाखवून त्यांची प्राथमिक ओळख करून दिली.

* **दीप पूजन**– दीप अमावस्येचे औचित्य साधून गुरूवार दिनांक २८ जुलै २०२२ रोजी बालभवन येथे दीपपूजनाचा कार्यक्रम शाळेच्या वेळेतच साजरा झाला. मुलांना विविध आकाराचे आणि विविध उपयोगाचे दिवे प्रत्यक्ष व ppt द्वारे दाखवले. मुलांनी आणलेल्या दिव्यांची पूजा केली आणि मुलांनी शुभंकरोति कल्याणम् हा श्लोक म्हटला. वीज, पाणी, अन्न वाया घालू नये असे सांगणारी गोष्ट मुलांना सांगितली. मुलांनी क्ले पासून विविध प्रकारचे दिवे बनवले. लहान गटातील मुलांनी दिव्याची चित्रे रंगवली.

* **मातृदिन व पिठोरी अमावस्या** – दर महिन्याप्रमाणे या महिन्यातील बालसभा कार्यक्रम हा वेगळा म्हणजेच पिठोरी अमावस्येच्या निमित्ताने मातृदिन हा विषय घेऊन शुक्रवार दिनांक २६ ऑगस्ट २०२२ रोजी विभागात साजरा झाला. बालवर्गाच्या बालसभेला नाट्यछटेच्या अंतिम फेरीसाठी ज्यांची निवड झाली त्या विद्यार्थ्यांनी आपापल्या नाट्यछटेचे सादरीकरण केले. बालवर्गात पूर्व प्राथमिक विभागाच्या विभागप्रमुख मा. वैशालीताई यांना औक्षण करून व शिशुवर्गातील मुलांनी आपल्या आई–बाबांचे औक्षण करून त्यांना नमस्कार केला. मा. वैशालीताईंनी प्रत्येक वर्गात जाऊन उपस्थित पालकांचे आभार मानून मातृदिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच मुलांशी संवाद साधून मातृदिन का? व कसा साजरा करावा याचे महत्त्व सांगितले. तसेच आपल्या आईप्रमाणे धरणीमाता, भारतमाता ही आपली माताच आहे हेही मुलांना सांगितले. 'रोज सकाळी उठल्यावर देवाला आणि आईबाबांना नमस्कार करू' असा संकल्प मुलांनी केला.

* **भोंडला (पाटी पूजन)**– बुधवार दिनांक २८ सप्टेंबर २०२२ पूर्व प्राथमिक विभाग बालभवन येथे शिशुवर्ग, Jr.kg आणि बालवर्ग Sr.kg या मुलांचा एकत्रित भोंडला झाला. मुलांना प्रत्यक्ष वासुदेव भेटायला आला. देवीचे श्लोक घेऊन देवीची आणि त्यानंतर हत्तीची पूजा केली. भोंडल्याच्या गाण्यावर ताल धरून सर्व वर्गांनी फेर धरला. नवरात्रीची छानशी गोष्ट सांगून त्यातून नवरात्र, दसरा या सणाचे महत्त्व मुलांना सांगितले. दुसरे दिवशी वर्गवार पाटीपूजन झाले. यात आपल्याला ज्ञान मिळवण्यास मदत करणाऱ्या पाटी पुस्तक वह्या यांची मुलांनी पूजा केली. सर्व साहित्याची काळजी घेऊन त्यांच्याप्रती

**अभिनंदन** – मार्च २०२३ मध्ये महिला दिनानिमित्त शिवशंभो फौंडेशन आयोजित सत्कार समारंभात अध्यापिका सौ. वृंदा मकरंद गाडगीळ यांना कर्करोग मदत कार्यासाठी सुषमा स्वराज पुरस्कार प्राप्त झाला.

कृतज्ञता का व्यक्त करायची याची कारणे मुलांना समजावून सांगितली.

* **शैक्षणिक सहल** –शिशुवर्गातील मुलांची शैक्षणिक सहल शाळेच्या जवळील उद्यानात तर बालवर्गाची सहल कात्रज येथील उद्यानात नेण्यात आली. शिशुगटाला एकत्रच सहलीला नेले; मात्र बालवर्गातील मुलांची सहल तीन टप्प्यात नेण्याचा वेगळा प्रयोग यावर्षी करून पाहिला.

* **स्नेहसंमेलन** – मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, सभाधीटपणा वाढावा हे उद्दिष्ट समोर ठेवून स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. शिशुवर्गासाठी निसर्ग तर बालवर्गासाठी कृष्ण हा विषय ठरवला. त्याप्रमाणे प्रत्येक वर्गातील मुलांचे शिक्षकांनी सादरीकरण बसवले. विभागातील १००% मुलांचा यात सहभाग होता. या विषयांवर विविध नृत्ये आणि काही नाटुकल्यांचाही समावेश होता.

* **पालक समिती क्षेत्रभेट** –दरवर्षी विभागात पालक समिती सदस्य नव्याने शाळेची ओळख करून घेत असतात. शाळेबरोबरच परिसरातील अनेक गोष्टींची ओळख व त्यानिमित्ताने पालकशिक्षक एकत्र येऊन गटबांधणी या उद्देशाने यावर्षी क्षेत्रभेटींचे आयोजन केले होते. वर्षभरात एकूण चार क्षेत्रभेटी झाल्या. यात निगडी पोलीस स्टेशन, अग्निशमन केंद्र, श्री गिरीश प्रभुणे यांचे गुरुकुलम्, दूध डेअरी, चाकण इ. क्षेत्रभेटींचा समावेश होता.

  सर्वच क्षेत्रभेटींमधून अनेक नव्या गोष्टी, प्रक्रिया, कामकाज यांची माहिती मिळाली. परिसरातील नागरिक म्हणून आपले प्रत्येकाचे योगदान असावे याचीही जाणीव झाली.

  यावर्षी विभागात नव्याने शालाबाह्य स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यात मनाचे श्लोक पाठांतर आणि चिन्मय मिशन गीतापाठांतर या स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी भाग घेऊन अंतिम फेरीपर्यंत मजल मारली.

***

**अभिनंदन** – SP एंटरटेनमेंट न्यूज चॅनल व महाराष्ट्र राज्य कला संस्कृती व पर्यटन समिती मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय भारतीय संविधान जागृती आणि स्त्री शक्ती शिक्षक रत्न सन्मान पुरस्कार पूर्व प्राथमिक विभागातील सौ. सुरेखा क्षीरसागर यांना प्राप्त झाला.

दि. १८ जानेवारी २०२३ रोजी शारदा बालक विहार पुणे येथे झालेल्या आंतरशालेय स्पर्धेमध्ये पूर्व प्राथमिक विभागातील सौ. सुरेखा क्षीरसागर यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाला.

## पालक प्रबोधन वर्ग

| विषय | वक्ते | दिनांक | उपस्थिती |
|---|---|---|---|
| पालकांची शिक्षणातील भूमिका | मा. मनोजराव देवळेकर | ३० जुलै २०२२ | २०० |
| सत्य संकल्प व्रत | आ. संचालक वाच.गिरीशराव बापट | ३०ऑगस्ट २०२२ | |
| मुलांशी संवाद कसा साधावा? | मा.अंजलीताई भाडळे | १ ऑक्टोंबर २०२२ | १६० |
| मुलांचे आरोग्य व्याख्यान की ? परिसंवाद निश्चित करावा. | डॉ.मेधा देवळेकर, डॉ. प्रतिमा काळे., डॉ. चंद्रशेखर देशमुख, डॉ.राव, डॉ. केसरकर, डॉ.जुई, डॉ.पराग पाटील | १५ ऑक्टोंबर २०२२ | १९० |
| मुलांचा आहार | डॉ. सुनील गोडबोले. | २६ नोव्हेंबर २०२२ | १९० |
| गाणी गोष्टीतून भाषाविकास | मा. तृप्तीताई कुलकर्णी | ११ फेब्रुवारी २०२३ | १७० |

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२२ इयत्ता पाचवी मध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे. यात विद्यालयात प्रथम पाच क्रमांकांची नावे खालील प्रमाणे.**

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | एकून गुण % | जिल्ह्यातील प्राप्त क्र. | विद्यालयातील प्राप्त क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | चि. आदिनाथ तारकुंडे | ९१.२७% | २४ | पहिला |
| २. | चि.अमेय पानसरे | ८८.५९% | ४९ | दुसरा |
| ३. | कु. स्वरांजली आहेर | ८७.२४% | ६८ | तिसरा |
| ४. | चि. नील डुंबरे | ८६.५७% | ७८ | चौथा |
| ५. | चि. श्लोक चव्हाण | % | १११ | पाचवा |

**शिष्यवृत्ती परीक्षेतील यश प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| चि. विश्वराज निघोट | जिल्हास्तरीय | २०४ वा |
| चि.श्री तारळेकर | जिल्हास्तरीय | २७२ वा |
| चि.ध्रुव एरंडे | जिल्हास्तरीय | २८० वा |
| चि. वेद जयतीर्थ | जिल्हास्तरीय | २९२ वा |

| | | |
|---|---|---|
| कु. तेजस्विनी हडप | जिल्हास्तरीय | ३७४ वी |
| कु. नंदिनी कोतेवार | जिल्हास्तरीय | ३७७ वी |
| कु. श्रद्धा चौधरी | जिल्हास्तरीय | ४२३ वी |
| कु. आर्या माने | जिल्हास्तरीय | ५०१ वी |

# प्राथमिक विभाग
# गट १

## उपक्रम : - कोजागिरी पौर्णिमा

*शरदाचे चांदणे आणि कोजागिरीची रात्र*
*चंद्राच्या मंद प्रकाशात साजरी करू एकत्र*

आकाशगंगेबद्दल जसं कुतूहल बालकांमध्ये तसं मोठ्यांमध्येही असतेच. वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर ही आकाशगंगा चंद्र आणि तारे आपल्याला कायम खुणावत आले आहेत. असा हा चंद्र, चमचमणारे तारे याची ओळख मुलांना या वयापासून झाली तर ग्रहगोलांशी मैत्री करणं सोपं होईल असा विचार मनात आला आणि त्यातूनच मुलांच्या भावविश्वातली कोजागिरी पौर्णिमा साकार झाली.

मुलांना पारंपरिक खेळ व गाणी म्हणत भोंडला खेळता यावा, समवयस्क मुलांसोबत आकाश दर्शन व संध्याकाळच्या शाळेचा अनुभव मिळावा, कोजागिरी पौर्णिमेची माहिती मिळावी तसेच मसाला दुधाचा आस्वाद घेता यावा अशा विविध उद्देशाने या वर्षी पहिल्यांदाच सांस्कृतिक खात्यांतर्गत प्राथमिक विभागात कोजागिरी पौर्णिमेच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याची पूर्व तयारी म्हणून घटस्थापनेपासूनच रोज सकाळी परिपाठाच्या वेळेस भोंडल्याची गाणी, गरबा नृत्य व शक्तिमंत्राचा सराव होत होता.

अतिशय उत्साहाने मुले कार्यक्रमास उपस्थित होती. वर्गशः स्वतंत्र गोल करून हत्तीच्या प्रतिमेचे पूजन करुन, गोलावर भोंडल्याची गाणी म्हणत भोंडला खेळला. भोंडल्याची गाणी ही समाजप्रबोधन करणारी होती. मुलांना कोजागिरीची माहिती सोप्या शब्दांत सांगत चंद्राची गोष्टही सांगितली. मुलांनी चंद्रावर आधारित अनेक गाण्यांवर ताल धरत नाचण्याचा आनंद मिळवला. 'या वाऱ्याच्या बसुनी विमानी सहल करूया गगनाची' हे फक्त गाण्यापुरतं मर्यादित न ठेवता रोज आकाशात दिसणाऱ्या चंद्राच्या विविध कला, तसेच आकाशाचे बदलणारे वेगवेगळे रंग, ढगांचे निरनिराळे आकार अशा अनेक गोष्टींवर आधारित चित्रांची पीपीटी (PPT) दाखवत मुलांना विस्तीर्ण गगनाची लहानशी सफर घडवून आणली. प्रत्येक गटातील दोन असे एकूण सोळा पालक प्रतिनिधी आणि एकूण ३३० विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

प्रत्यक्ष कार्यक्रम जरी एक दिवसाचा असला तरी त्यानंतर मुलांना आकाश निरीक्षणाची सवय लागली. वर्गात मुले त्याविषयी बोलू लागली वर्गाच्या व्हाट्सअप ग्रुपवर आकाशातील या वेगळ्यावेगळ्या छटांचे

फोटो पालक पाठवू लागले. कोजागिरीनंतर लगेचच झालेल्या शुक्र चंद्र युती विषयी मुलांनी माहिती मिळवली रोज आकाशातील चंद्र व शुक्राचे अंतर वाढले कमी झाले याविषयी मुलं वर्गात चर्चा करू लागली.

## उपक्रम : - विना दप्तर शाळा

*हसऱ्या फुलांचा बाग जसा आनंदी,*

*ही तशीच शाळा मुले इथे स्वच्छंदी।*

यावर्षी विभागात दर शनिवारी विनादप्तर शाळा असे नियोजन ठरवले होते. चैतन्यमय आणि उत्साहवर्धक वातावरणात मुलांचे शिक्षण व्हावे, मुलांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा, परिसरातील प्रकल्पांना भेटी देऊन माहिती मिळवावी यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले होते.

दर शनिवारी विद्यार्थ्यांसाठी विनादप्तर शाळा या माध्यमातून मातीकाम, अभिनयगीत, गोष्ट, कारक कौशल्याचे खेळ, प्रतिभा विकसनाचे वेगवेगळे खेळ, विज्ञान प्रयोग, क्षेत्रभेटी आदी उपक्रम राबविण्यात आले. या खेळाच्या वेळोवेळी नोंदी ठेवल्या. या नोंदींमधून मुलांबाबत अनेक निरीक्षण समोर आली.

द्वितीय सत्रामध्ये थोडासा बदल करून कारककौशल्य विकसनासाठी हात-डोळे, पाय-डोळे, हात-पाय यातील समन्वय साधणारे २५ खेळ घेण्यात आले. श्रवण कौशल्यावर आधारित ३० खेळ घेण्यात आले. यामुळे कवायत, संगीतावर हालचाली आणि सामूहिक व्यायाम प्रकार यामुळे सांघिक कृती करण्याचा आनंद मुलांना मिळाला.

थोडक्यात दप्तरांच्या ओझ्यातून मुक्तता होऊन एक दिवस मुलांना मनासारखं वावरण्याची, दर शनिवारी शाळेत आनंदाने यायची सवय लागली आणि त्यामुळे उपस्थितीचे प्रमाणदेखील वाढले असे दिसून आले. अनेक शारीरिक, बौद्धिक खेळांमुळे मुलांची कल्पनाशक्ती वाढीस लागली तसेच बहुदिश विचार करण्याची संधी उपलब्ध झाली.

'ही आवडते मज मनापासूनी शाळा, लाविते लळा जशी माउली बाळा', विना दप्तराची ही एकदिवसीय शाळा मुलांना आणि पालकांना नक्कीच भावली आणि त्यामुळे कार्यसंकल्पात ठरवलेली विना दप्तर शाळा हा उपक्रम यशस्वी झाला असे म्हणता येईल.

## विभागाचे वर्षभराचे उपक्रम

बुधवार दिनांक १५ जून २०२२ रोजी प्राथमिक विभागाची शाळा सुरु झाली. शाळेत आल्याआल्या सभागृहामध्ये एकत्रित परिपाठ घेतला.

**अभिनंदन** - समर्थ भारत अभियान अंतर्गत आंतरशालेय मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धेत प्राथमिक गट क्र. १ मधील इयत्ता २ री राजहंस गटातील कु. प्रांजल संदिप आर्णिकर हिला तिसरा क्रमांक प्राप्त झाला.

वर्गशः शिक्षकांची मुलांना ओळख करून दिली. त्याचप्रमाणे ज्या मुलांचा वाढदिवस होता त्यांना शुभेच्छा दिल्या. वर्गामध्ये ताईंनी गाणी, गोष्टी इ घेतले. ताईंनी मुलांशी त्यांच्या सुट्टीतील गमतीजमती विषयी गप्पा मारल्या. शाळेकडून विद्यार्थ्यांना पौष्टिक खाऊ देण्यात आला. मुलांसाठी व पालकांसाठी सजावटीसोबतच विभागात सेल्फी पॉईंट उभारण्यात आला होता तिथे पालकांनी - मुलांनी फोटो काढून मनमुराद आनंद लुटला.

**✻ बालदिंडी कार्यक्रम –** शुक्रवार ८ जुलै २०२२ रोजी इ पहिली व दुसरी प्राथमिक विभागात 'बालदिंडी सोहळा' आयोजित करण्यात आला. सर्व विद्यार्थी संतांच्या व वारकऱ्यांच्या वेशभूषेत आले होते. पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी वृक्ष दिंडी आणि इ.दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ दिंडी आयोजित केली होती. पहिलीच्या मुलांनी स्वतः बी पेरुन रोप कसे तयार होते याचे निरीक्षण केले. काही मुलांनी झाडांविषयीची घोषवाक्य तयार करून आणली होती.

दुसरीच्या मुलांसाठी ग्रंथ दिंडी आयोजित केली होती. काही मुलांनी दासबोध, भगवद्गीतेसोबत आणली होती. मुलांनी डोक्यावर छोटे ग्रंथ, पोथ्या घेतल्या होत्या. दुसरीच्या मुलांनी मोठ्या आनंदाने उत्साहाने आणि भक्तिभावाने रिंगण केले. यावेळी टाळांच्या गजरात नामगजर, धून घेण्यात आली. कार्यक्रमासाठी दर्शनदादा कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते.

**✻ राखीपौर्णिमा –** शुक्रवार, दिनांक १२ ऑगस्ट रोजी विभागात राखीपौर्णिमा साजरी करण्यात आली तसेच श्रावणीशुक्रवार निमित्त जिवती पूजन करून विभागातील सर्व मुलांना पुरणाच्या दिव्याने औक्षण करण्यात आले. या कार्यक्रमाला सेवक, पोलीस पालक, स्वच्छता कर्मचारी असे एकूण १५ जण उपस्थित होते. श्रावण महिन्यात येणारे सण, जिवतीचे महत्त्व सोप्या शब्दांत मुलांना समजावून सांगितले.

**✻ गीता जयंती –** बुधवार दिनांक ७ डिसेंबर रोजी विभागात गीताजयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुलांना गीता जयंती आणि श्रीमद्भगवद्गीतेविषयी माहिती सांगितली तसेच सर्व मुलांनी व शिक्षकांनी एकत्रित १२ व्या अध्यायाचे पठण केले.

**अभिनंदन** – श्री विकासभाऊ साने सोशल फाउंडेशन चिखली आयोजित अभंग गायन स्पर्धा अंतिम फेरीत प्राथमिक गट क्र. १ मधील इयत्ता २ री राजहंस गटातील कु.स्वानंदी तांबे हिला उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला.

**अभिनंदन** –मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत प्राथमिक गट क्र १ मधील इयत्ता दुसरी गरुड गटातील कु.अन्विका वायकर हिला ब्राँझपदक मेडल प्राप्त झाले.

## संगणक

संगणक अभिरुचीत घेण्यात आलेल्या सादरीकरण उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी जे सादर केले त्याबद्दल त्या सर्वांचे कौतुक व अभिनंदन. संगणक क्षेत्रात उपलब्ध असलेले विविध उपक्रम आणि नवनवीन तंत्रज्ञान जे आपण रोजच्या जीवनात वापरतो, ते मुलांना जास्त खोलवर आणि सविस्तरपणे अभ्यासण्याची इथे संधी मिळाली. नुसताच अभ्यास नाही तर ते स्वतः वापरून त्याचे उपयोजन कसे करायचे हेही मुलांना शिकता आले. उदाहरणार्थ, आपण जो QR code रोज वापरतो त्याच्या back end ला exactly काय आहे आणि तो कसा वापरला जातो हे विद्यार्थ्यांनी स्वतः शिकून present केले. तसेच काही निगेटिव्ह गोष्टी ज्या सध्या जगात चालू आहेत जसे की hacking .. त्या कशा होतात आणि त्यावर solution काय हेही मुलांना अभ्यासायला मिळाले. याचबरोबर फक्त अभ्यासच नव्हे तर त्यांच्यातील Presentation skills यालाही वाव मिळाला आणि मुलांना स्वतःचे कौशल्य सादर करता आले. दर शनिवारी काही ना काही ॲक्टिव्हिटीज होत असतात हे आम्हाला माहिती होते पण सादरीकरणाच्या दिवशी प्रत्यक्ष बघण्याची संधी मिळाली आणि मुलांची प्रगती बघून खूपच आनंद झाला. याचा मुलांच्या भविष्यासाठी नक्कीच खूप उपयोग होईल अशी खात्री आहे. आपल्या शाळेच्या संगणक विभागाचे व सर्व शिक्षकांचे खूप अभिनंदन व आभार.

**सौ. अर्चना कुलकर्णी**
पालक

## नृत्य

मी याच वर्षी नवीन आले आहे अनुभव अभिरुची काय आहे हे खरंतर मला माहिती नव्हतं. मला खूप सारे विषय दिले त्यातले मी तबला आणि नृत्य असे निवडले आणि मला नृत्य विषय मिळाला, तेव्हा असं वाटलं की काहीतरी आता खूप hip-hop किंवा बॉलीवूड करायला मिळेल. पण तसं काही नाही तर मी खूप चांगलं क्लासिकल करायला शिकले. जे मी कधीच शिकले नव्हते आणि प्रतिक्षाताईने शिकण्यात खूप मदत केली. सुरुवातीला असं वाटलं की काय बोरिंग विषय मिळालाय पण नंतर जसं जसं वेगवेगळ्या राज्यातली वेगवेगळी नृत्य करायला शिकवले. घुमर, जोगवा, भांगडा, गरबा आणि बरंच काही.. हे करता करता असं वाटलं की नृत्य करत राहावं कारण खूप छान पद्धतीने ताई आम्हाला शिकवत होती. आम्ही मस्ती तेवढीच केली आणि डान्सही तेवढाच केला. पुढच्या वर्षीही मला ताईकडून क्लासिकल डान्स शिकायला आवडेल आणि थँक्यू ताई मला हे सगळे शिकवल्याबद्दल ...

**श्रद्धा जाधव**
९वी

# प्राथमिक विभाग
# गट २

**तिसरी व चौथी कौशल्य विकसन सादरीकरण**

*बहुविध प्रज्ञा अशी रुजावी शिक्षणातून मनोमनी ।*
*उत्साहाचे सृजनामध्ये रूपांतर व्हावे क्षणोक्षणी ।*

विद्यार्थ्यांना विविध कलांची ओळख होणे, कलेतून आनंद मिळणे, अभिव्यक्तीची संधी देणे, या उद्दिष्टांमधून सुरू केलेल्या कौशल्य विकसन उपक्रमांतर्गत इयत्ता चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या गायन, वादन, नृत्य, नाट्याच्या सादरीकरणाचा कार्यक्रम शुक्रवार दि. ३० मार्च २०२३ रोजी दु. २ ते ४ या वेळेत घेण्यात आला. इ. तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी भजन, प्रार्थना, अभंग इ. गायन प्रकारांचे व तबला वादनाचे सादरीकरण केले. टाळावर ताल कसा द्यायचा हे प्रत्यक्ष करून दाखवले. त्यानंतर मुलींनी संवादिनीवर विविध अलंकार व नृत्याचे सादरीकरण केले. त्यानंतर प्रत्येक वर्गाने मूकनाट्याचे सादरीकरण केले. यात पाण्याची बचत, शेतकऱ्याचे रोजचे जीवन, जंगलांचे महत्त्व या विषयांचे संदेश उत्तम प्रकारे समजून घेतले.

विद्यार्थ्यांनी वर्षभरात हस्तकला, चित्रकला व मातीकामात तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन मनोहर सभागृहात मांडण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी विविध कलांचे उत्तम सादरीकरण केले. वर्षभरात अध्यापकांनी आणि मुलांनी घेतलेल्या कष्टांचे फलित यात दिसून येत होते. पालकांनी कार्यक्रम व प्रदर्शन आवडल्याचे सांगून सर्व अध्यापकांचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

*बालशौर्य उपक्रम - अभ्यास प्रदर्शन व सादरीकरण*

*सत्य शुभंकर जे जे त्याला, अनुसरण्याचे धैर्य हवे ।*
*ठरली चौकट पार कराया, निर्भय बळ अवतरो नवे ।।*

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या वर्षी निगडी केंद्रात अभ्यासपर्वच्या निमित्ताने या वर्षी विभागाच्या वर्षारंभालाच बालशौर्य पुरस्कार मिळालेल्या बालवीरांचा अभ्यास करूयात असे ठरले. बालशौर्य पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे कार्य जाणून घेणे, शूरवीरांच्या धाडसातून प्रेरणा घेणे, प्रत्यक्ष कृतीतून व अनुभवातून

**अभिनंदन** – प्राथमिक गट क्र. २ चा चि. विराट गणेशदेव सोन्नर याला आंतरराष्ट्रीय स्तर कराटे स्पर्धेत यश प्राप्त झाले.

शिकण्याची संधी देणे. या उद्दिष्टांमधून ही कल्पना साकार झाली. दिवाळीच्या सुट्टी आधी वर्गशिक्षकांनी प्रत्येकी दहा बालशौर्य पुरस्कार मिळवणाऱ्या मुलांची निवड केली. पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेतली. ८ वर्गाचे पाच पाच विद्यार्थ्यांचे गट पाडले, प्रत्येक गटाला एक याप्रमाणे वर्गशः दहा बालशौर्य पुरस्कार प्राप्त मुलांची विभागणी केली. अशाप्रकारे इयत्ता तिसरी व चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांनी ७५ वर्षांच्या कालावधीत बालशौर्य पुरस्कार मिळवणाऱ्या ७५ ते ८० बालवीरांच्या कार्याचा अभ्यास करून, त्यांच्या माहितीचे संकलन केले. जवळजवळ चार ते पाच महिने विद्यार्थ्यांनी गटात अभ्यास करून माहितीचे संकलन केले. नाट्याच्या तासालाही प्रत्येक गटाचे नाटक बसवून तयारी करून घेण्यात आली. विद्यार्थांनी हा अभ्यास करताना online पद्धतीने, कु.शिवांगी काळे व आयुष तापकीर या पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यांची मुलाखत घेतली. यामुळे त्यांच्या विषयीचे अधिकच कुतूहल विद्यार्थांच्या मनात निर्माण झाले. विभागातील सर्वच विद्यार्थांनी या उपक्रमात सहभाग घेतला. यामुळे प्रत्येकाला वेगळा अनुभव घेण्याची संधी मिळाली. या उपक्रमाचे प्रदर्शन व सादरीकरणाचे आयोजन मनोहर सभागृह व प्राथमिकच्या वर्गांमध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी बालशौर्य पुरस्कार प्राप्त प्रमुख चि. आयुष तापकीर (सन -२०२१) व अभ्यागत, बालवीर पुरस्काराने सन्मानीत कु.शिवांगी काळे (सन - २०२२) त्यांच्या पालकांसह उपस्थित होते. इ. तिसरीतून जान्हवी मुळूक व चौथी तून अर्जुन नाईक या विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात अभ्यासाचे कशाप्रकारे नियोजन केले होते, या विषयीचे मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे चि. आयुष तापकीर व कु.शिवांगी काळे यांनी, त्यांनी केलेल्या साहसाविषयी मनोगत व्यक्त केले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## विभागाचे वर्षभराचे उपक्रम

* **आषाढी एकादशी –** आषाढी एकादशी निमित्त वर्गशः अभंग गायन घेण्यात आले. तसेच या दिवशी आषाढी एकादशी चे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. अध्यापकांनी सुद्धा यावेळी अभंग गायन केले.
* **गुरुपौर्णिमा –** गुरुपौर्णिमेनिमित्त इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांच्या आधुनिक गुरुशिष्य या विषयाशी संबंधित कथाकथन स्पर्धा घेण्यात आल्या. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांची गुरुमहिमा स्पर्धा घेण्यात आली. तसेच या दिवशी गुरुपौर्णिमेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजेल असे सांगितले.
* **वर्गशः समूहगीत पाठांतर स्पर्धा –** १५ ऑगस्ट निमित्त वर्गशः समूहगीत गायन स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये इयत्ता तिसरीतील शरद गट आणि इयत्ता चौथीतील अरुण गट हे प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले.

**अभिनंदन –** दुबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय उपशास्त्रीय नृत्य स्पर्धेत कु.हंसिका मंगेश परदेशी हिला रौप्य पदक प्राप्त झाले.

* **आदरणीय आप्पांचा** (कै. विनायक विश्वनाथ पेंडसे) **स्मृतिदिन –** आदरणीय आप्पांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना कथारूपाने विद्यार्थ्यांना सांगण्यात आल्या. तसेच महत्त्वाच्या घटनांचे लेखनही करण्यात आले.
* **रक्षाबंधन** – आपल्यासाठी कार्य करणाऱ्या आपल्या मदतीला उपस्थित राहणाऱ्या समाजातील घटकांचा विचार करून शाळेतील शिपाईकाका वॉचमनकाका आणि टेम्पोवालेकाका यांना विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या बांधून आगळीवेगळी राखी पौर्णिमा साजरी करण्यात आली.
* **गोकुळाष्टमी –** श्रीकृष्णाचा नटखटपणा प्रत्येक बालकांमध्ये दडलेला असतोच. हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाच्या बालपणीच्या प्रेरक कथा सांगण्यात आल्या. तसेच दृक्-श्राव्य माध्यमाचा वापर करून मनोहर सभागृहामध्ये काही कथांच्या चित्रफिती दाखवण्यात आल्या.
* **गांधी जयंती आणि लालबहादूर शास्त्री जयंती –**२ ऑक्टोबर या निमित्ताने महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनावर आधारित लहान-लहान चित्रफिती विद्यार्थ्यांना सभागृहामध्ये दाखवण्यात आल्या. तसेच लालबहादूर शास्त्री आणि महात्मा गांधी यांच्यावर आधारित निबंध लेखन वर्गश: घेण्यात आले.
* **सरस्वती पूजन–** आपल्या हिंदू परंपरेचे जतन करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये आदराची भावना रुजवणे हे उद्दिष्ट लक्षात घेऊन वर्गश: सरस्वती पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. स्त्रियांचा आदर का करावा? यावर आधारित पुराणातील कथा विद्यार्थ्यांना सांगण्यात आल्या.
* **बालदिन –** स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी दृक्श्राव्य माध्यमाचा वापर करून महिलांच्या जीवनावर आधारित छोटा चित्रपट दाखवण्यात आला.
* **गीता जयंती –** रणभूमीवर श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीता आणि त्याच दिवशी झालेला गीतेचा जन्म. जगातील एकमेव पुस्तक ज्याची जयंती साजरी केली जाते. विद्यार्थ्यांना गीता जयंतीचे महत्त्व सांगून गीता जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या पंधरावा अध्याय आणि उतारा पाठांतर स्पर्धा घेण्यात आल्या.
* **मकर संक्रांत आणि रथसप्तमी –** दृक्श्राव्य माध्यमाचा वापर करून विद्यार्थ्यांना मकर संक्रांतीचे महत्त्व सूर्याचा मकर राशीत प्रवेश हे सर्व पौराणिक आणि वैज्ञानिक कारणातून स्पष्ट करून सांगितले.

  रथसप्तमीनिमित्त विद्यार्थ्यांच्याकडून श्री नांदे सरांनी विद्यार्थ्यांकडून सूर्यनमस्कार घालून घेतले. आणि सूर्यनमस्काराचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

* **शिवजयंती (तारखेप्रमाणे)-** इयत्ता चौथीच्या परिसर अभ्यास क्रमांक दोनमध्ये शिवाजी महाराजांचा अभ्यास विद्यार्थी करत आहेत हे लक्षात घेऊन शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांवर आधारित एक छोटा चित्रपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला.

* तारखेनुसार मराठी राजभाषा दिन, सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त सावित्रीबाईंची माहिती, संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त संत गाडगेबाबांची माहिती, राजमाता जिजाबाई यांच्या जयंतीनिमित्त जिजाबाईंची माहिती, साने गुरुजींच्या जयंतीनिमित्त साने गुरुजींची माहिती दृक्‌श्राव्य माध्यमाचा वापर करून १५-१५ मिनिटाच्या चित्रफिती विद्यार्थ्यांना दाखवण्यात आल्या.

* प्राथमिक विभागात आपण गेली चार ते पाच वर्षे विषयवार वर्गरचना असा एक वेगळा शैक्षणिक प्रयोग करत आहोत. विषयानुसार विद्यार्थ्याला संबंधित विषयात गती प्राप्त करता यावी, विषयाबद्दलची गोडी वाढावी या हेतूने इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांचे मराठी, गणित व परिसर अभ्यास यानुसार गट तयार करून त्या त्या विषयांचे अनेक उपक्रम व कार्यशाळा घेतल्या. यावर्षी प्रथमच इंग्रजी विषयांचीही कार्यशाळा घेतली. कार्यशाळा ही कृतीयुक्त खेळातून घेण्यात आली. भाषण, वाचन, निरीक्षण, वर्गीकरण, जोड्या लावा, वेगळे अक्षर व वेगळा ध्वनी ओळखा, शब्दांचे गट करा, या गोष्टींवर आधारित हे सर्व खेळ होते.

***

## योग प्रशिक्षण अनुभव

नमस्कार,

गेले काही दिवस आपल्या पुढाकाराने योग सराव करता आला याचा अत्यंत आनंद आहे. रोजचे सूर्यनमस्कार व साप्ताहिक योगवर्ग गेली अनेक वर्षे करत आहे तरीही स्नायुबल कमी होणे व लवचिकता कमी होत गेल्याचे भान या वर्गामुळे आले. नित्य सरावाने यात चांगला बदल अनुभवता आला. नित्य सरावाला पर्याय नाही याची खात्री पटली. सर्व गटात एक आपलेपणा (We feeling) जाणवला. आपली शिकवण्याची शैली, चिकाटी व सातत्य अनुकरणीय आहे. संयोजकांना व आपल्याला मनापासून धन्यवाद.

**लिमयेकाका**

# पूर्व माध्यमिक विभाग

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे आयोजन अशाप्रकारे केले पाहिजे की स्वातंत्र्यलढयाची भावना, त्यामागील त्याग हे सगळे अनुभवता आले पाहिजे. ज्यात देशातील हुतात्म्यांना श्रद्धांजलीदेखील वाहिली जाईल आणि त्यांच्या स्वप्नांमधील भारत घडविण्याचा संकल्पही पूर्ण होईल. याच भावनेने पूर्व माध्यमिक विभागामध्ये  क्रांतिसप्ताह आणि विषय दिनांचे आयोजन करण्यात आले होते.

## क्रांतिसप्ताह

विविध ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या जीवनातील स्फूर्तीदायक, प्रेरक प्रसंग विद्यार्थ्यांना माहीत करून देणे. राष्ट्रप्रेम जागृत करणे, स्वातंत्र्याचे मोल पटवून देणे. स्वातंत्र्य प्राप्त करण्यामागील स्वातंत्र्य सेनानी, क्रांतीकारकांचा निस्सीम त्याग, अपूर्व राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा, बलिदान त्याबद्दल कृतज्ञता भाव निर्माण करणे. स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या अनेक ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांविषयी अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा जागरूक करणे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना क्रांतिकारकांच्या कथा सांगण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही उद्दिष्टे समोर ठेवून दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत परिपाठामध्ये या क्रांती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

या क्रांतिसप्ताहाची सुरुवात चिंचवडमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघांतर्गत स्व. स्वातंत्र्यसेनानी तात्या बापट स्मृती समितीच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त व स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त समितीच्या महिला विभागातर्फे करण्यात आली. विविध शाळांमध्ये एकूण २५ विविध क्रांतिकारकांची चरित्र सांगण्याचा संकल्प केलेला होता. यानिमित्ताने या महिला सभासदांनी ९ ऑगस्ट २०२२ रोजी परिपाठामध्ये क्रांतिदिन तसेच आदिवासी दिनानिमित्त पाच आदिवासी क्रांतिकारकांच्या कथा सांगितल्या. यात परिचित नसणाऱ्या अल्लुरी सीताराम राजू, राघोजी भांगरे, बिरसा मुंडा, सिधू आणि कानू मुर्मू, झलकारीबाई या क्रांतिकारकांविषयी मुलांना माहिती मिळाली.

पूर्वतयारी म्हणून विभागातील अध्यापिकांनी 'कथाकथन तंत्र' या विषयी इयत्ता पाचवी ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि कथाकथनाबाबत मार्गदर्शन केले.

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांच्या जीवनपटाचा अभ्यास करावा व कथाकथन स्पर्धेच्या माध्यमातून क्रांतिकारकांच्या कथा सांगाव्यात या उद्देशाने 'स्मरण क्रांतीज्योतींचे' या आंतरवर्गीय स्पर्धेचे आयोजन दिनांक २३ ऑगस्ट २०२२ रोजी केले होते. या स्पर्धेमध्ये विभागातील सुमारे ६५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

## गणित दिन आणि विज्ञान दिन

भारतीय गणितज्ज्ञ डॉ. श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त गणितदिनाचे आयोजन २२ डिसेंबर रोजी करण्यात आलेले होते. गणितीय संकल्पना, भौमितिक रचना, दैनंदिन आर्थिक व्यवहार अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने या गणितदिनाचे आयोजन करण्यात आलेले होते. इयत्ता ७ वी च्या ११६ विद्यार्थ्यांनी ३६ गटांमध्ये पाचवी सहावीच्या अभ्यासक्रमातील विविध गणितीय संकल्पना स्पष्ट करणाऱ्या प्रतिकृती, गणितीय खेळ, गणितीय कोडी असे साहित्य तयार केलेले होते.

यात इयत्ता ५ वी, ६ वी चे २३० विद्यार्थी सहभागी होते. मुलांनी गटागटाने या गणितीय संकल्पना समजून त्यावर आधारित असलेले गणितीय खेळ खेळण्याचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांना शून्याचा शोध याचा मागोवा घेणारी डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली. गणित महायज्ञात ३० मिनिटांमध्ये कृती पत्रिकेतील १०० गणिते सोडवायला देण्यात आली.

गणित दिनाच्या निमित्ताने विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना विभागातील गणित शिक्षक तसेच विद्यापीठातील आंतरवासियता निमित्ताने आलेले विद्यार्थी शिक्षक यांनी मार्गदर्शन केले.

*डोळे उघडून बघा गडयांनो झापड लावू नका*

*जे दिसते ते असेच का हे उलगडण्याला शिका ।।*

या प्रबोधिनीच्या पद्याप्रमाणेच इयत्ता ५ वी ते ७ वीच्या सर्वच विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक संकल्पना विविध प्रतिकृतींच्या, सचित्रफितीच्या, विविध खेळण्यांच्या साहाय्याने उलगडण्याचा प्रयत्न केला.

दरवर्षीप्रमाणेच यावर्षी देखील विज्ञानदिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. सातवीच्या गटाला IISER या संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. चैतन्य मुंगी यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा भूगोल आणि विज्ञान या दोन विषयाचा समन्वय साधत 'पृथ्वीची ओळख' हा विषय विद्यार्थ्यांना देण्यात आलेला होता. उपग्रहावरून पृथ्वीचे दिसणारे स्वरूप, पृथ्वीचे अंतरंग, नैसर्गिक प्रदेश, भूरुपे रचना, महासागर निर्मिती, खनिजसंपत्ती, नैसर्गिक आपत्ती, मानव उत्क्रांती, नष्ट झालेल्या प्रजाती असे अनेक विषय विद्यार्थ्यांनी अभ्यासले आणि त्यांची तक्ते, प्रतिकृती स्वरूपात मांडणी केली. विद्यार्थी आत्मविश्वासपूर्वक त्यांच्या प्रकल्पांची माहिती देत होते.

इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी दाब, ध्वनी, बल, चुंबकत्व या भौतिक शास्त्रातील संकल्पना स्पष्ट करणारे छोटेखानी प्रयोग सादर केले. वेगवेगळ्या कृती, प्रयोगांच्या माध्यमातून वैज्ञानिक तत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांसाठी पूर्वतयारी म्हणून प्रयोगाची मांडणी, सादरीकरण कसे करावे, याचे मार्गदर्शन करण्यासाठी पुणे प्रशालेतील विज्ञान दल चालविणाऱ्या श्री. ऋषिकेश कुलकर्णी यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी fact book आणि वैज्ञानिक खेळणी असे दोन घटक या प्रदर्शनात सादर केले. वेगवेगळ्या आकाराच्या electricity, अन्न पदार्थ, सूर्यमाला, अन्नसाखळी, उपग्रह या विषयांवर आधारित fact books ने पालकांना आकर्षित केले. अरविंद गुप्ता वैज्ञानिक खेळणी या वेबसाईटचा आधार घेऊन विद्यार्थ्यांनी खेळणी तयार केली होती. वैज्ञानिक खेळणे कसे तयार करायचे या विषयावर इयत्ता नववीच्या अभिरुची गटाने पाचवीच्या विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना चार खेळण्यांच्या निर्मितीचे सादरीकरण करून दाखवले तर प्रत्येक मुलाने एक खेळणे तयार केले. हे प्रदर्शन बघण्यासाठी पालक मोठया संख्येने उपस्थित होते. या विज्ञान दिनाच्या निमित्ताने एकूण ७५ गटांनी प्रकल्पाची मांडणी केली.

## विभागाचे वर्षभराचे उपक्रम

* **राज्य प्रकल्प अभ्यास –चला भारत जाणूया –** मंगळवार दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० ते १०.३० या वेळात ५ वीच्या सर्व वर्गांमध्ये परिसर –१ विषयांतर्गत विद्यार्थ्यांनी केलेल्या राज्य प्रकल्प अभ्यासाची चला भारत जाणूया.... (छोट्यांच्या नजरेतून) प्रदर्शनाची मांडणी करण्यात आली होती. प्रकल्प माध्यमातून राज्यांचा अभ्यास करताना 'विद्यार्थ्यांना देशाचा नकाशा समजणे. देशाच्या नकाशाचे वाचन करता येणे. भारतातील राज्याचा प्राकृतिक व सांस्कृतिक परिचय होऊन त्यांचा अभ्यास करण्याची ओळख करून देणे.' ही उद्दिष्ट्ये ठरवली होती.

  विद्यार्थ्यांनी गटश: प्रदर्शनात मांडणी केली होती. या निमित्ताने पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सुमारे ३ आठवडे, नकाशा, हवामान, पिके, प्रेक्षणीय स्थळे, महत्त्वाची भौगोलिक भुरुपे, आहार, वस्त्रे या मुद्द्यांच्या आधारे एकूण १८ राज्यांचा अभ्यास केला. या विषयीची माहिती विद्यार्थ्यांनी आंतरजाल व पुस्तकाच्या रूपाने एकत्र केली.

**अभिनंदन –** ऑल इंडिया योगा कल्चर फेडरेशन तर्फे आयोजित जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत प्राथमिक गट क्र १ मधील इयत्ता दुसरी गरुड गटातील कु.नेत्रा थिटे हिला तिसरा क्रमांक प्राप्त झाला.

*** अभंग गायन –** *विठू माऊलीच्या गजरात जाऊ होऊन दंग !*

*मन:चक्षुसमोर साक्षात उभा ठाकेल पांडुरंग !!*

वरील पंक्तींचा अनुभव घेण्यासाठी विभागामध्ये दिनांक ११ जुलै २०२२ रोजी सार्थ अभंग गायन कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. इयत्ता पाचवीसाठी दोन अभंग चालीत गाता येणे व पाठ असणे, इयत्ता सहावी आणि सातवीसाठी दोन अभंग अर्थासह गायन करता येणे व पाठ असणे. सर्वांना कुटुंबासमवेत अभंग गायनाचा आनंद घेता येणे. ही उद्दिष्ट्ये समोर ठेवून कार्यक्रम आयोजित केला होता. सर्व अध्यापकांनीही सामूहिक अभंग गायन केले.

कौटुंबिक जिव्हाळा जपण्यासाठी कुटुंबात अभंग गायन करावे असे या निमित्ताने सुचविण्यात आले होते आणि इयत्ता ६वी-७ वीच्या विद्यार्थ्यांनी कुटुंबासमवेत अभंग गायन करून त्याचे फोटो वर्गाच्या गटावर पाठविले. भगवंताला आळविताना आत्मिक आनंद कसा घ्यावा? श्रद्धायुक्त जीवन कसे अनुभवावे? हे विद्यार्थ्यांना समजावून देण्यासाठी हा छोटासा प्रयत्न होता.

*** अभ्यास सहली –**

तिकोना किल्ला व बेडसे लेणी – इयत्ता ७ वी

सोमवार दि. २६/१२/२०२२ रोजी इ.७ वीचे ४५ विद्यार्थी, ५३ विद्यार्थिनी, ४ अध्यापक, ४ पालक, आणि २ स्नेहिजन असे एकूण (९८+१०) १०८ व्यक्तींची अभ्यास सहल श्री. निलेश गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली तिकोना किल्ला व बेडसे लेणी येथे सुखरूप जाऊन आली. विद्यार्थ्यांना किल्ला निरीक्षणासाठी एक सूची देण्यात आलेली होती. श्री गावडे यांनी विद्यार्थ्यांना तिकोना किल्ल्याचा इतिहास सांगितला व किल्ल्याच्या सर्व बाजूंची माहिती सांगितली. बेडसे लेण्याविषयी पुरातत्व विभागाचे श्री. संतोष दहिभाते यांनी उत्तमरित्या माहिती दिली.

अभ्यास सहलीला जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सहल उपक्रमांतर्गत इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'किल्ले कसे पाहावेत?' या विषयावर आधारित श्री. विनीत दाते यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. दाते सरांनी किल्ल्यांचे प्रकार, किल्ल्याचे महत्त्व, किल्ल्याचे महत्त्वाचे भाग, घेरा, मेट, माची किल्ल्याचे अवशेष – तटबंदी, खंदक, जंग्या, बुरुंज, तोफा, दरवाजाबाबत माहिती दिली.

पक्षी निरीक्षण सहल इयत्ता ६वी

दि. ३ व ५ जानेवारी २०२३ रोजी दोन गटात पक्षी निरीक्षणासाठी भिगवण येथे इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांची अभ्यास सहल आयोजित करण्यात आली होती. इयत्ता सहावीचे सर्व विद्यार्थी, ४ पालक,

४ अध्यापक, विभाग प्रमुख श्री. शिवराज पिंपुडे व मार्गदर्शक श्री. उमेशजी वाघेला हे सर्व सहलीत सहभागी झाले. श्री. वाघेला सरांनी पक्षी निरीक्षणाविषयीचे प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना पक्षी म्हणजे काय? पक्षी स्थलांतर कशा पद्धतीने करतात? अधिवास म्हणजे काय? त्यांचे प्रकार अशी विविध माहिती मुलांना दिली. हॉटेल गारमळा, फ्लेमिंगो पॉईंट, कोंढार-चिंचोली डिकसळ पूल येथून निरीक्षणाला सुरुवात झाली. सर्व विद्यार्थ्यांनी तुतवार, वंचक, राखी बगळा, कोतवाल पक्षी, थापट्या पक्षी, खंड्या व पानबगळ्यांचे थवे हे पक्षी दुर्बिणीतून पाहिले. पाहिलेल्या पक्ष्यांची निरीक्षणेसूचित नोंदी केल्या. पक्षी निरीक्षणाला धरणाच्या परिसरात फिरून नदीसुरे, शेकोट्या, चित्रबलाक, तुतारी गरुड, राखी बदक, थापट्या अशा विविध प्रकारच्या पक्ष्यांचे बोटीतून दुर्बिणीद्वारे निरीक्षण केले. या सहलीची पूर्वतयारी म्हणून श्री. नचिकेत भाटे यांचे पक्षी निरीक्षण व्याख्यान दिनांक २९ डिसेंबर २०२२ रोजी ऑनलाईन व्यासपीठावर आयोजित करण्यात आले होते.

देवराई दर्शन (मुळेश्वर - लोणावळा) - इयत्ता ५वी

देवराई दर्शन अभ्यास सहल ही देवराईचा प्रत्यक्ष दर्शनाचा अनुभव घेणे, प्राचीन वृक्षांची माहिती जाणून घेणे या उद्दिष्टांचा विचार करून आयोजित केलेली होती. दिनांक १० जानेवारी व १३ जानेवारी २०२३ रोजी दोन गटात सहलीचे आयोजन केले गेले. ४ पालक, ४ अध्यापक, विभाग प्रमुख श्री. शिवराज पिंपुडे व मार्गदर्शक वनस्पतीशास्त्र तज्ज्ञ सौ.विनयाताई घाटे आणि सौ. रेवतीताई गिंधी, पक्षी निरीक्षक श्री. उमेशजी वाघेला हे सर्व सहलीत सहभागी झाले. सहलीपूर्वी विद्यार्थ्यांसाठी वनस्पतीशास्त्र तज्ज्ञ सौ.विनयाताई घाटे आणि सौ. रेवतीताई गिंधी यांचे 'देवराई दर्शन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यात देवराईचे प्रकार, देवराईत मानवाचा होणारा हस्तक्षेप, देवराई मधील देवतांची पूजा, देवराईमध्ये आढळणारे वृक्ष, याबद्दल माहिती देण्यात आली.

सहलीमध्ये वाकसई तालुका मावळ येथील देवराई पाहण्यात आली. रेवतीताई प्रत्येक वृक्षाविषयी, त्याला लागणाऱ्या फुलांविषयी फळांविषयी माहिती देत होत्या. उंबळवेल बांबूची झाडी, रानमिरी, करवंद, अंजनी वृक्ष, दातपडी या वनस्पतींबरोबर विविध पक्ष्यांचीही माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. जंगल दर्शनासह भटकंतीचा मनसोक्त आनंद या अभ्यास सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी घेतला. परतीच्या प्रवासात विद्यार्थ्यांनी 'मनशक्ती केंद्राला' भेट दिली.

# माध्यमिक मराठी विभाग

## परिपाठ

विद्यार्थ्यांच्या मनोमय कोशाचा विकास घडवून आणणे. सामूहिक शिस्तीचा दैनंदिन अनुभव, दिनविशेष, देशातील, समाजातील घडामोडी याबद्दल जाणीव करण्यासाठी तसेच विद्यार्थी वर्तन सुधारण्यासाठी / घडवण्यासाठी परिपाठ घेतला जातो.

संवेदनशील व सुसंस्कृत जबाबदार विद्यार्थी घडवणे. हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असतो.

शैक्षणिक वर्ष शके १९४४-४५ म्हणजेच २०२२-२३ या वर्षात परिपाठाचा उपक्रम वेगळ्याप्रकारे घेण्याचे ठरवले. कोरोना महामारीनंतर जेव्हा शाळा सुरू झाल्या तेव्हा मुलांच्या सवयींमध्ये खूप परिवर्तन झालेले होते. पूर्वीसारखी स्थिरता, एकाग्रता, बैठक व शिस्त या सर्व गोष्टींचा अभाव निरीक्षणानंतर लक्षात आला.

या सर्व सवयींवर मात करण्यासाठी परिपाठाची सुरुवात झाली. नुसती प्रार्थना न होता परिपाठामध्ये सस्वर प्रार्थना गायन, राष्ट्रगीत, प्रतिज्ञा, उतारा वाचन, मनाचे श्लोक, पद्य, गीता अध्याय प्राचार्य व अध्यापक यांचा मुलांशी नित्य संवाद असे सुरु झाले. यामध्ये प्रबोधिनी परिचय केंद्रातील वेगवेगळ्या विभागांची ओळख, भारतीय परंपरा, व्रत, चिह्न, विरजा मंत्र, गायत्री मंत्र अशा विविध विषयांपासून ते शास्त्रीय परंपरेतील गणेशोत्सवाचे महत्त्व, अभ्यास नियोजन, अभ्यास सवयींचा विकास इत्यादी विषयावर मुलांशी अध्यापकांनी संवाद साधला. प्राचार्यांनी विनोबांची जीवनसूत्रे मुलांना सांगितली. यातून मुलांची स्वयंशिस्त व स्वावलंबन वाढताना लक्षात आले. एकाग्रता स्थिरता इत्यादी मूल्यांची जोपासना करण्याचा चांगला प्रयत्न केला असे दिसून आले.

सर्व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी परिपाठ हे हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. परिपाठाच्या वेळेत अनेक मान्यवर व्यक्तींना विद्यार्थ्यांना संवाद साधण्यासाठी निमंत्रित केले जाते. परिपाठाच्याच वेळेत व्याख्याने, संवाद, मार्गदर्शन होत असल्यामुळे इतर तासिकांचा वेळ पूर्णपणे विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी उपलब्ध होत आहे, ही बाब सगळ्यात महत्त्वाची वाटते.

**अभिनंदन** – चिन्मय मिशन, पिंपरी चिंचवड आयोजित आंतरशालेय भगवदगीता पाठांतर स्पर्धेत माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यमातील इयत्ता पाचवीतील कु.कावेरी दांडेकर हिला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

विद्यार्थ्यांचे परिपाठामध्ये होणाऱ्या प्रार्थना, पद्य, अध्याय, मनाचे श्लोक व पसायदान हे सर्व पाठांतर छान झाले आहे. तसेच हे सर्व सूर ताल व लयीत म्हणण्याचीही विद्यार्थ्यांना सवय लागली. तसेच वेगवेगळ्या विषयांवरील उताऱ्यांचे वाचन विद्यार्थी अतिशय छान ऐकत होते. यातून विद्यार्थ्यांचे श्रवण कौशल्य विकसित झाले.

## विद्याव्रत

दरवर्षी विद्यालयात इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रत हा शैक्षणिक संस्कार समारंभ आयोजित केला जातो.

इयत्ता ८ वी च्या वर्गात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याबरोबरच अगदी सुरुवातीला विद्यार्थी व पालकांना व्यक्तीविकासासाठी विद्याव्रत हे पुस्तक वाचनासाठी उपलब्ध करून दिले जाते. द्वितीय सत्रात विद्यार्थी व पालकांसाठी व्याख्यानांची योजना केली जाते. अध्यापकही विद्यार्थ्यांशी संवाद करत असतात, व्यक्तिम त्त्वाच्या विकसनासाठी रोज व्यायाम, सकस-आहार, स्वतःची कामे, स्वत: करणे, वाचन, चिंतन इत्यादी गोष्टी विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक असते. म्हणूनच व्याख्यानांबरोबरच जर काही दिवस सामूहिक कृतीची जोड दिली तर या सर्व सवयी लागणे शक्य होईल असा विचार करून विद्यालयात यावर्षी पहिल्यांदाच १९ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान विद्याव्रत पूर्वतयारी शिबिराचे आयोजन केले. त्यासाठी सलग १२ दिवस गटकार्य, चांगल्या सवयी व क्षमतांची ओळख, वाचन, पाठांतर, मौन, उपासना, पद्य असे विविध उपक्रम घेतले गेले.

दैनंदिन उपासना, युक्ताहार विहार, इंद्रिय संयमन, स्वाध्याय प्रवचन, सदगुरु सेवा आणि राष्ट्र अर्चना-शिबिरात घेण्यात येणाऱ्या या सर्व व्रतांचा अर्थ व्याख्यानांद्वारे समजावून सांगितला.

व्याख्यानांनी बुद्धी तर कामातून- वर्तनातून मन विकसित करण्यासाठी विद्याव्रत पूर्वतयारी शिबिरही एक उत्तम संधी होती. विद्यार्थी, पालक, अध्यापक यांच्यातील सुसंवाद, मैत्री, निरीक्षण, नोंदी यामुळे विद्यार्थ्यांच्या क्षमतांची ओळख झाली. ज्ञानप्रबोधिनीने आदर्श मानलेल्या चार राष्ट्रपुरुषांपैकी स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त मंगलमय व शिस्तपूर्ण वातारणात प्रत्यक्ष सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाला मा. संचालक डॉ. गिरीशराव बापट उपस्थित होते. उपासना झाल्यानंतर यज्ञाग्नीच्या साक्षीने विद्यार्थ्यांना व्रतचिन्ह दिले गेले. अभ्यागतांसमोर व्रतार्थी व पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना स्वत:ची ओळख, स्वतःचे ध्येय निश्चित करून त्या ध्येयाप्रत जाण्यासाठी मार्गदर्शन म्हणजे विद्याव्रत होय असे विद्याव्रताबद्दलचा विचार संचालकांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. आ. संचालकांच्या आशीर्वाद पर मार्गदर्शनानंतर प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विभागाचे वर्षभराचे उपक्रम

- **कै. आप्पा पेंडसे स्मरणदिन –** आद्य संचालक कै. आप्पा पेंडसे स्मरण दिन: १७ ऑगस्ट रोजी प्रमुख अभ्यागत सौ. संगीताताई कुलकर्णी यांनी (इयत्ता आठवी ते दहावी विद्यार्थी गट) कै. आप्पांच्या आठवणी याविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

- **सरस्वती पूजन :** सोमवार ३ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी दोन ते साडेतीन या वेळेत मनोहर सभागृहात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त सरस्वती पूजन संपन्न झाले. साहित्य क्षेत्रात भरीव काम करीत असलेल्या; परिश्रमपूर्वक मिळवलेल्या ज्ञानाने विद्यार्थ्यांसाठी पर्यायाने समाजासाठी आवश्यक असलेल्या विवेकनिष्ठ विचारांची जोपासना करून आणि साहित्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष कृतीत उतरवणाऱ्या ज्ञान प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थिनी डॉक्टर सौ. प्रज्ञा कुलकर्णी, डॉक्टर सौ अनघा लवळेकर, डॉक्टर अंजली ओक, डॉक्टर मृणाल मायदेव, सौ वृंदा कुलकर्णी – देशपांडे या अभ्यागत म्हणून लाभल्या. श्री सूक्त, सरस्वती पूजन, आरती, पाद्यपूजन, प्रेरणादायी मनोगते समारोप असे कार्यक्रमाचे स्वरूप होते. अत्यंत सकारात्मक ऊर्जेने भारावलेल्या वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

- **भूगोल दिन :** प्रकल्प प्रदर्शन व स्पर्धा १४ जानेवारी यात इयत्ता आठवी, नववीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सुमारे १०५ प्रकल्प मांडले होते. सर्वेक्षण, प्रतिकृती, संग्रह, तक्ते या पद्धतीचे प्रकल्प होते या कार्यक्रमासाठी फत्तेचंद जैन बी.एड्. कॉलेजमधील प्राध्यापक श्री संभाजी माळी व प्राध्यापक श्री सुभाष शिंदे उपस्थित होते.

- **सावरकर पुण्यतिथी –** वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ: विद्यार्थी गट इयत्ता आठवी, नववी प्रमुख अभ्यागत श्री. कल्पेशदादा कोठाळे, श्री. अवधूतदादा उपस्थित होते उतारा पाठांतर, कविता रसग्रहण, पद्यगायन अंतर्गत आणि बाह्य स्पर्धा, छात्र प्रबोधन अंक विक्री करणाऱ्या बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे कौतुक असे कार्यक्रमाचे एकूण स्वरुप होते.

**अभिनंदन –** पिंपरी चिंचवड मुख्याध्यापक संघ आयोजित वक्तृत्व स्पर्धेमध्ये पूर्व माध्यमिक विभागातील चि.ओम चंद्रशेखर कळके याला प्रथम क्रमांक तर चि. अर्णव विवेक कुलकर्णी याला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

**अभिनंदन** – झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या १८४ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य कला सांस्कृतिक महोत्सव समिती आपला आवाज न्यूज नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार समारंभ आयोजित केला होता. या समारंभात सौ. सुरेखा दयाराम क्षीरसागर यांचा शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

# माध्यमिक इंग्रजी विभाग

## संग्रहात्मक प्रकल्प

कोणत्या ना कोणत्या गोष्टींचा संग्रह करणे हा मनुष्यस्वभावच...पण ह्या संग्रह करण्यातून शिक्षण झाले तर?

हो, आमच्या इंग्रजी माध्यमाच्या ५ वी आणि ६ वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी संग्रह प्रकल्प पद्धतीने अभ्यास केला. निरीक्षण कौशल्य, वर्गीकरण कौशल्य शिकविणे व ते अधिकाधिक पक्के करणे हे याचे प्रमुख उद्दिष्ट होते.

यासह प्रत्येक वस्तू नीट हाताळता येणे, त्याला Labeling करणे, संवाद करणे, जोडीने काम करणे, सादरीकरण करणे अशी इतर कौशल्ये आत्मसात करणे ही उद्दिष्टे ठरविली होती. यामध्ये पाचवी व सहावीचे एकूण १०१ विद्यार्थ्यांचे ४९ गट सहभागी होते. या उपक्रमाचे परिचय सत्र विभागातील अध्यापिकांनी घेतले. विदयार्थ्यांच्या मनात उत्सुकता निर्माण करून संग्रह करण्यास प्रेरित होण्यास याचा उपयोग झाला. याच सत्रात शेवटी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्याला संग्रह कराव्याशा वाटणाऱ्या किमान २५ वस्तूंची यादी केली. साधारणपणे वर्गातील २ विद्यार्थ्यांची एक जोडी आणि एका वस्तूचा संग्रह असे नियोजन केले. या विदयार्थ्यांची विभागातील प्रत्येक शिक्षकांकडे चार ते पाच गट अशी विभागणी करण्यात आली. प्रत्येक अध्यापकाने आपल्याकडे असलेल्या गटांचे निरीक्षण कौशल्याचे पहिले सत्र जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात, नंतर महिन्याच्या अंतराने दुसरे सत्र वर्गीकरण कौशल्याचे आणि दिवाळीच्या सुट्टीनंतर अहवाल लेखन आणि सादरीकरणासाठी एक एक सत्र घेतले.

२५ नोव्हेंबर २०२२ रोजी या विद्यार्थ्यांनी केलेल्या संग्रहाचे प्रदर्शन मनोहर सभागृहात भरविण्यात आले. पाचवी सहावीचे पालक, पाचवी सहावी पूर्वमाध्यमिक गटाचे विद्यार्थी आणि चौथी इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी हे प्रदर्शन पाहण्यास आवर्जून उपस्थित होते. इंग्रजी माध्यमाचे माजी विद्यार्थी  विद्यार्थिनी (ज्यांनी हा प्रकल्प केला होता) यांनी केलेले मूल्यमापन remarks च्या स्वरूपात घेण्याचा वेगळा प्रयोग यावेळी केला. या प्रकल्पात विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन श्रेणी आणि remarks च्या स्वरूपात द्वितीय सत्र परीक्षेच्या गुणपत्रकात दिले गेले.

## मातृभूमी परिचय शिबिर

*सहनाववतु, सहनौ भुनक्तु, सह वीर्यं करवावहै।।*

अशा सहनिवास, सहभोजन, सहप्रवास ह्याचा अनुभव घ्यायला इयत्ता १० वी इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मातृभूमी परिचय शिबिरासाठी गेले होते. आपल्या राज्यातील/देशातील विविध भागांचा ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय, सामाजिक स्थितींचा अभ्यास करावा व सांस्कृतिक वारसा समजून घ्यावा. आणि त्याबरोबरीनेच स्वावलंबन, सहजीवन, सहभोजन, सहकार्य, सहनशीलता अशा भावनिक पातळीवर विद्यार्थी समृद्ध व्हावेत. आपल्या घरापासून दूर राहून, असेल त्या परिस्थितीत निभावून नेता येणे हाच या शिबिराचा मुख्य हेतू होता.

शिबिर हे अनौपचारिक शिक्षणाचे माध्यम आहे. यंदाच्या वर्षी २५ विद्यार्थिनींचा गट अहमदनगर येथील स्नेहालय आणि २५ विद्यार्थ्यांचा गट जळगाव येथील दीपस्तंभ येथे जाऊन आला. विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाकडे वेगवेगळी जबाबदारी सोपवण्यात आली. भेट देण्याच्या ठिकाणांची माहिती मिळविणे, तिथला इतिहास भूगोल समजून घेणे आणि आपल्या गटामध्ये त्याची चर्चा करणे अशी साधारण चार सत्रे झाली. प्रमुख, हिशोब प्रमुख, दिन प्रमुख, उपासना प्रमुख इत्यादी खात्यांचे प्रमुख म्हणून विद्यार्थ्यांनाच जबाबदारी सांभाळण्यास दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळाच उत्साह निर्माण झाला.

शिबिराची दिनचर्या – सकाळी उपासनेपासून रात्री दैनंदिनी लिहिण्यापर्यंतच्या वेळेत वेगवेगळ्या सत्रांचे नियोजन केले होते. जसे वाचन, व्यायाम, गटकार्य, भेटी, क्षेत्रभेटी, व्यक्तिपरिचय योजले होते.

विद्यार्थिनींच्या गटाने रांजणखळगे, प्रसिद्ध समाजसुधारक मा. अण्णा हजारे यांचे राळेगणसिद्धी गाव, पद्मावती देवीचे मंदिर स्नेहालयाचे पुनर्वसन संकुल केंद्र, रणगाडे संग्रहालय, अहमदनगर भुईकोट किल्ला व चांदबीबीमहाल, आनंदश्री महाराज गोशाळा अशा ठिकाणी भेटी दिल्या. तर २०० वर्षांचे वडाचे झाडही त्यांनी पहिले.

मा. आण्णा, हिवरेबाजार येथील सरपंच मा. पोपटराव पवार, स्नेहांकुरचे मा. गिरीश कुलकर्णी आणि भारत कुलकर्णी यांच्याशी संवाद साधला. त्याचबरोबर कुमारी मेघा परमार (मध्यप्रदेश राज्यातील पहिली एव्हरेस्ट सर करणारी मुलगी) यांच्या योगायोगाने झालेल्या भेटीतून तिच्याशी संवाद साधताना तिच्या

**अभिनंदन** – माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यमातील कु. ईशायु पाटील हिला १४ वर्षाखालील राज्यस्तरीय लांब उडी स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

यशाच्या गोष्टींमधून विद्यार्थिनींना प्रेरणा मिळाली. स्नेहालयाचे २२ प्रकल्प विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष पाहिले व तेथील कामकाज समजून घेतले.

विद्यार्थ्यांच्या गटाने बहिणाबाईची कुटी, संत मुक्ताई चांगदेव धरण, मुक्ताई तीर्थ, पद्मालय प्राचीन गणेश मंदिर, भीमकुंड, दीपस्तंभ संस्था, अशा ठिकाणी भेटी दिल्या. तर धरणावरील अधिकारी, साकेगावचे सरपंच श्री आनंद ठाकरे, दीपस्तंभाचे यजुर्वेन्द्र महाजन यांच्याशी झालेल्या संवादातून धरणाची माहिती, ग्राम पंचायतीचे काम, प्राचीन गणपती मंदिराची माहिती, संस्थेचे काम अशा अनेक गोष्टींची माहिती मिळवली.

अशा रितीने शालेय जीवनात मिळालेल्या शिबिरांच्या या अनुभवांनी एक सकारात्मक उर्जा घेऊन १० वी चे विद्यार्थी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनाची सुरुवात करतील याचा आनंद वाटतो.

शिबिराहून परत आल्यानंतर अनुभव कथन झाले त्यावेळी पालकांची उपस्थिती होती. निवडक विद्यार्थी आणि शिक्षकांनी आपले मनोगत मांडले. या अनुभवकथनामुळे इतर विद्यार्थ्यांनाही मातृभूमी परिचय शिबिराचे वेध लागले.

## विभागाचे वर्षभराचे उपक्रम

**✻ विज्ञानदिन**– राष्ट्रीय विज्ञानदिन उपलब्ध वेळेनुसार ९ मार्च २०२३ या दिवशी साजरा केला. इयत्ता नववीच्या अग्रणी व सर्व विद्यार्थी गटाने पाचवी ते आठवीच्या प्रत्येक वर्गासाठी विज्ञानामधील विविध कृतींचे नियोजन केले होते. त्यामध्ये साहित्य आणून पौष्टिक पदार्थ बनवणे, प्रश्नमंजुषा, विविध वर्ग खोल्यांची स्वच्छता, विज्ञानाची प्रात्यक्षिके, वैज्ञानिक खेळ इत्यादी गोष्टींचा समावेश होता. काही गटातील विद्यार्थ्यांनी यासाठी लागणारे साहित्य स्वतः बनवले. सर्व नियोजन व कार्यवाही इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी उत्तमरित्या केली. यातून विद्यार्थ्यांना गटकार्याचा अनुभव मिळाला.

**✻ गणितदिन –** माध्यमिक इंग्रजी विभागात दिनांक १४ मार्च २०२३ रोजी गणितदिनाची योजना केली होती. आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून ही तारीख निवडली होती.

इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी संकल्पनांवर आधारित खेळ, maths marathon (प्रत्येक वर्गाला विशिष्ट संख्येची उदाहरणे सोडविण्यासाठी), वैदिक गणिताची ओळख, रांगोळीचे patterns काढणे, ट्रेझर हंट, game designing, श्रीनिवास रामानुजन यांच्यावरील

**अभिनंदन –** चिन्मय मिशन, पिंपरी चिंचवड आयोजित आंतरशालेय भगवदगीता पाठांतर स्पर्धेत माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यमातील इयत्ता सहावीतील कु.आदिती देशपांडे हिला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

documentary, गणिताची स्वतःच्या वर्गासाठी असलेल्या क्रमिक पुस्तकांपेक्षा वेगळी पुस्तके चाळणे, प्रश्नमंजुषा अशा विविध उपक्रमांची इयत्तेनुसार रचना केली होती.

* **अभिव्यक्ती सादरीकरण** – यावर्षी पाचवी सहावीला गायन, संवादिनी, तबला, नृत्य आणि नाट्य अशा पाचही कलांचा प्राथमिक परिचय करून देण्यात आला. वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला रोटेशन पद्धतीने या सर्व कला शिकण्याचा अनुभव देण्यात आला. प्रत्येक कलेची प्राथमिक ओळख व त्यानुसार ताल, अलंकार, सरगम, राग, पद्य, भावगीत. तबल्यातील काही ताल, नृत्यातील हावभाव इत्यादी कलागुणांचे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. तसेच प्रयोग म्हणून सातवीच्या वर्गावर नाट्यप्रकारांचे प्रशिक्षण देण्यात आले.

सादरीकरण पाचवी – सहावी गट १६ मार्च व सातवीचे १७ मार्च रोजी झाले.

***

## वाचिक अभिव्यक्ती

संपूर्ण दीड वर्ष मी हा विषय शिकत आहे, आठवीतले सहा महिने आणि नववीचे पूर्ण वर्ष. मला नाटक म्हणजे नक्की काय ? याची तोंडओळख झाली. हावभाव, बोलण्याची पद्धत, नजर, सगळ्या गोष्टी अगदी जवळून कळल्या. सगळ्यात जास्त आवडलेली गोष्ट म्हणजे या दीड वर्षात मयुरीताई आणि मानसीताई याच्यांशी तयार झालेलं एक भन्नाट नातं! कदाचित एक शिक्षक आणि विद्यार्थी यापेक्षा खूप जास्त भारी... यावर्षी मला माझ्यात जाणवलेला बदल असा होता की आता स्टेजवर सादर करताना बिनधास्त सगळ्या गोष्टी बोलता येतात. मला पूर्वी जाणवणारी अडचण म्हणजे समोरच्या प्रेक्षकांच्या डोळ्यात बघून मला बोलायला भीती वाटायची पण ताईने यावर मला समजावून सांगितलं आणि मग मी त्यात सुधारणा करायला सुरुवात केली. अधिक सराव करायला सुरुवात केली. सुरवातीला समोर बघून बोलण्याचा आणि मग त्यानंतर आईला समोर बसवून तिच्याकडे बघून बोलण्याचा खूपच जास्त फायदा झाला आणि माझे पुढचे सादरीकरण मी उत्तम करून दाखवले. फक्त नाटक किंवा अभिनय करण्याचा अनुभव यावर्षी मी घेतला नाही तर त्याचबरोबर म्युझिक ऑपरेट कसं करायचं हे पण शिकले, आमच्याच एका नाटकाच्या कार्यक्रमाला पार्श्वसंगीत देण्याची संधी ताईने मला दिली. खरंच बेस्ट अनुभव होता हा माझा! हा विषय वर्षभर शिकण्याचा माझा निर्णय मला खूप बरोबर वाटतोय. कदाचित दहावीमध्ये हा अनुभव फार दिवस येणार नाही पण जितके जास्त दिवस आणि वेळ मला या विषयाला देता येणार आहे तितका मला द्यायचा आहे आणि अजून छान नाटक, वाचन मला करत राहायचं आहे. मयुरीताई आणि मानसीताई कायम अशाच सोबत राहा..

**आर्या सोनटक्के – ९ वी क**

# गुरुकुल विभाग

## राखी विक्री

*विक्रमी कृती करू चला दिगंत हालवू...*

या पद्य पंक्तीचा राखीविक्रीच्या निमित्ताने गुरुकुलाला जवळून अनुभव घेता आला. गुरुपौर्णिमा जवळ आली की गुरुकुलातील प्रत्येकालाच वेध लागतात ते राखीविक्रीचे. याची पूर्वतयारी म्हणून इ.९ वीच्या वर्गाचे विक्री प्रमुख म्हणून लागणारे प्रशिक्षण ४ M च्या सहाय्याने घेतले. मनुष्यबळ (Man), आर्थिक (Money), साहित्य (Material), प्रचार (Marketing). ५वी ते ८वी च्या गटासाठी ९वी मधील प्रत्येक खात्याचे दोन विद्यार्थी असे किमान ८ विद्यार्थी प्रत्येक वर्गाचे मार्गदर्शन करण्यासाठी म्हणून नेमले होते. राख्या आणणे, त्याची मांडणी करणे, त्याच्या नोंदी ठेवणे, हिशोब व्यवस्थित ठेवणे या सर्वच गोष्टी विद्यार्थी करत होते.

याचे फलित म्हणजे यावर्षी गुरुकुलाची ९ लक्ष १९ हजार १४५ रुपये इतकी उच्चांकी राखी विक्री झाली. यात प्रत्येक विद्यार्थ्यांने किमान १००० रु. इतकी राखी विक्री केली. वेगवेगळ्या युक्त्या वापरून आपली राखी विक्री कशी वाढेल याचा विचार केला. कधी स्टॉल लावून, कधी मित्र-मैत्रिणींच्या सोबत जाऊन, आपल्या आई-बाबांच्या ऑफिस, कंपनी मध्ये जाऊन मुलांनी राखी विक्री केली.

विद्यार्थ्यांची राख्यांची मांडणी, संवाद शैली, विक्री कौशल्य, आपली व वर्गाची विक्री वाढेल याबद्दलचा वेगळा विचार या सर्वांची विशेष दखल सर्वच अध्यापकांनी घेतली.

विद्यार्थी राखी विक्रीमध्ये आपला वेगळा विचार मांडतात याचे उदाहरण म्हणून इयत्ता १०वी मधील श्रीहरी अभ्यंकर व त्याचे पालक श्री. श्रीकृष्ण अभ्यंकर यांनी सैनिक राखी (जो लढतो देशासाठी एक राखी त्याच्यासाठी) असा वेगळा विचार केला व त्यात १०वीच्या वर्गाला सामावून घेतले. यातून राख्यांचे प्रायोजकत्व तर मिळवलेच तसेच त्याच्या वर्गातील काही पालकांनी प्रत्यक्ष सीमेवर जाऊन सैनिकांनाही राख्या बांधल्या.

सर्वच विद्यार्थ्यांनी इतकी कमाल विक्री केल्याने राखी विक्रीचा बक्षीस समारंभ देखील तितकाच दिमाखदार, भव्य झाला.

**अभिनंदन** – चिन्मय मिशन, पिंपरी चिंचवड आयोजित आंतरशालेय भगवद्‌गीता पाठांतर स्पर्धेत माध्यमिक विभाग, इंग्रजी माध्यमातील इयत्ता सहावीतील चि.आर्यन भांडारकर व कु.स्वरा भगत यांना उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला.

## तीर्थ पूजन

यावर्षी मातृभूमी परिचय शिबिरे इ. ५ वी ते १० ची ऑक्टोबर  शेवटच्या आठवड्यात स्तरानुसार गेली आणि नोव्हेंबर पहिल्या आठवड्यात परतली.

कृष्णा, गोदावरी, नर्मदा, गंगा आणि ब्रह्मपुत्रा या जीवनदायिनींच्या पवित्र सहवासात झालेल्या शिबिरांना एक वेगळाच सांस्कृतिक संदर्भ पाहण्याचा अनुभव शिबिरार्थींनी घेतला.

यानिमित्ताने गुरुकुलमध्ये आपण जलपूजन / गंगापूजन करूया अशी कल्पना विभाग प्रमुख आदित्यदादानी मांडली आणि ती सगळ्यांना आवडली. दि. २४ नोव्हेंबरचा सकाळी १० वाजताचा मुहूर्त निश्चित केला गेला. इ. ८ -९ वी च्या विद्यार्थ्यांनी पूजेसाठी पूर्वतयारी स्वच्छता, आसनव्यवस्था, सजावट, हार-तोरणे इ. नी उपासना कक्ष सज्ज केला. वर्गावर्गाना तोरणे लागली. रांगोळ्या सजल्या.

श्री. नंदे गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष पूजेची तयारी केली. मातृभूमीच्या प्रतिमेसह पूजा मांडणीसुद्धा खूपच मंगलकारक होती. पूजेसाठी माजी पालक सौ. रत्नाताई बोरसे व श्री. व सौ. जोशी काका हे उपस्थित होते. मंगलमय वातावरणात आणि धूपदीप, पुष्पे यांच्या दरवळलेल्या गंधित, प्रसन्न मंत्रोच्चारात पूजन चालू झाले. मोठ्या संख्येने पालक, केंद्रातील सदस्य पूजेसाठी उपस्थित होते. पूजेतील मंत्रार्थ सांगत गुरुजी मंत्र मोठ्या आवाजात म्हणत होते. पूजा, अभिषेक आणि होम व आरती असे तीन भाग होते. पूजा पूजकांच्या हस्ते, अभिषेक अध्यापकांकडून व विद्यार्थ्यांकडून करण्यात आला. अत्यंत प्राचीन नद्यांच्या जलपूजनाने वातावरणात प्रसन्नता व भारलेपण होते. नदी, पाणी, संस्कृती या साऱ्यांचे महात्म्य यानिमित्ताने अधोरेखित झाले. सर्व मुलांनी हा सोहळा आनंदाने अनुभवला. शेवटी आरती होऊन प्रसाद वाटप झाल्यावर या जलपूजन सोहळ्याची सांगता झाली.

## पालक मेळावा

दि.१५ एप्रिल शनिवार रोजी गुरुकुलात पालक मेळावा संपन्न झाला. सकाळी ७ ते संध्याकाळी ७ अशी पालक मेळाव्याची वेळ होती. सुमारे १७० पालक या मेळाव्यात सहभागी झाले. सकाळी ७ वाजता पालकांच्या दिवसाची सुरुवात व्यायाम आणि उपासनेने झाली. त्यानंतर मातृमंदिरात आदरणीय लताताई भिशीकर यांची चिंतनिका झाली. नियमित उपासनेने सर्व गोष्टी साध्य होतात असे त्यांनी सांगितले.

या पालकांसाठी मौनाभ्यास तासिका झाली. यात पालकांनी मनन करून लेखन केले.

**अभिनंदन** - चिन्मय मिशन, पिंपरी चिंचवड आयोजित आंतरशालेय भगवदगीता पाठांतर स्पर्धेत माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यमातील इयत्ता क्रमांक प्राप्त झाला.

त्यानंतर ‘गोष्ट इथे संपत नाही’ हा कार्यक्रम विद्यार्थी व पालक यांच्यासाठी झाला. शिवाजी महाराजांचा दक्षिण दिग्विजय असा या कार्यक्रमाचा विषय होता. शिवाजी महाराजांचा दक्षिण दिग्विजय ऐकताना २ तास कधी उलटले हे कळलेही नाही.अनेक प्रसंग ऐकताना अंगावर शहारे आले. भोजनोत्तर पारितोषिक वितरण समारंभ झाला. दिल्ली बोर्डच्या सौ. निरुपमाताई अभ्यंकर ह्या प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांच्या भाषणातून त्यांनी परितोषिकांचे महत्व पटवून दिले. मुलांच्या चांगल्या कामाचे कौतुक करणे हेही पारितोषिकच आहे. पालकांसाठी ‘परिवारकुल’ हा अतिशय समर्पक शब्द त्यांनी दिला. त्यानंतर आदित्यदादांनी पंचकोशाची मांडणी पालकांसमोर केली. तसेच भवितव्य लेखातील काही मुद्दे सांगितले. त्यानंतर पालकांसाठी प्रश्नमंजुषा हा कार्यक्रम झाला. पंचकोश, वार्षिक उपक्रम आणि दिवसभरात घडलेल्या घटनांवर आधारित प्रश्न विचारण्यात आले. आनंदी, शतायुषी, जिज्ञासू, आत्मविश्वासू असे चार गट केले होते. त्यानंतर पालकांची चार गटात चर्चा घेण्यात आली.

पालकांनी गटचर्चेत अतिशय मनापासून सहभाग घेतला. काहीजणांनी खूपच चांगली मते नोंदवली. काही बाबतीत जबाबदारी घेण्याचेही कबूल केले.

प्रत्येक गटातून एका पालकांनी गटचर्चेतील मुद्दे सर्वांसमोर मांडले. त्यानंतर दिवसभराचा अनुभव पालकांनी मनोगतातून व्यक्त केला. आदित्यदादांच्या समारोपानंतर पालक मेळाव्याची सांगता झाली.

## विभागाचे वर्षभराचे उपक्रम

**⁕ सार्थ अभंग गायन –** *अवघे गरजे पंढरपूर !*

असे पंढरपूर शनिवार दिनांक ९ जुलै २०२२ रोजी विभागात अवतरले होते ते या सार्थ अभंग गायनाच्या रूपाने. सर्व विद्यार्थी व वाद्यवृंद एकाच ठिकाणी बसले होते. अवघ्या अडीच तासात २३ अभंग कुठेही घाई गडबड न करता झाले. या कार्यक्रमासाठी गायलेले सर्व अभंगांचे शब्द स्क्रीनवर दिसतील अशी व्यवस्था केलेली होती. अभंग गायनात पालकांच्या गटांनीही अभंग गायन करून आपला सहभाग नोंदवला.

**⁕ शारदीय नवरात्र –** हे देवीचे स्वरूप आहे : या नवरात्रोत्सव निमित्ताने आपण विविध देवतांचे पूजन करत असतो. देवीचे एक रूप म्हणजे आई...या देवीसमान आईचे पूजन करण्यासाठी गुरुकुलात मातृपूजनाचे आयोजन करण्यात येते.

यावर्षी हे मातृपूजन सोमवार दिनांक ०३ ऑक्टोंबर रोजी एकाच वेळी वर्गशः आयोजित केले होते यात इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे मनोभावे पूजन केले.

**⁕ इ.९वी दासबोध पारायण –** ‘एक तरी ओवी अनुभवावी’ या उक्तीनुसार विभागात इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी दासबोध पारायणाचे आयोजन केले होते. हे पारायण दि. ९ फेब्रुवारी २०२३ पासून सुरू झाले १० तारखेला आ. संचालकांची ‘चिंतनिका’ झाली. यात दासबोधामधल्या एका ओवीचा संदर्भ घेत समर्थांनी

सांगितलेले 'हरिनाम संकीर्तन, देशकारण, समाजकारण, करता करता सावधपण, साक्षेप ठेवावा व आक्षेप सोडावा हे आपल्या चारी पथदर्शकांनी कसे आचरणात आणले व प्रबोधिनीच्या कामात याचा कसा समावेश आहे हे सांगितले.

१५ फेब्रुवारी २०२३ रोजी दास नवमीच्या दिवशी सकाळी १० वाजता पारायणाची सांगता झाली. सांगता समारोहाला ऋषी अजित जगताप आणि किसन महाराज चौधरी यांच्या मार्गदर्शनाचा अवचित लाभ मिळाला.

✻ **अमृतगीतमाला**– स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जिवाची पर्वा न करता हसत हसत फासावर जाणारे, लढणारे, क्रांतिकार्य करणारे थोर थोर महात्मे यांच्यामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, देशाचा वैभवशाली इतिहास आठवण्यासाठी, आपले स्वातंत्र्य ही आपली जबाबदारी हे ओळखण्यासाठी अमृतमहोत्सवानिमित्त ७५ गीते गाण्याचा संकल्प करून तो पूर्ण करण्याचा यशस्वी प्रयत्न १८ फेब्रुवारी रोजी स्वा. सावरकर उद्यानात संपूर्ण गुरुकुलातील सर्व विद्यार्थी, पालक व अध्यापकांनी मिळून केला.

✻✻✻

स्वामी विवेकानंद यांनी पुढील अनेक पिढ्यांना पुरेल एवढी ऊर्जा त्यांच्या कार्यातून निर्माण करून ठेवली आहे. त्यांचाच आदर्श घेऊन त्यांच्या जयंतीनिमित्त गुरुकुलात सर्व विद्यार्थी १००० सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प करतात.

यावर्षी दि. १२ जानेवारी रोजी काहींनी ११००, १२००, १३०० आणि २० विद्यार्थ्यांनी २०२३ सूर्यनमस्कार घालून उच्चांक गाठला. या उपक्रमात अनेक पालक, हितचिंतक, केंद्रातील अन्य सदस्य, माजी विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

| **सूर्यनमस्कार तपशील** | |
|---|---|
| १२ ते ४९९ सूर्यनमस्कार – १३ विद्यार्थी | ५०० ते ९९९ सूर्यनमस्कार – ४ विद्यार्थी |
| १००० ते १४९९ सूर्यनमस्कार – ११७ विद्यार्थी | १५०० ते १८०० सूर्यनमस्कार – २३ विद्यार्थी |
| २०२३ सूर्यनमस्कार – १९ विद्यार्थी | १००० व त्यापेक्षा जास्त सूर्यनमस्कार – ३ अध्यापक, पालक |
| एकूण सूर्यनमस्कार संख्या : २,३०,३११ | |

**अभिनंदन –** डॉ.होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षा पूर्ण देशात सर्व प्रकारच्या बोर्डासाठी इ.६वी आणि इ.९वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येते. या परीक्षेला गुरुकुल विभागातील इ.६वी तील चि. आदिनाथ तारकुंडे याला सुवर्ण पद, चि. नील डुंबरे याला रौप्य पदक तर चि. अमेय पानसरे याला कांस्य पदक प्राप्त झाले.

# क्रीडाकुल विभाग

## डोंबिवली प्रात्यक्षिके

१६ एप्रिल रोजी डोंबिवली येथे रौप्य महोत्सवानिमित्त क्रीडा प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. जवळपास ६५ खेळाडूंनी या प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला. जिम्नास्टिक, मल्लखांब या क्रीडा प्रकारांचे खेळाडूंनी रोमहर्षक प्रात्यक्षिक डोंबिवली मधील गुरुकुल टिळक नगर शाळेच्या पटांगणावर सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे आयोजन ज्ञान प्रबोधिनीच्या डोंबिवली विस्तार केंद्राने केले होते. डोळ्यांचे पारण फेडणाऱ्या कार्यक्रमाला तब्बल ५०० डोंबिवलीकरांनी उपस्थित राहून प्रात्यक्षिकांना भरभरून प्रतिसाद दिला. डोंबिवलीच्या केंद्राकडून १४ ते १६ एप्रिल २०२३ दरम्यान सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराची सांगता क्रीडा प्रात्यक्षिकांचे आयोजन करून झाली. शारीरिक आणि मानसिक क्षमतांचा कस लागणे व क्षमतांचा विकास होऊन किती अद्भूत गोष्टी मानवी शरीर करू शकते हे 'क्षमता' हा विषय घेऊन मुलांसह पालकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला या कार्यक्रमास क्रीडाकुलचे प्रणेते व प्रमुख मनोज देवळेकर हे प्रमुख अभ्यागत म्हणून उपस्थित होते. त्यांनी पालकांना मार्गदर्शन करताना, ''मुलांनी स्वप्न पाहायला हवीत आणि पालकांनी मुलांवर विश्वास ठेऊन स्वप्न साकार करण्यासाठी त्यांना साथ द्यायला हवी'' असे आवाहन केले.

❊ **अभंग गायन –** ९ जुलै शनिवार रोजी सर्व (इयत्ता पाचवी ते दहावी) विद्यार्थी आषाढी एकादशीच्या निमित्ताने देहूला पायी गेले व वारीसाठी निघालेल्या वारकऱ्यांमध्ये सहभागी झाले. एकूण १२२ विद्यार्थी व सर्व क्रीडाकुल सदस्य यामध्ये सहभागी झाले.

जगत्‌गुरु संत तुकाराम महाराजांच्या मुख्य मंदिरात व गाथा मंदिरात विद्यार्थ्यांनी व सदस्यांनी अभंग गायनाचा कार्यक्रमकेला. श्री देवळेकर सरांच्या हस्ते आरती होऊन अभंग गायनाचा समारोप गाथा मंदिरात झाला. अनेक पालक व देहूकर यांनी अभंग गायनाचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अतिशय भावपूर्ण असा हा सोहळा झाला. देहूतील काही पालकांनी उत्तम अशी सगळी व्यवस्था केली.

**अभिनंदन –** सांगली येथे झालेल्या शालेय गटाच्या राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेत चि.मंथन संचेती याला सांघिक रौप्य पदक प्राप्त झाले.

**※ पालक शिक्षक सहल –** इयत्ता पाचवी ते दहावीच्या पालकांची व शिक्षकांची प्रबोधिनी परिचय सहल ४ ऑगस्ट २०२२ रोजी वेल्हे व खेड शिवापूर येथे गेली होती. ८० पालक व क्रीडाकुलचे सर्व सदस्य या सहलीस उपस्थित होते. प्रबोधिनीच्या सामाजिक कार्याची ओळख व माहिती करून घेणे हा सहलीचा मुख्य उद्देश होता. पालकांनी अतिशय उस्फूर्तपणे तेथील नियोजनामध्ये सहभाग घेतला. तेथील कामाचा अनुभव व कार्यकर्त्यांची समर्पित वृत्ती याचा परिचय पालकांना झाला.

**※ व्याख्यान–** नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून क्रीडाकुलच्या सर्व महिला पालकांसाठी शनिवार दिनांक १ नोव्हेंबर रोजी भोंडला व स्त्री शक्तीचा जागर या विषयावर वैद्य सौ. दीप्तीताई यांचे व्याख्यान आयोजित केले होते. एकूण ६५ महिला पालक कार्यक्रमास उपस्थित होत्या व त्यानंतर नवरात्री निमित्ताने भोंडला आयोजित केला होता. यामध्ये स्त्री पालक व विद्यार्थिनी अध्यापिका सहभागी झाल्या होत्या.

**※ आंतरराष्ट्रीय खेळाडूंची भेट –** १८ जून २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय खेळाडू मरियम व जॅकी यांचा खेळाडूंबरोबर संवाद व मुलाखत घेण्यात आली. सौ. दीप्तीताई व सौ आरतीताईनी दोघांना खेळ विषयक करियर, तयारी, आहार, व्यायाम या विषयी माहिती विद्यार्थ्यांना समजून देत खेळाडूंच्या दृष्टीने उपयुक्त प्रश्न विचारले.

यावेळी डॉ. महेश पाटील उपस्थित होते. नंतर वर्षभरात विविध क्षेत्रात क्रीडाकुलचे युवक खेळाडू कार्यरत आहेत. आपली कारकीर्द गाजवत आहेत. अशा २५ खेळाडूंनी क्रीडाकुलला भेट दिली व विद्यार्थांना मुलाखती दिल्या. विद्यार्थी खेळाडूंशी संवाद साधत असताना क्रीडाकुलमध्ये ते कसे घडले व क्रीडाकुलच्या सर्व प्रक्रियेचा त्यांना आपल्या करिअरमध्ये कसा फायदा झाला याविषयीची मांडणी सर्वांनी केली.

**※ हिवाळी शिबिर –** २ जानेवारी २०२३ पासून क्रीडाकुलच्या इ.पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे हिवाळी शिबिर घेण्यात आले. खेळाडूंमधील स्वावलंबन व शिस्त वाढण्यासाठी तसेच क्रीडाकुलच्या रौप्य महोत्सवानिमित्त होणाऱ्या प्रात्यक्षिकांचा सराव होण्यासाठी खेळाडूंचे शिबिर सुरू करण्यात आले. यात मल्लखांब, जिम्नास्टिक, ॲथलेटिक्स व योगासन यांच्या सरावाबरोबरच लाठीकाठीचे प्रशिक्षणसुद्धा देण्यात आले. शिबिराचा समारोप भव्य अशा क्रीडा प्रात्यक्षिकाने झाला. ही प्रात्यक्षिके प्रबोधिनीच्या विविध केंद्रावर घेण्याचे नियोजन करण्यात आले. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्ताने ७ जानेवारी २०२३ रोजी चिखली गुरुकुल येथे क्रीडा कुलच्या जिम्नास्टिकच्या व मल्लखांबच्या मुलांनी चित्त थरारक अशी क्रीडा प्रात्यक्षिके सादर केली. यात ३०विद्यार्थी सहभागी झाले होते.

२७ व २८ जानेवारी २०२३ रोजी क्रीडाकुलचे एकूण ८५ विद्यार्थी सोलापूर प्रबोधिनी केंद्र व हराळी येथे प्रात्यक्षिकांसाठी गेले होते. मल्लखांब, जिम्नॅस्टिक व योगासनाचे अतिशय भव्य आणि नेत्रदीपक प्रात्यक्षिकांचे सादरीकरण क्रीडाकुलच्या विद्यार्थ्यांनी केले.

१८ फेब्रुवारी २०२३ रोजी शाळेच्या मैदानावरती क्रीडाकुलच्या रौप्य महोत्सवानिमित्त भव्य क्रीडा प्रात्यक्षिके सादर झाली. त्यात लाठी, जिम्नास्टिक, मल्लखांब, तिरंदाजी, नेमबाजी, टेबल टेनिस, योगासन ॲथलेटिक्स या खेळांचा समावेश होता. यामध्ये पालकांनी सुद्धा गोफ व लेझीमचे प्रात्यक्षिक सादर केले. जवळपास ३०० खेळाडूंनी या प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला होता. माध्यमिक व गुरुकुलच्या मुलांनी स्वयंसेवक म्हणून उत्तमरित्या काम पाहिले. प्रमुख पाहुणे म्हणून मा. संचालक वाच. गिरीशराव बापट उपस्थित होते. त्यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक करुन पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या.

२६ फेब्रुवारी रोजी ज्ञान प्रबोधिनी युवक विभाग सहकारनगर कोथरूड भाग आयोजित क्रीडा प्रात्यक्षिकांमध्ये जिम्नास्टिकच्या १७ मुलांनी चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर केली.

**पतंजली याग व शतरूद्री अभिषेक –** योग साधनेमुळे शरीरातील नाड्यांची शुद्धी होते, आणि त्याला अध्यात्माची जोड मिळाली की आपण आपले ध्येय गाठू शकतो. हेच अवचित्य साधून २१ जून २०२२ रोजी पतंजली याग व शतरूद्री अभिषेक संपन्न झाला. यातून क्रीडाकुलची वास्तू, सर्व सदस्य व विद्यार्थी यांची शुद्धी होऊन मन चैतन्याने ओसंडून नव्या वाटचालीसाठी सज्ज झाले.

यानिमित्ताने आज शाळेमध्ये शिक्षक, प्रशिक्षक व विद्यार्थ्यांनी योग प्रात्यक्षिके सादर केली. पतंजलि याग व शतरुद्र अभिषेक श्री नंदे गुरुजी व गुरुबंधू यांनी सर्व क्रीडाकुल सदस्य, विद्यार्थी, पालक व माननीय श्री देवळेकर सर यांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात पार पाडला. अभिषेकाच्या वेळी सर्वांनी वास्तूला पुढील वाटचालीसाठी तुझे आशीर्वाद आमच्या पाठीशी असू दे आणि आमच्या यशस्वी जीवनाचा साक्षीदार हो अशी प्रार्थना केली. पूजेचे सर्व विधी शाळेच्या सदस्य असलेल्या श्री व सौ.आरतीताई खोत, शाळेचे पालक श्री व सौ देशपांडे, शाळेचा माजी विद्यार्थी डॉक्टर श्री व सौ. सौगंध देशमुख यांनी पार पाडले.

यानंतर अभ्यागत श्री मिलिंद कुलकर्णी यांनी विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन केले. खेळाडूंनी कधी हार मानून चालत नाही हे सांगताना ते म्हणाले की तब्येत ठीक नसतानाही त्यांनी एकाच इनिंगमध्ये सात गडी बाद करण्याचा विक्रम केला यावरून खेळाडू किती जिद्दी असावा व त्याने आपल्याच मर्यादा कशा तोडाव्यात हे समजावले.

वैद्य श्री सुविनय दामले यांनी 'क्रीडा यशासाठी आयुर्वेद' या आपल्या व्याख्यानात खेळाडू घडणीत पालकांचा किती मोठा वाटा असतो व आपल्या आयुर्वेदाचे त्यातील उपचारांचे खेळाडूंच्या वाटचालीवर किती सकारात्मक परिणाम होतात ते समजावले. माणसाच्या आहाराचा त्याच्या खेळातील विहारावर कसा परिणाम होतो. म्हणून जे आवडेल ते पचेल व जेवढे सोसेल तेवढाच आहार घ्यावा. एकूणच खेळाडूंचा आहार व जीवनक्रम कसा असावा याबाबत मार्गदर्शन केले.

***

# रौप्य महोत्सव सांगता समारोह

रौप्य महोत्सव सांगता व पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार दिनांक ६ एप्रिल रोजी साजरा करण्यात आला. हनुमान जो अतिशय बलवर्धक आणि शक्ती प्रदान करणारा असा आहे. अश्या बलशाली हनुमानाच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने सकाळी मैदानावर प्रत्येक खेळाडूने २५ जोर मारले व २५ बैठका काढल्या. याच दिवशी निगडी केंद्रात क्रीडाकुल विभागाच्या रौप्य महोत्सवाची सांगता व राष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या खेळाडूंचा पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सकाळच्या प्रसन्न अशा वातावरणात मनाच्या श्लोकांपैकी निवडक २५ श्लोकांचे क्रीडाकुलचे सदस्य व पालकांनी मिळून निरुपण केले. वर्षभर क्रीडाकुलच्या या सर्व खेळाडू, शिक्षक व पालकांनी मनाचे २०५ श्र्लोकांचे प्रसन्न अंत:करणाने पठण आणि विवेचन केले होते.

यानंतर रौप्य महोत्सव प्रमुख पद्मजाताईंनी संपूर्ण रौप्य महोत्सवी वर्षाचा आढावा मांडताना सर्व जुन्या आठवणींना उजाळा दिला. यानंतर कार्यक्रमात पुढे मा.मनीषा बाठे या अभ्यागतांचे मार्गदर्शन लाभले. मनोबोधाचे एका खेळाडूच्या आयुष्यात कसे महत्त्व असते ते सांगितले. समर्थ रामदासांनी बलोपासनेसोबतच मनाचे आरोग्य राखण्यासाठी मनोबोध घालून दिले आहेत आणि खेळाडूच्या शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्य राखण्यासाठी रोज मनोबोधाचे पठण नक्की व्हायला हवे. असे त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

दुसरे अभ्यागत वैद्य श्री राजीव नगरकर यांनी वैद्यकीय उपचार देताना मनोबोधाचा कसा सकारात्मक परिणाम उपचार घेणाऱ्या व्यक्तीवर होऊ शकतो, हे एका खऱ्या घटनेचा आधार घेऊन सांगितले. यानंतर राष्ट्रीय स्तरावर यश मिळवलेल्या काही खेळाडूंचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

***

**अभिनंदन** – लातूर येथे झालेल्या शालेय गटातील राज्यस्तरावरील कबड्डी स्पर्धेत क्रीडाकुल विभागातील कु. अनुष्का सावंत, कु गायत्री मोघे, कु. देवयानी एडके यांना कांस्य पदक प्राप्त झाले.

**अभिनंदन** – बालेवाडी येथे झालेल्या शालेय जिम्नॅस्टिक स्पर्धेत क्रीडाकुलचा चि.रोहित डोसे याला सांघिक रौप्य पदक प्राप्त झाले.

अनुभव

# सहलीची मजा

माझ्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थी सहलीला आलाच पाहिजे, ही मजा परत परत नाही मिळत. दादा, आपण सर्व मिळून करू ॲडजेस्ट तुम्ही घेऊन या आशुतोषला. हे शब्द आहेत भास्कर गटाच्या वर्गशिक्षिका स्वातीताई गायकवाड यांचे.

खरंच ताईंची ही तळमळ व प्रबळ इच्छाशक्ती या बळावरच आम्ही आशुतोषला सहलीला नेऊ शकलो. जी काही ठिकाणं ठरली होती त्यापैकी काही ठिकाणं आशुतोषला दाखवता आली नाहीत परंतु जी ठिकाणे पाहता आली ती फक्त आणि फक्त सर्व शिक्षक, शिक्षकेतर यांच्या सहकार्यामुळेच. कधीकाळी आम्ही दिलीपकाकांबरोबर सहलीला गेलो होतो पण या वेळेस माझ्या मुलाला घेऊन गेलो तेव्हा परत दिलीपकाका खूपच भारी वाटत होते. पूर्वीचे दिलीपकाका आणि आताचे यात खूप फरक झाला आहे. तो म्हणजे फक्त वयाचा हे मात्र जाणवले. आमचा दिलीप आहे तसा आहे. आशुतोष आला हे दिसल्यानंतर सुवर्णाताई, स्वातीताई, राकेश सर आणि सर्व शिक्षक आणि मित्रमंडळी यांच्या चेहेऱ्यावरचा आनंद दिसत होता. तर मुलं आपण सर्वजण एकत्र मजा करणार आहोत या आनंदात होती. आशुतोष दिसल्यानंतर मुलांनी वाजविलेल्या टाळ्या, मारलेल्या उड्या, आणि मारलेली घट्ट मिठी खूप काही सांगून जाते. आशुतोषला तसेच कुठल्याही विद्यार्थ्यांना त्रास होता कामा नये यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करताना दिसत होते. आम्हाला आशुतोषला खूप दिवसांपासून दगडूशेठ गणपतीला न्यायचे होते ते या निमित्ताने झाले. विशेष व्यवस्था, दर्शन, सर्व मुलांनी मिळून केलेले अथर्वशीर्ष पठण हे खूपच आनंद देणारे होते. केसरी वाड्यात सर्वांनी मिळून केलेला नाश्ता आणि त्यानंतर झालेले पद्य खूपच छान होते. मला तर माझ्या शाळेतील दिवसांची आठवण झाली आणि डोळ्यांत कधी पाणी आले ते कळलेच नाही. एक प्रसंग आवर्जून नमूद करावासा वाटतो, आदिवासी संग्रहालय बघायला जाण्याचा. आमचे अनेक प्रश्न; तिथे रॅम्प आहे का? पायऱ्या किती आहेत? इत्यादी शोधायचा प्रयत्न केला तो मिळाला नाही म्हणून आम्ही शेवटच्या ठिकाणी यायचा निर्णय घेतला आणि ताईची परवानगी घेऊन बहिणीकडे गेलो. पण अगदी अर्धा ते पाऊण तासात ताईचा फोन दादा, आशुतोषला आणा फक्त १ पायरी आहे. आपण दाखवू त्याला. खरंच ही तळमळ आता खूप दुर्मिळ होत आहे पण ती आम्ही अनुभवत होतो आणि आनंद घेत होतो. आम्ही येईपर्यंत मुलांचे पाहून झाले होते. परंतु राकेश सर आणि स्वातीताई थांबले होते आशुतोषला संग्रहालयात घेऊन गेल्यावर ते पुढे रवाना झाले त्यातही ताई ''आशुतोषला हे बघ, ते नक्की बघ'' हे असे सांगताना दिसत होत्या. तर ''दादा तुम्हाला त्याला घेता येईल ना का मी थांबू?'' असे राकेश सर विचारत होते पण तिथे ॲडजेस्ट होत आहे म्हटल्यावर ते पुढे

निघाले. सदन कमांडला पोहोचल्यानंतर तर मुलांनी खूप धमाल केली. स्वच्छ परिसर, नीटनेटकेपणा, लष्करी साहित्य आणि सुंदर संग्रहालय पाहून विद्यार्थी आणि खरे सांगायचे तर आम्हीसुद्धा भारावून गेलो होतो. खरं सांगू लहान मुलं मनानी खूप निर्मळ असतात. सतत एकमेकांची खोडी काढण्याबरोबर एकमेकांची काळजी घेतानासुद्धा दिसत होते. हुलावळेदादा, काळोखेदादा व इतर सर्वांचे, ही छोटेखानी सहल यशस्वी होण्यासाठी धडपड जाणवत होती. सर्वजण गाडीत बसत असताना आशुतोषने खूप मजा आली या अर्थाने ताईंना धन्यवाद देताना ताईच्या डोळ्यात नकळतपणे आलेले पाणी खूप काही सांगून गेले. पुन्हा त्या निमित्ताने आम्ही सर्वांनी आपले बालपण अनुभवले. मुलांकडे असलेली खूप ऊर्जा, निर्मळ आणि निर्व्याज प्रेमाची अनुभूती घेतली आणि दिवस कधी संपला ते कळलेच नाही.

**अमोल गाडगीळ**
पालक

## शिल्पकला

मी अनुभव अभिरुचीमध्ये शिल्पकला हा विषय दोन वर्ष शिकवत आहे. यावर्षी विद्यार्थ्यांना शिल्पकला विषय व्यावसायिक पद्धतीने कसा हाताळायचा हे शिकवले. त्यासाठी एक छोटेसे उदाहरण म्हणून मूर्ती विक्रीची योजना आखली. बाजारात मूर्ती घडवण्यापासून ते विक्रीपर्यंतचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. एक मूर्ती तयार करून त्याचे प्रोडक्शन कसे करायचे हे कळावे म्हणून आम्ही मूर्तीचा साचा बनवला. त्या साचा मधून साधारण १०० मूर्ती तयार केल्या. त्यानंतर मूर्ती घडताना त्यातील सुबकता कोरीवपणा व नंतर आकर्षक रंग संगती याचा वापर कसा करायचा हे दाखवले. त्यानंतर विक्री असा पूर्ण अनुभव यावर्षी विद्यार्थ्यांना दिला. याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना या विषयाची जास्तीत जास्त आवड निर्माण व्हावी म्हणून पूर्वीपासून ते आजपर्यंत शिल्पकलेत कशा पद्धतीने शिल्पकारांनी काम केले याचे व्हिडिओ, फोटो व त्यांच्या कामाची पद्धत हे दाखविले. त्याचा फायदा विद्यार्थ्यांच्या कामात जाणवला. विद्यार्थ्यांना शिल्पकला विषय निवडल्यावर आपण या विषयात काय काय प्रकार शिकणार आहोत हे समजावून सांगितले मातीकामाव्यतिरिक्त वेगवेगळे प्रकार जसे लमासा आर्ट क्ले, निमेशन्स क्ले, साबणावरील कोरीव काम, मेणापासून बनवण्यात येणारे शिल्प, सिपोरेक्स दगडावरील कोरीव काम व शिल्प, पीओपी कोरीव काम इत्यादी विषय शिकविले. यामुळे विद्यार्थ्यांना शिल्पकला विषयाची आवड निर्माण झाली. विद्यार्थी इतर वेळी तासाव्यतिरिक्त मोकळीक मिळाल्यास स्वतः येऊन मातीकाम करत होते. आपल्या विद्यालयातील मोठी गणपतीची मूर्ती रंगविण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना देता आला याचा विशेष आनंद आहे.

**अध्यापक – राकेश शामराव भुजबळ**

**अभिनंदन –** 'शिक्षण विवेक' आयोजित काव्य अभिवाचन स्पर्धेत 'पूर्व माध्यमिक विभागातील इयत्ता सातवी–आठवीच्या गटामध्ये चि. चैतन्य पुरोहित, चि. पुरुषोत्तम इनामदार आणि कु.पूर्वा शहा यांच्या गटाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. तर पाचवी–सहावीच्या गटामध्ये इयत्ता पाचवी क मधील, कु.आरोही देशपांडे, चि.ओम कळके, आणि चि.आर्यन हासबे यांच्या गटाला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

अनुभव

# पालक मेळावा

नमस्कार

गुरुकुलात शनिवार दि. १५ एप्रिल २०२३ रोजी झालेला पालक मेळावा ही एक पालकांसाठी अभूतपूर्व पर्वणी होती. सकाळी ७ वाजता हप्पा हुय्या आणि श्रीगणेशाच्या गजरात शाळेला सुरुवात झाली. यानंतर झालेली एकामागोमाग एक सत्रे म्हणजे शारीरिक, वैचारिक, बौद्धिक खाऊने परिपूर्ण असलेली मेजवानीच होती. आ. लताताई भिशीकर यांनी साधलेला संवाद हा बराच काही विचार करायला लावणारा होता. 'गोष्ट इथेच संपत नाही' या कथाकथनाच्या सत्रातून अभिमान आणि भावनिक ह्या दोन्ही भावनांनी भरलेला शिवाजी महाराजांचा दक्षिण दौरा ऐकताना सर्व जण स्तब्ध होते. महाराजांबद्दलचा अभिमान आणि आदर अधिकच वाढला. गुरुकुलातील पंचकोशाधारित शिक्षणाची ओळख झाल्यानंतर आमचे पाल्य या विद्यालयात असल्याचे समाधान वाटले.

प्रश्नमंजुषेने आपल्याला गुरुकुलबद्दल किती माहिती आणि आपला पाल्याशी किती संवाद आहे हे आयोजकांनी जाणले. मौनाभ्यास लिहिताना काहींना परीक्षेला बसल्याचा अनुभव आला. तर काहींना सुचलेले कागदावर उतरवणे अवघड गेले; तर काहींना २ पाने कमी पडतील असं वाटत होते.

एकत्रित नाष्टा, जेवण, संध्याकाळचे चहापान छानच झाले. गटचर्चेतून बऱ्याच कल्पना, विचार ऐकायला मिळाले त्याचा निश्चित गुरुकुलसाठी फायदा होईल.

*'प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया'* ह्या सार्थ मनोगताने सांगता होऊन संपूर्ण दिवस छान आनंदात गेला. नवीन पालकमित्र मिळाले आणि गुरुकुल अधिक जवळून अनुभवता आले. आम्ही सर्व पालकांनी पुन्हा एकदा प्रत्यक्ष शाळा, शाळेचा अभ्यास या सर्वांचाच अनुभव घेतला.

एकूणच एक उनाड दिवस चांगला सार्थकी लागला याचा आनंद आहे.

विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या पालाकांचाही सर्वांगीण विकास साधणारा हा गुरुकुल विभाग आणि एकूणच ही शाळा आमचे भाग्य थोर म्हणून आम्हाला लाभली याचा आनंद वाटतो.

**मिलिंद धारवाडकर**
पालक

अनुभव

# प्रेरणासेतू

नमस्कार,

मी श्रेया भाटे, आज मी आमच्या नववीच्या वर्षात झालेल्या उपक्रमाबद्दल म्हणजे प्रेरणासेतू उपक्रमाबद्दल माझा अनुभव कथन करणार आहे. हा उपक्रम दर शनिवारी नियमितपणे राबवला जायचा. आम्ही पूर्ण आठवडा फक्त शनिवारच्या या उपक्रमाबद्दल विचार करायचो व याचीच वाट पाहायचो. हा कार्यक्रम दूरस्थ पद्धतीने पार पडायचा. दर आठवड्याला आम्ही एक नवीन करिअर ऑप्शनची ओळख करून घ्यायला लागलो.

आमच्या वयात करिअर क्षेत्र निवडण्याचा महत्वाचा प्रश्न उद्‌भवतो. अशावेळी ही व्याख्याने जणू या प्रश्नाचे रामबाण उत्तर होते. काही लोकांना आपल्या भावी करीअरची काहीच कल्पना नव्हती, काही विद्यार्थी आपली आवड जाणत होते पण आपले करिअर काय असावे हे त्यांना नेमके कळत नव्हते, पण या उपक्रमामुळे आमचा मार्ग सुलभ झाला. या उपक्रमामुळे आमच्या विचारांना चालना मिळाली, आमच्या आवडी-निवडींची जाणीव आम्हाला झाली. मला डॉ. सई जोशी यांचे मानसशास्त्राचे व्याख्यान व डाटा ॲनालिसिस, फॉरेन्सिक अकौंटिंग, साउंड इंजिनियरिंग, ट्रॅफिक इंजिनियरिंग, कोडिंग, आर्किटेक्चर ही सत्रे फार आवडली. ही सर्व सत्रे कुतुहल आणि जिज्ञासा वाढवणारी होती.

यामुळे आमच्या ज्ञानात भर पडली व त्या क्षेत्राविषयी सखोल ज्ञान प्राप्त करण्यास मदत झाली. यामुळे आम्हाला प्रोत्साहन मिळाले व आम्ही आमच्या करिअरच्या प्रवासाची पहिली पायरी चढलो. आम्हाला यश मिळवण्याचे विविध मार्ग सापडले व भारतात करिअरच्या संधी कशा उपलब्ध करून घ्याव्यात व कशा मिळवाव्यात ते समजले. या उपक्रमाचा आम्हाला खूप फायदा झाला व याच्या पुढच्या सर्व वर्गासाठी हा उपक्रम घ्यावा असे मला वाटते. या उपक्रमासाठी आम्ही शाळेचे आभारी आहोत.

**श्रेया भाटे**

विद्यार्थिनी- इ. १०वी

***

अनुभव

# संयम प्रकल्प

नमस्कार

श्रीरंग व्यवहारेची आई या नात्याने मी सर्व प्रथम ज्ञान प्रबोधिनीच्या वयात येणाऱ्या मुलांमधील बदलांवर प्रकाश टाकणाऱ्या आणि ते बदल कसे स्वीकारावे याबाबत मार्गदर्शनपर संयम या उपक्रमाबद्दल शाळेचे मनःपूर्वक आभार!!

साधारणपणे सर्वच पालकांना आपले मूल वयात आले की एक प्रकारचं दडपण येतं. त्याच्यात होणारे शारिरीक तसेच मानसिक बदल हे सगळे उघड्या डोळ्यांनी दिसत असतात पण बऱ्याच वेळा पालक मुलांना समजावण्यास असमर्थ ठरतात किंवा काही वेळा मुलांसोबत पालकांचा संवाद कमी पडतो. अशा वेळी एखाद्या मानसतज्ज्ञाची आठवण होणे सहाजिक आहे. कारण मुलांच्या मनाला ही तज्ज्ञ मंडळी अगदी बेमालूमपणे हात घालू शकतात आणि त्यांच्या मनाचा तळ शोधू शकतात.

आपल्या शाळेने पुढाकार घेऊन संयम उपक्रम सुरु केला. मुलांना वेगवेगळ्या सत्रात वेगवेगळ्या विषयांवर संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले आणि त्याचा अतिशय सकारात्मक असा परिणाम मुलांमध्ये जाणवला. मुलांची घरात वागण्या-बोलण्याची पद्धत अजून चांगली झाली आहे. घरातल्या लोकांची काळजी करण्याची, मदत करण्याची मानसिकता तयार झाली आहे. मित्र-मैत्रिणींशी छान संवाद साधला जातोय. मुख्य म्हणजे lockdown मधला मित्र झालेला मोबाईल आता जरा आपणहून बाजूला सारला जातोय यात अतिशय समाधान वाटते आहे. चांगल्या संगतीचे परिणाम कसे चांगले होतात याचे महत्त्व मुलांना पटले आहे. शारीरिक तसेच मानसिक बदल होत असताना त्या बद्दल मोकळेपणाने पालकांशी मुले संवाद साधत आहेत. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी येणाऱ्या पुढील वर्षात ही असेच नावीन्यपूर्ण उपक्रम शाळा सिद्धिस नेईल याची खात्री आहे.

**सौ शर्वरी व्यवहारे**- पालक

**अभिनंदन** - कलापिनी संस्था तळेगाव दाभाडे आयोजित, कै. डॉ. शं.वा.परांजपे स्मृती बालनाट्य स्पर्धेत पूर्व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'गोष्ट मैत्रीची' या नाटकाला सांघिक तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. याच स्पर्धेत कु.स्वामिनी गावडे हिला वैयक्तिक अभिनयासाठी उत्तेजनार्थ, सौ. मयुरी जेजुरीकर यांना रंगभूषा, वेशभूषेसाठी द्वितीय तसेच दिग्दर्शनासाठी तृतीय क्रमांक आणि श्री. समाधान सुसर यांना लेखनासाठी द्वितीय क्रमांकाचे अशी एकूण ४ पारितोषिके मिळाली.

# अभ्यास पर्व

यंदाच्या वर्षी २६ जानेवारी २०२३ रोजी आम्ही सर्वांनीच भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यालयात अभ्यास पर्वाचा एक आगळावेगळा उपक्रम राबवला होता. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीला ७५ वर्षे पूर्ण झाली म्हणून ७५ वेगवेगळ्या विषयांचा सखोल अभ्यास करायचा असा आमचा निश्चय होता. हे सर्वच विषय विविध क्षेत्रांमधील होते आणि यात सहभागी असणारे सदस्यही विविध विभागांमधून येणार होते. नववी दहावीचे विद्यार्थी, अध्यापक, परिसरातील नागरिक ते आजी माजी पालकांपर्यंत साधारण ७०० अभ्यासक यात सहभागी झाले होते. या विषयांमध्येही वर्गीकरणाचे काही निकष होते. सांस्कृतिक, पर्यावरण, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी सारख्या अनेक गटांमध्ये हे विषय विभागलेले होते.

गेले वर्षभर या विषयावर अनेक उपक्रम प्रशिक्षणे आणि गट चर्चांचे आयोजन केले होते. प्रत्येक विषयाचा एक विद्यार्थी गट होता व गटप्रमुख म्हणून शिक्षक ठरवले होते. विद्यार्थ्यांनी आपापल्या आवडीनुसार विषय निवडले व जोमाने काम/अभ्यास केला.

हा उपक्रम योगायोगाने गणेशोत्सवादरम्यान सुरू झाल्याने विद्यार्थ्यांनी केलेला अभ्यास विविध सार्वजनिक गणेश मंडळे व मोठ्या सोसायट्यांमध्ये मांडण्याचे ठरले. याला काही मर्यादा असल्यामुळे थोड्याच विषयांची मांडणी होऊ शकली. सर्वच विषयांचा अभ्यास अतिशय सखोल व व्यापक केला होता.

या शिस्तबद्ध अभ्यासामागे तेवढेच काटेकोर नियोजन सुद्धा होते. कोणत्या गटाचे कोणते उपविषय, कोणता गट, कोणत्या वर्गात, कधी बसणार याचे सर्व नियोजन सर्वांना समजावले. शाळेत प्रार्थनेनंतर लगेचच सर्वजण आपापल्या ठरलेल्या वर्गात जायचे व काम /अभ्यास सुरू करायचे.

याला उत्तमतेचे टोक यावे यासाठी अभ्यास कसा करावा इथपासून ते सादरीकरण, पुस्तक संपादन, लेखन कसे असावे इथपर्यंत प्रशिक्षणे झाली. यात मार्गदर्शन करण्यासाठी प्रबोधिनीच्या पुणे केंद्रातून श्री. अजितराव कानिटकर, श्री. प्रशांत दिवेकर सर आदी मंडळींनी पुढाकार घेतला. निगडी केंद्राच्या श्री. आदित्यदादांनी घेतलेल्या संकल्पना अराखाड्याचाही यात समावेश होता. यासर्वांमुळे सर्व विषयांच्या अभ्यासाला गती मिळाली आणि एक निश्चित दिशाही मिळाली.

**अभिनंदन –** समर्थ भारत अभियान आयोजित, मनाचे श्लोक पाठांतर अंतिम स्पर्धेमध्ये इयत्ता ६क मधील चि.स्वर पत्तेवार आणि इयत्ता ६ब मधील चि.विश्वराज निघोट यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले.

कोणतेही काम / अभ्यास केला, क्षेत्रभेटी दिल्या तर त्याचे वेळच्या वेळी वृत्तलेखन होत होते. त्यामुळे अभ्यासाच्या शेवटच्या टप्प्यावर आम्ही सर्वजण विषयांची सुयोग्य बांधणी करून अहवाल लेखन करत होतो. या सर्व गोष्टी सुरळीत पार पाडाव्यात यासाठी शिक्षकांच्या नियमित बैठका होत होत्या. बैठकांमधले मुद्दे शिक्षक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत होते.

याचे सादरीकरण पुस्तक रूपाने असावे असे ठरले आणि संपादन मंडळातील ७/८ सदस्यांनी पुस्तकांच्या उत्तम निर्मितीसाठी सिंहाचा वाट उचलला. अशा एका नियोजित समायोजनाने केलेल्या अभ्यासाचे लेखन हे पुस्तक स्वरूपात प्रकाशित केले गेले आहे.

उपक्रमात इयत्ता नववीच्या सर्व विद्यार्थ्यांनी व निगडी केंद्रातील सर्व अध्यापकांनी सहभाग घेतला होता तसेच पालकांनी युवक युवतींनी देखील ऐच्छिक सहभाग नोंदवला.

***

## फिनलंड दौरा

ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रातील पूर्व माध्यमिक विभागाचे प्रमुख श्री. शिवराज पिंपुडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून शिक्षण शास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत. भारत-फिनलंड या दोन देशांतील शैक्षणिक क्षेत्रातील करारांतर्गत विद्यार्थी देवघेव योजना प्रथमच राबविण्यात आली. या योजनेनुसार पुणे विद्यापीठाच्या शिक्षणक्षेत्राचा अभ्यास करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना फिनलंड देशात जाऊन तेथील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करण्याची संधी प्राप्त झाली. या दौऱ्यासाठी श्री. शिवराज पिंपुडे यांची निवड करण्यात आली होती. फिनलंड येथील Oulu विद्यापीठ आणि तीन शाळांचा अभ्यास अशा स्वरूपाचा हा सात दिवसांचा दौरा होता. या दौऱ्याचा सर्व खर्च फिनलंड देशाकडून करण्यात आला.

दौऱ्याच्या निमित्ताने फिनलंडमधील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करता आला. तेथील अध्ययन अध्यापन प्रक्रियेची वैशिष्ट्ये जसे की Ph D पर्यंत फिनीश भाषेतून शिक्षण, सुमारे ९०% सरकारी शाळा, निःशुल्क शिक्षण, स्वयंपाक-संगीत-हस्तकला यांचा अभ्यासक्रमात समावेश इत्यादी वैशिष्टये समजून घेता आली. तेथील संस्कृतीचे, वैशिष्ट्यपूर्ण निसर्गाचे ओझरते दर्शन घडले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे सर, एम. एड. कोर्स समन्वयक डॉ. वैभव जाधव सर यांचे मार्गदर्शन या दौऱ्यासाठी लाभले.

**श्री. शिवराज पिंपुडे**
विभाग प्रमुख पूर्व माध्यमिक विभाग

अनुभव

# अभ्यासोनी अनुभवावे ..

अमृत महोत्सवी वर्षात ७५ विषयांचा गटाने अभ्यास करणे आणि गेल्या ७५ वर्षात आपल्या आवडीच्या विषयात कोणकोणत्या घटना घडल्या हे जाणून घेणे अशा स्वरूपाचे अभ्यासपर्व असणार आहे असे २६ जानेवारी २०२२ रोजी सांगण्यात आले आणि आपल्या आवडीचा विषय निवडण्याचा फॉर्म गटावर आला. विज्ञानाची अध्यापिका म्हणून माझी नजर विज्ञान प्रगती किंवा शैक्षणिक धोरणे याकडे जाणे सहज होते. पण ही सहजता का कोणास ठाऊक आलीच नाही. असे का घडले हे मलाही समजत नव्हते. पण २०१३-१४ च्या काळात स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना भारतीय राज्यघटना या विषयाची ओळख झाली होती आणि अक्षरश: त्या विषयाची व्याप्ती आणि भारतीय म्हणून त्या विषयाचे असलेले महत्त्व या विचारांनी मी भारावले होते. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास बंद केला मी, पण ते भारावलेपण इतके प्रभावी होते की राज्यघटना हा विषय दिसताच 'हीच ती संधी; या विषयाशी पुन्हा मैत्री करायची'. असा विचार आला आणि फॉर्ममध्ये त्या विषयाची निवड केली.

'भारतीय म्हणून जगण्याचा धर्मग्रंथ कोणता असेल तर ही राज्यघटना.' ही राज्यघटना लिहिणाऱ्या मंडळींचे मला अप्रूप वाटते. भारताचे एकसंघत्व टिकविणे आणि तरी प्रत्येकाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी त्यांना अधिकार देणे; ही कसरत या दिग्गजांनी कशी केली असेल? ४२ आणि ४४ व्या घटना दुरुस्ती वेळी काय परिस्थिती असेल? या loopholes मधून राज्यघटनेचे doctrine शाबूत राहावे म्हणून काय काय घडले असेल हे जाणून घेण्याची इच्छा होती.

सर्वात जास्त सदस्य न्याय या गटात असल्याचे लक्षात आले. अनेक माजी विद्यार्थी, वकील पालक, शालेय विद्यार्थी, शिक्षक असे या गटात होते. परंतु सर्वांच्या वेळा जुळून येत नव्हत्या त्यामुळे सुरुवातीचा संपर्क, अभ्यासाची दिशा याबाबत असणारे औत्सुक्य थोडे लांबले गेले. गटाची रचना बदलली आणि 'न्याय' या गटात आम्ही १७ /१८ जण हे न्यायव्यवस्था, राज्यघटना, माहितीचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, अन्न मिळवण्याचा अधिकार, महिला आयोग, वन अधिकार कायदा या विषयांचा अभ्यास करण्यासाठी गटात स्थिर झालो. एक वरिष्ठ आणि दुसरे विद्यार्थी अशी मोट बांधण्याचा माझा प्रयत्न होता. 'न्याय गटाला आपल्याला न्याय द्यायचा आहे' ही गटाची tagline होती.

अभ्यासाची दिशा ठरवित असताना प्रश्न कौशल्याचा उपयोग केला. सामान्य नागरिक, आपल्या घरातील मंडळी डोळ्यांसमोर आणून सुरुवातीला तसे प्रश्न शोधले. Concept map या कृती कार्यक्रमाचा सर्वांना

खूपच फायदा झाला. अक्षरश: शेवटच्या पंधरा मिनिटात तयार केलेल्या आमच्या concept map ची जेव्हा चर्चा झाली तेव्हा गटाचा हुरूप वाढला आणि त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी गटातील प्रत्येक सदस्याने गुणवत्तापूर्वक माहितीचे स्रोत हाताळायला सुरुवात केली. प्रत्येकाच्याच टिपणाचे वाचन करणे तसे सुरू होते. प्रत्येकाने त्यांच्या विषयाचे वाचन केले, विद्यार्थ्यांशी त्याविषयी चर्चा केली. टिपणे काढली, गटातील सदस्यांची मते घेतली आणि आपला अभ्यास सुरू ठेवला.

जेव्हा अभ्यास पर्वाचा पुढचा टप्पा क्षेत्र भेटी आणि व्यक्ती भेटी असा आला तेव्हा गटातील आम्ही सर्व 'शहाणे' मुंबई हायकोर्टाची पायरी चढलो. या एका दिवसाच्या मुंबई दौऱ्यात सर्वांच्याच पदरात मोलाचे अनुभव पडले आणि आपण किती महत्त्वाचा विषय निवडला आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली. श्री विजय शेटे या मंत्रालयातील अधिकाऱ्यांमुळे विधानसभा, विधानपरिषद, मंत्रालय, तेथील अधिकाऱ्यांशी संवाद, उपमुख्यमंत्र्यांचे कार्यालय बघणे, सचिव श्री. श्रीकर परदेशी यांची प्रबोधिनीचे सदस्य म्हणून आम्हाला मिळालेली पाच मिनिटांची सदिच्छा भेट, आम्ही मंत्रालयात गेलो आहोत याचे updates प्रशालेतील स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख श्री. विवेक कुलकर्णी सरांना अर्ध्या तासात समजणे हे सारेच भारावून टाकणारे होते. नववी, दहावीची मुले तर अभ्यास पर्वातील या अभ्यासासोबत मी भविष्यात इथे कोठे असेल याची स्वप्ने रंगवू लागली होती. टीव्हीवर दिसणाऱ्या या गोष्टी आज प्रत्यक्षात बघत असताना तेथील कामाचे, पदाचे स्वरूप, गांभीर्य प्रत्येकालाच समजत होते.

मुंबई उच्च न्यायालयातील सिक्युरिटी बघून तर मुंबई पोलिसांबद्दल आदर वाढला. आम्हाला आत प्रवेश मिळण्यासाठी आमच्या गटातील वकील दिनेश सर यांनी स्वतःचे बार कौन्सिलचे ओळखपत्र तिथे जमा केले. आमच्या प्रबोधिनीच्या गणवेशात असलेल्या पलटणला पाहून 'कोर्ट बघायला आलेल्या शाळेला' कोर्टातील सगळेजण न्याहाळत होते. या उपक्रमाविषयी ज्येष्ठ विधितज्ज्ञ ॲड. उदय वारूंजीकर यांनी शाळेचे कौतुक केले. कोर्ट कसे बघायचे आणि कोर्टात कामकाज कसे चालते याविषयी उत्तम मार्गदर्शन केले. कोर्टातील संग्रहालयाने तर आमच्यापुढे ७५ वर्षापूर्वीचा देखील पट उभा केला. या मुंबई दौऱ्याने आपण योग्य दिशेने मार्गक्रमण करत आहोत याबद्दल खात्री निर्माण होत होती. प्रबोधिनीच्या गटबांधणीच्या विविध पद्धतींमुळे शाळेत वेगवेगळ्या विभागात काम करणाऱ्या शिक्षक, विद्यार्थ्यांमध्ये न्याय विषयाचा अभ्यास हा समान धागा असू शकतो हे या उपक्रमातून लक्षात आले. नाहीतर, आमच्यापैकी प्रत्येकजण फक्त एकमेकांकडे बघून छान हसणे इतकाच संवाद होत असे. आता मात्र आमच्यात दिलखुलासपणे गप्पा होऊ लागल्या.

या सर्वांमधून प्रत्येकाचे एकेक कौशल्य लक्षात येत होते आणि सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे २६ जानेवारी २०२३ रोजी न्याय गटाला अभ्यास पर्वाची मांडणी करण्याची मिळालेली संधी. सर्वांसाठीच ही आनंदाची पर्वणी होती. अभ्यासपर्व समन्वयक शुभमदादा गायकवाड याने जेव्हा मला सांगितले की मला

ही मांडणी करायची आहे तेव्हा नकळतपणे एक निरागस आनंद व्यक्त झाला. कारण हे पूर्ण surprise होते. उत्तम गटकार्य केल्याचे हे फलित होते.

श्री. आदित्यदादा, श्री. शिवराजदादा, मा. श्री. मनोजराव देवळेकर या सर्व वरिष्ठ सदस्यांनी गटाची स्थिरता राखण्यापासून, मुंबई दौऱ्याला पूर्ण पाठिंबा देण्यापासून ते व्याख्यानाचे स्क्रिप्ट गुणवत्तापूर्ण करण्यापर्यंत मागेल ते साहाय्य दिले. २० मिनिटांच्या व्याख्यानात न्याय या विषयाची सामान्य माणसाच्या आयुष्यातील महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. आप्तेष्ट, मित्र मंडळी यांच्याकडून मिळालेली कौतुकाची थाप आयुष्यातील सतरा वर्षे न्याय या विषयाची करत असलेली श्रवणभक्ती आणि या गटासोबत केलेला प्रामाणिक अभ्यास याची ही पोचपावती होती.

आपल्यावर अन्याय होऊ नये असे सर्वांनाच वाटत असते पण न्याय्य वागणूक म्हणजे नेमके काय याचा प्रत्येकाने नक्कीच अभ्यास करावा. पदवीसाठीच केवळ नव्हे तर स्वतःला आणि समोरच्या व्यक्तीलाही न्यायाचा comfort देण्याइतपत आपण सक्षम व्हावे यासाठी.

**सौ. स्मिता माने** – अध्यापिका

## मल्टीमीडिया

खरं तर अभिरुचीला कुठला विषय निवडू असा सल्ला मला हर्षने विचारल्यावर तू मल्टीमीडिया घे कारण तुला मोबाईल व्यवस्थित हाताळता येत नाही असे मी त्याला सांगेतले. शेवटी त्याने मल्टीमीडिया हा विषयच निवडला व मल्टीमीडियाचे ऑनलाईन तास सुरु झाले. सुरुवातीला ऑनलाईन तासिकांत त्याला फोटो काढण्याचे वेड लागले. मल्टीमीडियाच्या प्रत्येक तासिकेच्या शेवटी होणाऱ्या सायबर सिक्युरिटी बद्दल घरी चर्चा होऊ लागल्या. पहिल्यांदा मोबाईलचं जास्त ज्ञान नसणारा माझा मुलगा आता कोणत्या aap ला कोणती परमिशन द्यायची, कोणती काढून घ्यायची व ते कसे महत्वाचे आहे हे सांगून तो मोबाईल हाताळू लागला. जेव्हा प्रत्यक्ष शाळा सुरु झाली तेव्हा उत्साहात अजूनच भर पडली. पूर्वी कॅमेरा हा खूप महाग आहे व त्याला हात लावू नकोस असे प्रत्येक ठिकाणी मुलांना सांगितले जायचे. असा कॅमेरा मुलांना प्रत्यक्ष हाताळायची संधी मिळाली. नंतर त्याने व्हिडिओ कॅमेरा शिकून शाळेतील काही छोटे कार्यक्रम शूट केले व सरांकडून शाबासकी मिळविली. २ दिवसांची पूर्ण नॅशनल कॉन्फरन्स पियुष व हर्षने सरांच्या मदतीने शूट केली व ती युट्युब लाईव्ह केलेली होती ही मला वाटणारी त्याची सर्वात मोठी अचिव्हमेंट. यामुळे त्यांना एक खूप मोठा व चांगला अनुभव मिळाला. मल्टीमीडियात वर्षभर व्हिडिओ एडिटींग, vfx, फोटोग्राफी अशा अनेक गोष्टी शिकता आल्या. मी शाळेचे व मल्टीमीडियाच्या सर्व शिक्षकांचे आभार मानते की त्यांनी सर्व मुलांना ही एक चांगली संधी उपलब्ध करून दिली. याचा सर्व मुलांना भविष्यात संधी शोधण्यासाठी खूप फायदा होईल असे मला वाटते.

**प्रतिभा पाटील**
पालक

अनुभव

# अभ्यासपर्व

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रामध्ये झालेला अतिशय गाभ्याचा आणि महत्त्वाचा उपक्रम ! या निमित्ताने ७५ विविध गटामध्ये सुमारे ७०० सदस्य विविध विषयांचा अभ्यास करत होते. अभ्यास करत असलेल्या प्रत्येक सदस्याला भारताच्या गेल्या ७५ वर्षातील प्रमुख टप्प्यांविषयी, किमान एका विषयाची सखोल माहिती होणे व अभ्यासाअंती त्याची मांडणी करता येणे असे मुख्य उद्दिष्ट या अभ्यासामागे होते. या सर्व प्रक्रियेमध्ये मला समन्वयक म्हणून काम करायला मिळाले याचा विशेष आनंद वाटतो.

सुरुवातीला मला इतक्या मोठ्या गटाला हाताळणे प्रचंड अवघड वाटत होते. सर्व गटांपर्यंत योग्य तो निरोप पोहोचवणे आणि त्यानुसार त्यांचा प्रतिसाद घेणे यासाठी फार वेळ लागेल असे वाटले होते. मात्र विद्यालयातील सर्वच अध्यापकांची गटबांधणी, एकमेकांमध्ये असलेला सौहार्द व बहुतांश सदस्य तत्पर प्रतिसादी असल्यामुळे माझे काम अतिशय सहज पार पडत होते. ७५ विषयांचे ७५ विषयप्रमुख, या विषयांचे १२ गट पाडून त्याचे १२ गटप्रमुख अशी रचना केलेली होती. या रचनेमध्ये अनेकदा विषयप्रमुख किंवा गटप्रमुख काही अडचणींमुळे प्रतिसाद देऊ शकले नव्हते. परंतु गटातील इतर सदस्यांच्या तात्काळ प्रतिसादी स्वभावामुळे व त्यांच्या पुढाकारामुळे काम पुढे सरकले. यामुळे माझी फारच मदत झाली.

अभ्यासपर्व काळामध्ये या सर्व प्रक्रियेमध्ये माझी वैयक्तिकरित्या निगडी केंद्रातील अनेक नवीन सदस्यांशी ओळख झाली. यानिमित्ताने सर्व सदस्यांबरोबर मला संवाद करता आला, त्यांच्यासोबत काम करता आले. मुख्य म्हणजे यात इयत्ता नववी दहावीच्या विद्यार्थ्यांपासून माजी विद्यार्थी, अध्यापक, आजी माजी पालकांपर्यंत वेगवेगळ्या वयोगटाचे आणि क्षेत्रांमधील सदस्य यात सहभागी होते त्यामुळे माझी अनुभवकक्षा आपोआपच विस्तारली असे म्हणायला हरकत नाही.

अभ्यासाच्या अंतिम टप्प्यामध्ये पुस्तक प्रकाशनाच्या कामाच्या निमित्ताने परस्पर सहकार्याचा उत्तम नमुना पाहायला मिळाला. अभ्यासपर्व उपक्रमाच्या शेवटच्या टप्प्यामध्ये फक्त तीन आठवड्यात १२ पुस्तकांचे, साधारण १२०० पानांचे मुद्रण करायचे होते. कामाचा आवाका आणि तातडी पाहून निगडी केंद्रातील संगणक व मुक्तीसोपान असे २ विभाग विभागातील सर्व सदस्यांनीशी तसेच केंद्रातील विविध विभागातील अनेक सदस्य तात्काळ मदतीसाठी आपणहून धावून आले. काम पूर्ण होईपर्यंत शेवटपर्यंत खांद्याला खांदा लावून

लागेल ती मदत करत होते हा अनुभव खरंच खूप शिकवून गेला. सर्वांचे मिळून एकत्र सहकार्य मिळाल्यामुळे सर्व काम वेळेत पूर्ण होऊ शकले.

या संपूर्ण प्रक्रियेमध्ये मला सहभागाची संधी मिळाली याबद्दल विशेष आभार. धन्यवाद !

**शुभम गायकवाड**
अध्यापक

### जैवतंत्रज्ञान

My child enjoyed these sessions a lot throughout the year. I would really thank the school for arranging this wonderful concept of abhiruchi; especially Biotech... I feel glad to know that our school has a biotech lab - which I knew before but never got any opportunity to practically learn it! But through my child, I got the chance to learn it newly! The things like microgreens, cocopeat, bioluminescence , DN model- making , bamboo day , plant-tissue culture were newly known to me. Ultimately, these sessions helped to grow our home-plants even good. Thank you so much, Sagarika Ma'am and our school for giving my child this educational yet overwhelming experience!

**Parent – Kanchan S. Pawar,**

## योग प्रशिक्षण अनुभव

नमस्कार...

शाळेत योगाचा वर्ग चालू होणार आहे ही बातमी खूप उत्साह निर्माण करणारी आणि प्रेरणादायी होती. संकल्पच केला की एकही क्लास बुडवायचा नाही. सुरुवातीला एक तास योग म्हणजे खूप ताण येईल अशी मनात थोडीशी धाकधूक होती, पण नंतर अगदी पहिल्या दिवसापासून एक तास कसा जायचा कळायचं नाही. शिकवणाऱ्यांचा मनापासून शिकवण्याचा उत्साह खूप काही शिकवून गेला, आणि आम्ही सगळेजण एकत्रित योग केल्याचा सुद्धा खूप फायदा झाला. सगळी योगासने अगदी शास्त्रशुद्ध पद्धतीने शिकायला मिळाली. योग शिक्षकांची तर कमालच होती त्यांना अतिशय पेशंसनी सर्वांकडे लक्ष देत रोज योगासने करून घेतली. ज्याचा फायदा शब्दात सांगता येणार नाही इतका झाला. स्वतःला वेळ देता आला. स्वतःच्या शरीराला समजून घेता आलं, प्रत्येक स्नायू बोलतो हे कळलं. दिवसभरात उत्साह टिकून राहिला. योगनिद्रा हा एक अप्रतिम अनुभव! हा उपक्रम राबविल्याबद्दल शाळेचे व योगशिक्षकांचे शतशः आभार !

मी माझ्या वतीने सांगते की मी रोज अर्धा तास का होईना योगासने करेन.

**रेवा कुलकर्णी**
अध्यापिका

# काश्मीर दौरा

कलम ३७० या अभ्यासपर्वातील गटाने नुकताच काश्मीर येथे अभ्यास दौरा पूर्ण केला. पुस्तकी अभ्यासानंतर प्रत्यक्ष अनुभवातून काश्मीरचा अभ्यास करणे हा यातला मुख्य उद्देश होता.

दौऱ्यासाठी काही निवडक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यात ३ विद्यार्थी, ४ विद्यार्थिनी, एक युवक व एक युवती, दोन मार्गदर्शक असा एकूण ११ जणांचा गट निश्चित करण्यात आला. दौऱ्याची तारीख २ जून ते १० जून २०२३ अशी निश्चित केली गेली. पूर्वतयारी म्हणून विद्यार्थ्यांनी काश्मीर मध्ये कार्यरत असणाऱ्या काही निवडक व्यक्ती बरोबर संवाद साधला. त्यातून तेथील सामान्य नागरिकांशी कशाप्रकारे संवाद साधावा अशी माहिती घेतली. ज्ञानसेतू या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण घेतले. ज्याचा उपयोग स्थानिक मुलांशी सहज संवाद साधण्यासाठी झाला.

ह्या दौऱ्यातला पहिला मुक्काम हा आखनूर येथे लष्कराच्या छावणीत होता. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात एका सैन्य तुकडीच्या केंद्रात राहण्याची संधी मिळाली. एका गावाच्या पुढे जाऊन एक डोंगर पलीकडे जाऊन पाकिस्तानने ताब्यात घेतलेला प्रदेश पाहता आला. तारेच्या कुंपणाची अशी सीमा पहिल्यांदाच पाहिली. एका सैन्य अधिकाऱ्यांच्या माध्यमातून दोन चेकपोस्टसारख्या ठिकाणी गेलो होतो. त्याला view point असे म्हणतात. तिथून नुसत्या डोळ्यांनी दिसणारा पाकिस्तानचा भाग, दुर्बिणीतून त्यांच्या आर्मीची ठाणी आणि बरेच काही पाहता आले. कलम ३७० रद्द झाल्यानंतर भारतीय सैन्याची भूमिका, नवी आव्हाने, महिलांचा सैन्यातील सहभाग आणि त्याला असलेल्या दोन बाजू, सैन्यातील प्रशिक्षण यंत्रणा, प्रबोधिनीच्या शिक्षणातून मिळलेली शिकवण अशा विषयांवर एका अधिकारी सरांशी चांगली चर्चा झाली. याशिवाय कामाबाबत सैन्य अधिकाऱ्यांच्या आणि सैनिकांच्या भूमिका, तळमळ जवळून अनुभवता आले. रणगाडा - शस्त्रास्त्रे जवळून पाहता आली.

अभ्यास सहलीचा दुसरा टप्पा हा पूँछ येथे सुरू झाला. ७ तासांचा प्रवास करून पूँछला पोहचलो तेव्हा रात्री पावसात आमचे स्वागत करायला हरीश सर, युगुल सर आणि त्यांचा गट उभा होता. सर्वांचे हार घालून स्वागत झाले. प्रबोधिनीचा पूँछ येथे तयार झालेला दुवा यानिमित्ताने अनुभवता आला. पूँछ हे भारत पाकिस्तान सीमेवर असणारे एक गाव. सीमेवर रहाण्याची भीती आणि त्याबरोबरच जगण्यात आलेला कणखरपणा, मरणाबाबत आलेली बेफिकिरी या भागात जाणवली.

दुसऱ्या दिवशी येथील स्थानिक शाळांना भेटी दिल्या. इथे आपल्या मुलांनी स्थानिक मुलांशी संवाद साधला अर्थातच संवादासाठी माध्यम ठरले ज्ञानसेतूचे प्रशिक्षण. प्रबोधिनीच्या विद्ययार्थ्यांनी अगदी सहजतेने काश्मीरी मुलांना आपलंसं करून घेतलं. अगदी ज्ञानसेतू प्रशिक्षणानंतर मुलांचा व्हॉलीबॉलचा खेळही रंगला. मुलांच्या या संवादाने भविष्यातील भारत कसा एकसंध असेल याची जणू चुणूकच दिसली. कलम ३७० च्या दृष्टीने काही स्थानिकांशी गप्पाही रंगल्या. प्रामुख्याने मतभेद असले तरी मनभेद नाहीत असं काहीसं जाणवलं. संध्याकाळच्या सुमारास अगदी सीमेलगतच्या गुरुद्वाराला भेट दिली. गुरुद्वारातील डाइट या शासकीय संस्थेचे श्री मनमोहनजी यांच्याशी खूपच चांगला संवाद झाला. काश्मीरमध्ये असणाऱ्या स्थानिकांच्या समस्या, एकमेकांचे हितसंबंध जपण्यासाठी असणारी धडपड. त्यांच्या बोलण्यातून उलगडत गेली. मनमोकळेपणे सरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, मुलांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली.

दुसऱ्या दिवशी पूँछ ते श्रीनगर असा मुघल रोडने प्रवास सुरू झाला. हा प्रवासही जवळ जवळ ७ तासांचा होता. प्रवासात पद्य म्हणणे चालूच होते. त्यातून एक विश्वास जाणवत होता. त्याबरोबरच श्री. आदित्य दादाचे अनुभव कथन आणि आजूबाजूला असलेल्या हिमालयाच्या विहंगम दृश्याचा आम्ही सर्वजण आस्वाद घेत होतो. वाटेतील लष्कराचे चेकपोस्ट पार करत आम्ही श्रीनगरला पोहोचलो. श्रीनगर येथे शिकारा राईडच्या निमित्ताने स्थानिकांशी संपर्क करता आला. शिक्षण घेऊनही काश्मीर बाहेर उर्वरित भारतात येण्याविषयीची उदासीनता जाणवली. कलम ३७० बद्दल असणारी आपापल्या सोयीप्रमाणे बदलणारी मते समजून घेता आली.

ह्या दौऱ्याचा सहभागी असणारे विद्यार्थी व इतर सदस्यांच्या मनावर निश्चित सकारात्मक परिणाम होईल अशी आशा आहे. प्रबोधिनीचा कानाकोपऱ्यात असणारा संपर्क, आपलेपणा आणि जपलेली जिव्हाळ्याची नाती हे सर्वच या दौऱ्यातून अनुभवता आले.

**श्री. अमेय गुर्जर**
अध्यापक

***

**अभिनंदन –** उत्तरप्रदेश येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत क्रीडाकुल विभागातील चि.अमेय सूर्यवंशी आणि चि.वैभव गाढवे यांना सांघिक सुवर्ण पदक, चि. तनय सप्ताश्व याला वैयक्तिक रौप्य आणि सांघिक सुवर्णपदक, चि. ऋषिकेश पानगव्हाणे याला सांघिक कास्य पदक, चि.प्रथमेश कदम याला वैयक्तिक कास्य पदक आणि सांघिक सुवर्णपदक प्राप्त झाले.

# संगणक

## कौशल्य सादरीकरण

नियमित वर्ग

उद्दिष्टे :

१. प्रत्येक विद्यार्थ्याला संगणकाचे मुलभूत कौशल्य आत्मसात व्हावे व त्याचा वापर करता यावा.

२. विद्यार्थ्यांचा गटात काम करताना आत्मविश्वास वाढावा.

३. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळावा.

४. विद्यार्थ्यांनी मिळवलेले ज्ञान पालकांपर्यंत पोहोचावे.

**कार्यवाही :**

२०२२-२३ हे वर्ष स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव म्हणून साजरा झाले, त्यामुळे संगणक प्रकल्पांच्या बाबतीत 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' हेच विषयसूत्र ठरवून इ. ३ री ते ७ वी साठी प्रकल्पांचे विषय ठरविण्यात आले.

दोन विद्यार्थ्यांचा मिळून एक गट व प्रत्येक गटाला एक प्रकल्प देण्यात आला होता. प्रत्येक गटाला स्वतःची कल्पकता वापरून दिलेल्या वेळेत प्रकल्प पूर्ण करून तो पालकांसमोर सादर करायचा होता.

१३ फेब्रुवारी २०२३ ते २७ फेब्रुवारी २०२३ या दिवसात संगणक विभागात कौशल्य सादरीकरण सप्ताह साजरा झाला. प्रत्येक वर्गाच्या पालकांशी विभाग प्रमुख सौ. अनुजाताई भंडारी यांनी संवाद साधला.

यावेळी सर्व विभागांचे मिळून १६ अध्यापक, ६ विभाग प्रमुख व सहविचार समिती सदस्य उपस्थित होते.

सर्व पालकांचा प्रतिसाद सकारात्मक होता. इतक्या लहान वयात मुले संगणकावर इतके छान काम करीत आहेत, छोटे बालचमू उत्तम प्रेझेन्टेशन, प्रोग्रॅमिंग करीत आहेत हे कौतुकास्पद आहेच पण ते जे दाखवत आहेत, त्याचे त्यांना पूर्ण आकलन झाले आहे असे अनेक बोलके प्रतिसाद पालकांनी लेखी दिले.

| इयत्ता | एकूण वर्ग | विद्यार्थी संख्या | प्रकल्प संख्या | उपस्थित पालक |
|---|---|---|---|---|
| ३ री | ४ | १९५ | ९९ | १५९ |
| ४ थी | ४ | २०० | १०२ | १९७ |
| ५ वी | ३ | १२८ | ५२ | ५१ |
| ६ वी | ३ | १०२ | ४४ | ४३ |
| ७ वी | ३ | ११६ | ४८ | ४३ |
| ५ वी इं.मा. | १ | ५२ | १५ | १२ |
| ६ वी इं.मा. | १ | ५० | २५ | १६ |
| ७ वी इं.मा. | १ | ६० | २२ | २२ |
| ५ वी गुरुकुल | १ | ३६ | १८ | २८ |
| ६ वी गुरुकुल | १ | ३६ | १८ | ३५ |
| ७ वी गुरुकुल | १ | ३३ | १७ | १८ |
| ८ वी गुरुकुल | १ | ३२ | १६ | २० |

## संगणकाधारित विकसन प्रकल्प

**उद्दिष्टे**

कौशल्य सादरीकरणामधील प्रकल्पांच्या माध्यमातून आत्मसात केलेल्या सर्व प्रगत संगणकीय कौशल्यांचा आढावा घेणे, त्याचा योग्य वापर करता येत आहे का याची पडताळणी करणे, याचबरोबरीने विषयाचा सखोल व स्वअभ्यास करता येणे.

विद्यार्थ्यांना गटकार्य, वेळेचे नियोजन, कल्पकता, सादरीकरण याचा अनुभव देणे.

| इयत्ता | प्रकल्प विषय व संख्या | विद्यार्थी संख्या | पालक उपस्थिती |
|---|---|---|---|
| ५ वी | इंग्रजी व्याकरणावर आधारित प्राथमिकच्या विद्यार्थ्यांसाठी साहित्य निर्मिती | ४९ | ३८ |
| ६ वी | इंफॉर्मेशन टेक्नोलॉजी ऑफ इंडिया –वेबसाईट | २७ | २५ |
| ७ वी | इंग्रजी व्याकरणावर आधारित ॲनिमेटेड गाणी | ३८ | ३० |

**निष्पत्ती – विद्यार्थी**

विद्यार्थ्यांना गटात काम करता आले.

विद्यार्थ्यांनी स्वतःची कल्पकता वापरून प्रकल्प तयार केले.

विद्यार्थ्यांचे संगणकाचे मुलभूत कौशल्य विकसित झाले.

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला.

विद्यार्थ्यांना त्यांनी शिकलेल्या सॉफ्टवेअरचे सखोल ज्ञान मिळाले.

**निष्पत्ती – अध्यापक**

कौशल्य सादरीकरणासाठी निवडलेल्या विविध विषयांवर अध्यापकांचा अभ्यास झाला.

प्रत्येक विद्यार्थ्याचे मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांचे गुण लक्षात आले.

कौशल्य सादरीकरणाची तयारी करून घेताना अध्यापकांच्या कल्पकतेला वाव मिळाला आणि प्रत्येक सॉफ्टवेअरचा सखोल अभ्यास झाला.

## ● NEILIT

### विशेष उल्लेखनीय

संगणक विभागाला केंद्र सरकारच्या योजनेतील National Institute of Electronics  IT (NIELIT), New Delhi (Ministry of Electronics and Information Technology, Government of India) या विभागामार्फत Digital Literacy Course À`m Facilitation Center ची मान्यता मिळाली आहे. या अंतर्गत आपण १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ५ प्रकारच्या परीक्षांना बसवू शकतो.

विभागाच्या भवितव्य लेखात ठरविलेल्या उद्दिष्टांपर्यंत जाण्यासाठी हे एक पुढचे पाऊल आहे.

**उद्दिष्ट :**

१. विद्यार्थ्यांना ऑनलाईन स्पर्धापरीक्षेचा अनुभव देणे.

२. विद्यार्थ्यांना संगणकीय कौशल्यांचे सखोल ज्ञान देणे.

**कार्यवाही :**

शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये इयत्ता सहावी व सातवीची पहिली बॅच परीक्षेला बसली होती. यात इयत्ता सहावीचे १५ विद्यार्थी अवेरनेस इन कॉम्प्युटर कन्सेप्ट या परीक्षेला बसले होते. आणि इयत्ता सातवीचे २८ विद्यार्थी बेसिक कॉम्प्युटर कोर्स या परीक्षेला बसले होते. विद्यार्थ्यांची दिलेल्या अभ्यासक्रमावर आधारित तयारी करून घेण्यात आली. ही परीक्षा पुण्यातील मुंढवा येथे घेण्यात आली.

**निष्पत्ती : विद्यार्थी**

१. विद्यार्थ्यांचा संगणकीय कौशल्यांचा सखोल अभ्यास झाला.

२. वेळेत काम कसे करायचे हे कळाले.

३. ऑनलाईन स्पर्धापरीक्षेचा अनुभव घेतला.

# मुक्तिसोपान

*संगीत ज्ञानं परं ब्रह्म । तदारभ्य न संत्यजेत् ।* या उक्तीनुसार २००५ च्या गुरुपौर्णिमेपासून मुक्तिसोपान विभागाची वाटचाल सुरू आहे. भवितव्य लेखातील उद्दिष्टांनुसार वार्षिक कार्यसंकल्पात मांडल्याप्रमाणे वर्षभर कामकाज संपन्न झाले.

## दिवाळी पहाट

दिवाळीची मंगलमय प्रभात आनंदमय व्हावी, आप्तजनांच्या मेळाव्यात सांगितिक मैफिल ऐकल्यानंतर एकत्रित दिवाळी फराळाचा आनंद लुटावा या उद्देशाने धनत्रयोदशीच्या दिवशी म्हणजेच दिनांक २३ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ७ ते ९.३० या वेळात मनोहर वाढोकर सभागृहात दिवाळी पहाट संगीतसभा संपन्न झाली. यंदाची ही अठरावी दिवाळी पहाट संगीतसभा. यावेळी पिंपरीचिंचवडचे श्री. नचिकेत देव यांनी या स्वरमैफिलीत रंग भरले. सरस्वती पूजन, नटराज पूजनानंतर विद्यालयातील अभिरुची प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी गायन वादन नृत्य या तिन्ही कला एकत्रितपणे सादर करत नटभैरव रागात नटराज वंदना सादर केली.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात श्री. नचिकेत देव यांनी मिया की तोडी / दरबारी तोडी या संगीतसम्राट तानसेननिर्मित प्रातःकालीन रागाने गायन सभेला सुरुवात केली. उत्तरार्ध उपशास्त्रीय गायनाने रंगला. शास्त्रीय संगीताचे आणखी थोडे मूर्त रूप म्हणजे शब्दप्रधान आणि सूरप्रधान असलेले नाट्यसंगीत. आपण नुकताच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला आहे याचे स्मरण ठेवून सुरुवातीला स्वातंत्र्यपूर्व काळातील संगीत रणदुंदुभी नाटकातील पद 'दिव्य स्वातंत्र्य रवी', स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित संगीत 'संन्यस्त खड्ग' यातील पद 'समयी सखा न ये' ही वझेबुवा यांनी संगीतबद्ध केलेली व मा. दीनानाथ मंगेशकर यांनी गायलेली नाट्यपदे सादर झाली. नंतर पं.पद्माकर कुलकर्णी यांनी मिश्र भटियार रागात संगीतबद्ध केलेले 'तुझे नाम घेता रंगुनिया गेलो' हे दत्तभजन, संत चोखामेळा रचित 'अबीर गुलाल' ही भक्तिगीते श्री. देव यांनी गायली.

सरतेशेवटी कुसुमाग्रज लिखित 'वीज म्हणाली धरतीला' या नाटकातील 'मैफिलीचा हा किनारा' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाला श्री. उमेश पुरोहित यांनी संवादिनी, श्री. किशोर कोरडे यांनी तबला तर श्री. मिलिंद लिंगायत यांनी पखवाज साथ केली. श्री. शुभम गुरव यांनी टाळ साथ केली तर श्री. हरिभाऊ आसदकर व

तनिशा शिंदे यांनी तानपुरा साथ केली. श्री. आदित्य शिंदे यांनी सांगितिक कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण व रंगतदार निवेदन केले.

या कार्यक्रमाला शिक्षण उपसंचालक श्रीराम पानझडे, प्रभागातील नगरसेवक तसेच परिसरातील अनेक संगीतप्रेमी, संगीततज्ज्ञ, ज्येष्ठ नागरिक तसेच ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राचे अनेक स्नातक, अध्यापक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्ञान प्रबोधिनी निगडीचे केंद्रप्रमुख श्री. मनोज देवळेकर, केंद्र प्रशासक श्री. शिवराज पिंपुडे, मार्गदर्शक श्री. शरदराव सुंकर तसेच कला विशेष उद्दिष्ट गटाचे श्री. मिलिंद संत, प्रसिद्ध गायक श्री. समीर दुबळे हेही या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. भवितव्य लेखात म्हटलेल्या परिसरातील संगीतप्रेमींना एकत्र आणणे या उद्दिष्टानुसार ही संगीत सभा अविरतपणे सुरू आहे.

## क्रांतिकारकांची गौरवगाथा

आपल्या देशाने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला. या निमित्ताने आपल्या दैदिप्यमान इतिहासाचे पुनः पुनः स्मरण व्हावे, आपल्या क्रांतिकारकांचे बलिदान आठवून आपण त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे या उद्देशाने या ध्वनिपुस्तिकेची निर्मिती करण्यात आली. क्रांतिकारकांना मानवंदना देण्याचा हा अल्पसा प्रयत्न तर आहेच पण जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत या कथा पोहोचाव्यात हाही उद्देश यामागे आहे. २१ वाचक, ५ तंत्रज्ञ, १ लेखक, १ संगीतकार, २ गायक, २ वादक अशा अनेकांनी या प्रकल्पात आपले योगदान दिले. या पुस्तिकेची प्रस्तावना मराठी विश्वकोशाचे माजी अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांनी स्वतः लिहून स्वतःच्याच आवाजात ध्वनिमुद्रित करून पाठवली. सर्व ध्वनिमुद्रण ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राच्या ध्वनिमुद्रणालयात करण्यात आले आहे. दिनांक ११ मार्च २०२३ रोजी या ध्वनिपुस्तिकेचे प्रकाशन मनोहर सभागृहात डॉ. मीनल कुलकर्णी व डॉ. संपदा थिटे यांच्या हस्ते करण्यात आले. केवळ ₹ १००/- (रुपये शंभर फक्त) देणगीमूल्य देऊन https://sites.google.com/jpnvnigdi.org/audiobook-instructions/home या लिंकवर ध्वनिपुस्तिकेचे सबस्क्रिप्शन आपल्याला मिळू शकेल.

## विभागाचे वर्षभराचे उपक्रम

* **नृत्य कार्यशाळा –** ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र आणि आवर्तन गुरुकुल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कथ्थक आणि भरतनाट्यम विषयक नृत्य कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. १९ जून २०२२ रोजी झालेल्या कथक नृत्य कार्यशाळेत गुरु शमाताई भाटे यांनी तर १३ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या भरतनाट्यम कार्यशाळेत गुरु सुचेताताई भिडे चापेकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. परिसरातील अनेक विद्यार्थिनींनी या कार्यशाळांचा लाभ घेतला.

**※ सांगितिक परिपाठ –**

संपूर्ण वर्षभर शाळेतील सर्वच औपचारिक विभागात सांगितिक परिपाठ झाला. परिपाठात प्रार्थना, पद्य, विविध स्तोत्रे आदी शिकविण्यात आले. त्यायोगे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वावर सकारात्मक परिणाम होत आहे हे निदर्शनास येत आहे.

**※ गुरुपोर्णिमा**– दि. १३ जुलै २०२२ रोजी गुरुपौर्णिमेला मुक्ती सोपान वर्धापन दिनानिमित्त सर्व सदस्यांनी आपली कला सादर केली. माजी अध्यापिका आयोजित चातुर्मास कीर्तन उपक्रम सुरू केला गेला. विभागातील सदस्यांनी वाद्य साथसंगत करायचे ठरले.

**※ शारदोत्सव**– दि. ३ ऑक्टोबर २०२२ रोजी विद्यालयात शारदोत्सव साजरा केला. यात सरस्वती पूजनात मयुरी ताईने नवरात्र आरती म्हटली तर शितलताईने श्री सूक्त म्हटले. विद्यार्थ्यांनी हे शारदे मां हे गीत सादर केले. ग्रंथालयात पद्य आरती म्हटली गेली त्याची तयारी कीर्ती ताईंनी करून घेतली होती. माध्यमिकच्या विद्यार्थ्यांना विष्णुपंत सरांनी श्री सूक्त शिकवले. खंडे नवमीच्या दिवशी स्वरेशाताई व शितलताई यांनी पोथी सांगितली व यंत्र पूजन केले. त्याच दिवशी सर्व सदस्यांनी वाद्यपूजन केले.

२७ फेब्रुवारी २०२३ रोजी मराठी राजभाषा दिनानिमित्त कलापिनी तळेगाव येथे मयुरी ताईंनी नववीच्या विद्यार्थ्यांना कविता वाचनाची संधी उपलब्ध करून दिली.

**※ कला कौशल्य सादरीकरण –** इयत्ता तिसरी ते सातवी(दोन्ही माध्यम) च्या सर्व म्हणजे २० वर्गांचे कला कौशल्य सादरीकरण मार्च महिन्यात मनोहर सभागृहात झाले. प्रत्येक विद्यार्थ्याने वर्षभर शिकविलेल्या सर्व कला पालकांसमोर सादर केल्या. गायन, स्वरवाद्य, तालवाद्य, नृत्य आणि नाट्य या पाचही विषयांचा अभ्यासक्रम या निमित्ताने पालकांपर्यंत पोहोचवता आला. रंगमंचावर आपल्या पाल्यांना अनेक कला सादर करताना बघून पालक अक्षरश: भारावून गेले होते. अनेकांचे पाणावलेले डोळे त्यांच्या आनंदाची साक्ष देत होते.

**अभिनंदन –** साने गुरुजी कथामाला, पुणे आयोजित आंतरशालेय कथाकथन स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवी ते सातवीच्या गटामध्ये आपल्या पूर्व माध्यमिक विभागातील चि. अर्णव विवेक कुलकर्णी याने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले आहे.तर चि. राम चंद्रकांत भारंबे यांने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

**अभिनंदन –** अलाईव्ह संस्थेद्वारा चिऊ वाचवू अभियान अंतर्गत २० मार्च जागतिक चिमणी दिन निमित्ताने आयोजित चिमणीवर आधारित काव्यलेखन, कथालेखन व चित्रकला स्पर्धांमध्ये कथालेखन स्पर्धेत पूर्व माध्यमिक विभागातील कु आराध्या रघुनाथ हांडे हिला उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

# अटल धडपडालय

राष्ट्रीय बौद्धिक संपदा परिषद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र, नवी दिल्ली

बौद्धिक संपदा विभाग आयोजित

राष्ट्रीय बौद्धिक संपदा परिषद (National IP Conference)

ज्ञान आधारित अर्थव्यवस्था के उत्प्रेरण हेतू बौद्धिक संपदा परिस्थितिकी तंत्र का सुदृढीकरण

(Strengthening IP Ecosystem for Catalyzing the Growth of Knowledge conomy)

भारत सरकारच्या व्यापार व वाणिज्य मंत्रालय अंतर्गत उद्योग आणि अंतर्गत व्यापाराला उत्तेजन देणारा उद्योग संवर्धन आणि आंतरिक व्यापार विभाग (Department for promotion of industries and Internal Tarde)काम करतो. या विभागासोबत विविध संलग्न आणि अधिनस्थ कार्यालये आहेत. यापैकी बौद्धिक संपदा कार्यालया(IP office) कडून दरवर्षी विविध प्रवर्गात बौद्धिक संपदा नोंदणी, वाणिज्यिकरण व अंमलबजावणी या क्षेत्रात काम करणार्यांना राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार (National IP wards ) दिला जातो. यावर्षी ११ प्रवर्गांसहित पहिल्यांदाच चार विशेष उल्लेखनीय वर्गात हा पुरस्कार देण्यात आला. सौर आश्विन २२ व २३, शके १९४४ (१४ व १५ ऑक्टोबर, २०२२) रोजी दिल्ली येथे आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय बौद्धिक संपदा परिषद आयोजित करण्यात आली होती. परिषदेचा विषय ज्ञान आधारित अर्थव्यवस्थेची वाढ गतिमान करण्यासाठी बौद्धिक संपदा परिसंस्थेचे सुदृढीकरण' असा होता. परिषदेत एकूण पाच चर्चासत्रे झाली. यात प्रामुख्याने १) बौद्धिक संपदा प्रशासनातील सुशासनासाठी क्षमता संवर्धन, २) बौद्धिक संपदा प्रेरित विज्ञान आणि तंत्रज्ञान उपायांच्या माध्यमातून सामाजिक समस्यांचा विचार, ३) बौद्धिक प्रशासनात व्यावसायिक नैतिकता आणि उत्तम व्यवहारांचा वापर, ४) देशाच्या विज्ञान आणि तत्त्वज्ञान गरजांच्या संदर्भात बौद्धिक संपदेपुढील पुढील पिढ्यांच्या (नवीन काळाच्या)समस्या  या विषयांचा समावेश होता.या परिषदेच्या समारोप सत्रात राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार प्रदान करण्यात आले.

विशेष उल्लेखनीय प्रवर्गात, विद्यार्थ्यांमध्ये STEM² (अ-वि-तं-ग) विषयाची गोडी निर्माण करणे, नवोन्मेषी विचाराला प्रोत्साहन देणाऱ्या अटल टिंकरिंग प्रयोगशाळा (tal Tinkering Lab) यासाठीचा

उल्लेखनीय पुरस्कार (citation award) पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाला देण्यात आला. भारताचे उद्योग व वाणिज्य मंत्री श्री. पियुष गोयल यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. विशेष नामोल्लेख असलेले प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

***

## अटल धडपडालय

सुरुवातीला जेव्हा मी ह्या संकल्पनेबद्दल विशेष ऐकलं नव्हतं आणि आपल्या शाळेत अशी प्रयोगशाळा आहे याबद्दल माहित नव्हतं, तेव्हा नावावरून माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयी त्यांच्या संदर्भात काहीतरी असावे असा अंदाज बांधला होता. दैनंदिन व्यापातून वेळ काढून ह्या प्रयोगशाळेबद्दल अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न झालेला नव्हता. पुढे शाळेच्या तासांमधून विद्यार्थ्यांना ह्या प्रयोगशाळेला भेट देण्यासाठी नेण्यात आले, त्यानंतर माझा मुलगा आदित्य याने घरी आल्यानंतर कथन केलेला अनुभव अजूनही माझ्या लक्षात आहे. आनंदाने ओसंडून वाहणारा चेहरा, आणि काहीतरी वेगळे, नवे, बुद्धीला चालना देणारे असे अनुभवून आलेले लकाकणारे डोळे आणि अखंड वर्णन करणारी बडबड यावरून हे स्पष्ट झाले की अटल प्रयोगशाळा विशेष पद्धतीने / विशेष करून मुलांच्या कल्पनाशक्तीला, प्रयोगशीलतेला वाव देणारी आहे. कालांतराने आदित्यच्या 'अटल धडपडालया'च्या भेटी वाढल्या आणि घरात छोटेखानी प्रयोगशाळा सुरु झाली. बंद पडलेले रिमोट, कीबोर्ड, DVD प्लेयर, लॅपटॉपच्या समस्या घरीच सुटू लागल्या. घरात वेगवेगळे प्रयोग चालू झाले. अटल अभिरुची वर्गामुळे आदित्यमध्ये विशेष बदल दिसू लागले. विचारांची समर्पकता, स्पष्टता आणि कल्पनेला मिळालेली प्रयोगाची जोड ह्यामुळे झालेली आत्मविश्वासातील भर प्रत्यक्ष दिसून आली. याबद्दल मी अटल धडपडालयाचे विशेष आभार मानते. 'अटल धडपडालया'ची संकल्पना मनाला खूप भावली. एक अशी जागा, असे ठिकाण की जिथे विचारांना, कल्पनेला, प्रयोगशीलतेला बंधन नाही, प्रत्येक विचार स्वागतार्ह आहे. ही भावनाच मुळात प्रोत्साहन देणारी आहे. कोणीही कोणासोबत आपली तुलना करत नाही, परीक्षेसारखे मापदंड नाहीत आणि प्रत्येक विचाराकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहणे ही ह्या प्रयोगशाळेची यशस्वी झेप आहे. अशा प्रयोगशाळांचा आपल्या विद्यार्थ्यांना आयुष्यात एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाण्यात सिंहाचा वाटा आहे.

**सौ. मानसी सागर सापटणेकर**

पालक

# कार्यालय

वर्षाच्या सुरुवातील शिशुवर्ग, १ली, ५ वी, इयत्तांच्या प्रवेश प्रक्रियेचे काम कार्यालयाकडून पूर्ण करण्यात आले. प्रशासन आणि कार्यलयीन सदस्य यांनी मिळून हे काम पूर्ण केले.

गणेशोत्सवामध्ये पहिल्या आणि शेवटच्या दिवसाची जबाबदारी कार्यालय आणि गुरुकुल विभागाने मिळून घेतली होती.

कार्यालयीन सदस्यांची स्नेहसहल घेऊन जाण्याची योजना गेली अनेक दिवस सुरु होती, परंतु योजना अंतिम होत नव्हती. यावर्षी सहल जाण्याचे नक्की झाले आणि २७ ऑगस्ट रोजी कार्यालय, भांडार आणि ग्रंथालयातील सदस्यांची एकत्रित सहल भीमाशंकर, शिवनेरी - जुन्नर येथे जाऊन आली.

सप्टेंबर महिन्यामध्ये नवनगर विद्यालय आणि मातृमंदिर या दोन्ही न्यासांची अर्थपत्रके अंतिम करून आयकर विभागाकडे विवरणपत्र भरण्यात आले.

कार्यालयात, कोजागिरी पौर्णिमेनिमित्त लक्ष्मीपूजन करण्यात आले. प्रमुख अभ्यागत म्हणून प्राथमिक विभागाच्या मा. जिल्हा शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड, यांना बोलाविले होते. कार्यालयात नेहमीप्रमाणे सजावट आणि विद्युत रोषणाई केली. यामध्ये सर्व सदस्यांनी सहभाग घेतला.

मुक्तीसोपान संगीत विद्यालयातर्फे ७५ क्रांतिकारकांच्या कथांचे ध्वनीमुद्रण करण्यात आले, त्यामध्ये कार्यालयातील दोन सदस्यांनी ध्वनिमुद्रणात सहभाग घेतला.

कार्यसंकल्पात म्हणल्याप्रमाणे प्रशिक्षणाचा अनुभव कार्यलयीन सदस्यांनी घेतला. पुण्यामध्ये आयोजित करण्यात आलेल्या संस्थांची अर्थपत्रके आणि धर्मदाय आयुक्तांकडे सादर करावयची कागदपत्रे यातील बदल या विषयावरील परिसंवादात चार सदस्यांनी सहभाग घेतला, तसेच एका सदस्याने online सहभाग नोंदविला.

वार्षिक अर्थसंकल्प २०२३-२४ चे काम जानेवारी - फेब्रुवारी महिन्यामध्ये पूर्ण करण्यात आले.

क्रीडाकुल रौप्यमहोत्सव, क्रीडा आयुर्वेद परिषद, पालक महासंघ क्रीडा स्पर्धा, अभ्यास पर्व - दौरे व पुस्तक प्रकाशन सोहळा, इत्यादी प्रासंगिक / वार्षिक उपक्रमांचे केवळ आर्थिक नियोजन न सांभाळता कार्यालयीन सदस्यांनी नियमित कामासोबत ह्या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभागही नोंदवला.

कार्यालयातून अपेक्षित असलेली सर्व कामे कार्यालयाकडून नियोजित वेळेत पूर्ण झाली.

***

# ग्रंथालय

भारतीय सौर ६ श्रावण शके १९४४ (दिनांक २८ जुलै २०२२) रोजी कै. वि. अ. जोशी यांचा स्मरण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी त्यांचे चिरंजीव श्री प्रकाश जोशी, ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ न. म. जोशी, श्री. गोगटे व श्री. गानू हेही उपस्थित होते. कै. वि. अ. जोशी यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या प्रतिमेला पुष्प समर्पण करून झाली. इयत्ता आठवी व नववीचे विद्यार्थी व अध्यापक कार्यक्रमास उपस्थित होते. श्री. प्रकाश जोशी यांनी त्यांच्या वडिलांच्या आठवणी सांगितल्या. न. म. जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व कै. वि.अ. जोशीं नूमवि प्रशालेतील ग्रंथपाल म्हणून कसे काम करायचे याविषयी माहिती दिली.

भारतीय सौर ११ अश्विन शके १९४४, सोमवार ३ ऑक्टोंबर २०२२, रोजी ग्रंथालयात सरस्वती पूजनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी अभ्यागत म्हणून विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी सौ. वृंदा देशपांडे, सौ. मृणाल मायदेव, सौ. अंजली ओक, सौ. प्रज्ञा कुलकर्णी उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते पूजन झाले, सरस्वतीची आरती व श्लोक म्हटले.

श्री. विप्रदास सरांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

**वि. अ. जोशी यांचे जन्मशताब्दी वर्ष**

दिनांक २७ डिसेंबर २०२२, वि. अ. जोशी याच्या जन्मशताब्दी निमित्ताने ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयामध्ये स्मरण सभेचा कार्यक्रम झाला. यानिमित्ताने कै. वि. अ. जोशी यांचे चिरंजीव श्री. प्रकाश जोशी व त्यांचे कुटुंबीय या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रमुख अभ्यागत म्हणून, प्रसिद्ध लेखक व भाऊंचे मित्र श्री. न. म. जोशी तसेच शारदापीठाचे प्रमुख पंडित श्री. वसंतराव गाडगीळ उपस्थित होते. कै. भाऊ व कै. वि. अ. जोशी यांच्या प्रतिमांना पुष्प समर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. श्री. प्रकाश जोशी यांनी वडिलांचे कार्य व त्यांच्या आठवणी सांगितल्या व कृतज्ञता व्यक्त केली. पंडित वसंतराव गाडगीळ यांनी वंदे मातरम्‌चा अर्थ संस्कृत भाषेतून विद्यार्थी व अध्यापकांना समजावून सांगितला. श्री. न. म. जोशी यांनी कै. वि. अ. जोशी यांच्या आठवणी व त्यांच्या कामाविषयी सांगितले. या निमित्ताने ग्रंथालयातील पूर्वीच्या व सध्याच्या सदस्याचा सत्कार करण्यात आला. या वर्षी अभ्यास पर्वाच्या निमित्ताने ग्रंथालयातील साहित्य / वाङमयाचा अधिक वापर विद्यार्थी व अध्यापकांनी केला. अभ्यास पर्वाला अनुसरून दिवाळी अंकाची खरेदी करण्यात आली.

***

## संवादिनी अभिरूची

*''दुखी दिलों को अपना सा लगता है संगीत, सुखी पलों का सच्चा साथी है संगीत.''*

आणि अशाच संगीताची साथ आम्हाला लाभली ती अभिरुची उपक्रमामुळे. या उपक्रमाच्या दुसऱ्या सत्रात माझा विषय होता संवादिनी आणि पहिल्याच दिवशी संवादिनी या शब्दाचा अर्थ उलगडला तो सौ. कीर्तीताई आणि सौ. स्वरेशाताईंमुळे. गाण्याच्या सुरांशी संवाद साधणारी अशी संवादिनी हा अर्थ समजला आणि सुरू झाला या संवादिनीला अजून जवळून जाणून घेण्याचा प्रवास. पहिल्याच तासाला ताईंनी तीन सप्तकांची माहिती सांगितली. सप्तकांतील स्वरांची माहिती, संवादिनीचे नाव हार्मोनियम कसे पडले, संवादिनीचे अनेक वेगवेगळे प्रकार, संवादिनीचा प्रवास अशी बरीच माहिती मिळाली आणि दुसऱ्या तासापासून आम्ही प्रत्यक्षात संवादिनी वाजवून पाहिली. सगळ्यांनाच थोडीफार ओळख आणि जाण असल्यामुळे आम्ही थोडे अवघड अलंकार वाजवून पाहिले. ताईंनी आम्हाला स्वरांचा क्रम लिहून दिला आणि तो पूर्ण अलंकार आम्ही स्वतः तयार केला आणि वाजवला. असे अलंकार स्वत: बनवताना मला खूप मजा आली. आम्ही या तासिकांमध्ये बलसागर भारत होवो हे पद्यही शिकलो. हे पद्य शिकल्यानंतर आम्ही सर्वांनी एकत्र हे पद्य वाजवलं. प्रत्येक स्वर एकत्र वाजवणे, प्रत्येकाच्या वेगानुसार जुळवून घेणे हा अनुभव खूप छान वाटला. 'गत' शिकताना मला सर्वात जास्त मजा आली. मला थांबावसं वाटतच नव्हतं. 'गत' वाजवतच राहावेसे वाटत होते. अजून वेगाने कशी वाजवता येईल यासाठी सतत घरीही सराव सुरूच होता. मी संवादिनीची ओळख करून घेता घेता कधी रमत गेले हे कळलंच नाही आणि पाहता पाहता वर्ष संपूनही गेलं. पण संवादिनीशी माझा संवाद कधीही संपू नये यासाठी कीर्तीताईंकडे क्लास सुरु केला आणि हा संवाद असाच सुरु ठेवला. आता कीर्तीताईंच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ९ वीमध्ये परिपाठाच्या वेळी व उपासनेच्या वेळी मी संवादिनीवर साथ देण्याचा प्रयत्न करेन.

**मुक्ता देशमुख – ८ वी ब**

**अभिनंदन –** 'शिक्षण विवेक आयोजित' नाट्यछटा स्पर्धेत पूर्व माध्यमिक विभागातील कु. कृष्णा रत्नपारखी हिला प्रथम क्रमांक तर चि. ओम कळके याला द्वितीय क्रमांक आणि कु. श्रुती कांदळकर हिला उत्तेजनार्थ प्रथम व कु. आराध्या हांडे उत्तेजनार्थ द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

अभिरुची वर्ष

# अभिरुची

**औपचारिक अभिरुची**

इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यालयामध्ये औपचारिक अभिरुची हा स्वतंत्र अभ्यासेतर उपक्रम चालावला जातो. त्यामध्ये इयत्ता नववी दहावीचे विद्यार्थी सध्या शिकत असलेल्या शालेय विषयांपैकीच स्वतःच्या आवडीचा एक विषय निवडून त्या विषयातील अधिकचे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करतात.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये दोन्ही माध्यमातील इयत्ता नववी आणि दहावीचे सर्वच विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. सर्वच विद्यार्थ्यांचे अकरा विषयांमध्ये वाटप करून प्रत्येक विषयाला किमान २० विद्यार्थी येतील अशा पद्धतीने गट तयार केले होते. मागील वर्षभरामध्ये सर्व गटांनी विद्यार्थ्यांची आपापल्या विषयातील अभिरुची वाढावी यासाठी उत्तम प्रयत्न केले. प्रत्येक अभिरुची गटाने आपल्या विषयाचे नियोजन करताना उपक्रम, व्याख्याने, सहली आणि प्रकल्प अशा वेगवेगळ्या माध्यमातून विद्यार्थ्यांची अभिरुची जपण्याचा आणि वाढवण्याचा प्रयत्न केला.

प्रत्येक मुख्य विषयासाठी म्हणजे भाषा, विज्ञान आणि गणित, इतिहास व भूगोल यासाठी संचालकांचे विशेष मार्गदर्शन झाले. त्याचबरोबर आ. श्री. शरदराव सुंकर यांचे देखील वर्षातून दोन वेळा अध्यापकासाठी विशेष मार्गदर्शन झाले.

प्रत्येक अभिरुची गटात वर्षभरात झालेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी मार्च महिन्यात अभिरुची सादरीकरण घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी वर्षभर अभिरुची गटात शिकलेल्या विविध विषयांचे, ज्ञानाचे सादरीकरण त्यांच्या पालकांसमोर करण्यात आले. यासाठी पालकांचा चांगला प्रतिसाद लाभला. विद्यार्थी सादरीकरणासाठी प्रत्येक गटामध्ये बाह्य परीक्षक म्हणून त्या त्या विषयातील विषय तज्ज्ञ बोलावण्यात आले होते. जेणेकरून अभिरुची गटासाठी विशेष मार्गदर्शक व्यक्तींची आपल्या विद्यालयाशी आणि गटाशी जोडणी करून देता येईल.

वरील सर्व प्रक्रियेमुळे आपण प्रत्येक गटासाठी जास्तीत जास्त मार्गदर्शक, विषयतज्ज्ञ, अभिरुची विषयात काम करणाऱ्या इतर संस्था, महाविद्यालये, संशोधन संस्था यांच्याशी संपर्क वाढवण्यात थोड्याफार प्रमाणात यशस्वी झालो असे नक्की म्हणता येईल आणि येथून पुढे तो संपर्क अधिक वृद्धिंगत करण्याचा नक्कीच प्रयत्न करू.

## अनुभव अभिरुची

विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन त्यांना त्यांच्या आवडीच्या विषयाचे चौकटीबाहेरील विशेष प्रशिक्षण अभिरुचीमध्ये दिले जाते. अनुभव अभिरुची अंतर्गत ५ तंत्र विषय, ५ सादरीकरण कला तर ६ निर्मिती कला असे एकूण १६ विषय विद्यार्थी हाताळतात.

आठवीच्या दोन्ही सत्रात विद्यार्थी दोन वेगवेगळे विषय निवडतात तर नववीच्या संपूर्ण वर्षात त्यातील एका विषयाची निवड करतात.

संपूर्ण वर्षात विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेऊन विविध मार्गदर्शक उपक्रमांचे आयोजन केले जाते. यात निर्मिती, सहली क्षेत्रभेटी, व्याख्याने, अशी वेगवेगळी माध्यमे वापरली. यातून विद्यार्थ्यांना दर्शनाचा भाग अधिक दिला आणि त्याचा पुढील टप्पा म्हणजे प्रत्यक्ष सहभागातून त्यांच्यातील उत्स्फूर्त कौशल्यांना योग्य संधी दिली गेली. या सर्वांचे आपण मूल्यमापन जरी करत नसलो तरी विद्यार्थ्यांच्या नोंदी अवश्यमेव करतो. यंदा या नोंदीचा पुढचा टप्पा म्हणून १८ मार्च २०२३ रोजी अनुभव अभिरुचीच्या प्रत्येक विषयाचे नववीच्या पालकांसमोर गटश: सादरीकरण झाले. यामुळे पालकांपर्यंत हा प्रकल्प अधिक चांगल्या पद्धतीने पोहोचायला मदत झाली. प्रत्येक गटाने त्या त्या क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तींना अभ्यागत म्हणून आमंत्रित केले होते. अभ्यागत म्हणून आलेल्या मान्यवर व्यक्तींनी या अभिरुची प्रकल्पाचे खूप कौतुक केले व काही सूचना देखील केल्या.

विशेष म्हणजे मा. संचालक वाचस्पती गिरीशराव बापट या सादरीकरणासाठी उपस्थित होते. त्यांनी देखील विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अध्यापकांना देखील त्यांच्या आवडीचे विषय वेगळ्या पद्धतीने शिकवताना आनंद, समाधान मिळत आहे.

### गायन

आवड ही प्रत्येकालाच असते. छंद आपल्याला आयुष्यावर प्रेम करायला शिकवतात. गायन हा विषय मला आवडतो अर्थात ती माझी अभिरुची आहे. मला गाणी ऐकायला त्यात रमायला, फार आवडतं कारण गाण्यात रमल्यामुळे त्याचा अर्थ हळू-हळू उलगडू लागतो. मला माहित आहे की जिथे शब्द कमी पडतात तिथे संगीत बोलते. त्यामुळे मला गायन अभिरुची आवडते. खरं तर आठवीमध्ये अभिरुची हा शब्द ऐकला होता. अभिरुची म्हणजे ज्यामध्ये आपल्याला आवड, रुची आहे ती आवड दृढ करणे. ही संकल्पनाच किती छान आहे ! मला गायनात आवड असल्याने मी गायन हा विषय निवडला. मी ९वी मध्ये देखील हाच विषय निवडला त्यामध्ये मला प्रथमच दिवाळी पहाट मध्ये नटराज वंदना गाण्याची संधी मिळाली. तो अनुभव देखील खूप छान आणि प्रसन्न करणारा होता. त्याचबरोबर आम्ही जयोस्तुते गीत (संस्कृतमधून), दादरा, संस्कृत पद्य, बंगाली गीत, कन्नड गीत, गुरुवंदना, महाराष्ट्रगीत हे सर्व शिकलो. त्यातील मला महाराष्ट्र गीत खूप आवडले.

**श्रुती गायकवाड – ९ वी क**

# त्यास शिक्षक मी म्हणे

*काया वाचा मनोयोगे आचरी जो न दुष्कृत।*

*जो संयत तिन्ही स्थानी त्यास शिक्षक मी म्हणे।।*

२५ जानेवारीला 'जयोस्तुते' हे अध्यापकांचे गीत झाल्यानंतर आ. संचालकांनी मला बोलावून घेतले व 'मार्च महिन्यातील आचार्य व्रताची उपासना तुम्ही सांगा' असे सांगितले. मला फार आनंद झाला कारण निगडी केंद्रामध्ये हा संस्कार पहिल्यांदा होणार होता आणि त्याची उपासना सांगायची संधी मिळणार त्यामुळे दडपणही आले होते. श्लोक आणि गद्य वाचन दोन्ही मी करायचे असे प्रत्यक्ष संचालकांनी सांगितल्यामुळे जबाबदारी वाढली होती.

फेब्रुवारी महिन्यात मीरा ताईने उपासनेची पोथी आणि श्लोकांचे ऑडिओ पाठवले. पोथी वाचून आणि ऑडिओ ऐकून मी थक्क झाले कारण इतके सुंदर अर्थांचे श्लोक, आणि तितक्याच सुंदर चाली!

प्रत्येक संस्कृत श्लोकानंतर त्याचा मराठीतून अनुवाद केलेला श्लोक उपासनेमध्ये आहे.

'महिनाभर तरी पेटी तबल्यासहित सराव हवा', असा मीरा ताईचा आग्रह होता पण कोमलताई, पुराणिक सर व माझी तीन-चारदाच वेळ जुळली. कोमल मात्र तिचे कॉलेज चुकवून पोथीच्या सरावासाठी दोन आठवडे येत होती. प्रत्येक श्लोकाची चाल वेगवेगळ्या रागांमधील असल्यामुळे मी येताजाता, सकाळी स्वयंपाक करतांना, तास नसतांना सारखे उपासनेचे ऑडिओ ऐकत होते. मीरा ताईच्या गोड आवाजातील श्र्लोक ऐकत राहिल्यामुळे शेवटचे दोन आठवडे सतत याच श्लोकांच्या सानिध्यात मी होते.

पाली भाषेतून मराठी मध्ये अनुवाद केलेली शिक्षकाची लक्षणे अंतर्मुख करणारी होती. या निमित्ताने ही समाज शिक्षकाची लक्षणे, विद्यादानाचे महत्त्व, विद्या उपासनेचे व्यसन, सत्याचा अभ्यास करत करत करावयाचे स्वाध्याय प्रवचन, व्यक्तिगत स्वार्थापेक्षा सामाजिक स्वार्थासाठी घेतला जाणारा अमृतत्वाचा शोध, ज्ञानाचा उद्बोध, भक्तीप्रेमाचा कल्लोळ करणारा संत एकनाथांचा अभंग हे सर्व सतत मनात रुंजी घालत होते.

सराव ऐकायला आलेल्या मीरा ताईने अतिशय बारकाईने ऱ्हस्व- दीर्घ शब्दांच्या उच्चारातील, स्वरातील बदल सांगितले त्यामुळे मला अजूनच उत्तमतेने श्लोकांचा व बोलण्याचा सराव करता आला.

आचार्यव्रत घेणाऱ्या व्रतार्थींसोबत सराव केला त्यावेळी मधुरा ताई बेंगलोरहून ऑनलाइन जॉईन झाली होती. फक्त व्रतार्थी नाही तर शाळेतील सर्व शिक्षकांसोबत सुद्धा उपासनेचा सराव करायचा आहे असे

कळल्यानंतर पूर्वा ताई व कल्पेश दादाने शाळेतील वेगवेगळ्या विभागातील शिक्षकांना एकत्र आणण्याचे काम केले व पूर्व माध्यमिक गट, माध्यमिक गट, क्रीडाकूल, गुरुकुल अशा ३-४ गटांमध्ये उपासनेचा सराव घेता आला.

प्रत्यक्ष १८ मार्च ला सकाळी ७ वाजता अतिशय प्रसन्न वातावरणात उपासना झाली व निगडी केंद्रातील १० अध्यापकांना आ. संचालकांनी आचार्यव्रत दिले.

कोमल ताईने पेटीवर सुरेल साथ दिली, पुराणिक सरांच्या तबला वादन व श्र्वेता ताईच्या टाळ साथीने अभंगाला रंजकता आली.

या निमित्ताने आचार्यव्रतातील श्र्लोक म्हणायची मला संधी मिळाली या बद्दल आ. संचालकांचे व मीरा ताईचे खूप आभार! आता त्या श्लोकांमध्ये वर्णन केलेल्या शिक्षकांसारखे आचरण करण्याचा प्रयत्न मी नक्की करणार आहे.

**सौ योगिनी कुलकर्णी**
(गुरुकुल विभाग)

***

## ज्ञान प्रबोधिनी नवगर विद्यालय, निगडी - शालांत परीक्षा निकाल २०२२-२३

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन**

| | माध्यमिक मराठी विभाग | |
|---|---|---|
| १ | अथिला सुहास पाटील | ९८.४०% |
| २ | सृजा अमितकुमार खातू | ९८.२०% |
| ३ | आर्या गणेश कुलकर्णी | ९७.८०% |
| ४ | यश विजय पिंगळे | ९७.८०% |

| | माध्यमिक इंग्रजी विभाग | |
|---|---|---|
| १ | प्रियांका निरंजन भाटे | ९९.००% |
| २ | आदिती स्वप्निल भांडारकर | ९९.००% |
| ३ | जिज्ञासा कुंदन चौधरी | ९८.६०% |
| ४ | जान्हवी कृष्णा पाटील | ९७.८०% |

| | गुरुकुल विभाग | |
|---|---|---|
| १ | श्रिया विवेक पर्वतीकर | ९७.४०% |
| २ | आर्या विवेक पर्वतीकर | ९३.००% |
| ३ | आभा अभिजित बापट | ९१.४०% |

| | क्रीडाकुल विभाग | |
|---|---|---|
| १ | प्राची विजय अमृतकर | ९२.८०% |
| २ | दीक्षा गणेश म्हस्के | ९०.८०% |
| ३ | भक्ती विकास घोडेकर | ९०.००% |
| ४ | मंथन महेशकुमार संचेती | ९०.००% |

## योग प्रशिक्षण अनुभव

नमस्कार

आपल्या  शाळेत खूप छान उपक्रम राबविले जातात. तसेच हे योगसत्र देखील खूप छान चालू आहे. योगाचे आपल्या जीवनात खूप फायदे आहेत. हे लक्षात घेऊन आपल्या शाळेने हा सुंदर उपक्रम सुरू केला आहे. आम्ही सेवक सकाळी सात वाजता शाळेत येतो. आल्यावर आमची काम करतो, सुट्टी झाल्यावर घरी जातो. याच वेळेत तुम्ही आम्हाला आमच्यासाठी म्हणून सकाळच्या योगसत्राच्या रुपात एक तास वेळ दिला. हे आपल्याच शाळेत होऊ शकते.

मला सर्वात आवडली ती योगनिद्रा. योगनिद्रा करताना जसे आपले मन एका क्षणात कुठेही भटकून येते अगदी तसेच मन शरीरात फिरुन प्रत्येक अवयवांची चौकशी करून आल्यासारखे वाटते. आम्हाला योगासनाचे महत्त्व कळाले. नवनवीन आसने शिकायला मिळाली. गोळ्या-औषधांपेक्षा योग करून कसे तंदुरुस्त रहायचे हे आम्हाला शिकायला मिळाले. सौ. विद्याताईंच्या मार्गदर्शनाखाली आम्ही रोज योगासने करत होतो. ताई खूप छान समजावून सांगत होत्या. काय कसं करावं कसं केल्यावर कुठे ताण येतो आपले स्नायू बळकट कसे होतील यांचे ताईंनी छान मार्गदर्शन केले.

रोज योग केल्यामुळे माझा कामातही उत्साह वाढला आहे. रोज सकाळची सुरुवात योगासनाने झाल्यामुळे दिवस खूप छान जायचा मन प्रसन्न व्हायचे. खूप वर्षांनंतर स्वतःसाठी वेळ मिळाला. शाळेने योगसत्र उपलब्ध करून दिले त्याबद्दल मनःपूर्वक आभार.

**सौ.लक्ष्मी तरस**
सेविका

## हस्तकला अभिरुची

कलांचा उत्सव, गुणांचा महोत्सव .. या ओळींची प्रचिती वर्षभर दर आठवड्याला आली. विषयप्रमुख म्हणून मी पहिल्यांदाच खूप मोठी जबाबदारी घेतली. विद्यार्थ्यांना विविध कला शिकवून त्यांच्या कलागुणांना वाव देता येईल का तसेच बनवलेली वस्तू विकता येईल का असाही थोडा विचार करण्यात आला आणि त्या पद्धतीने अभ्यासक्रम ठरवला. यातून काही मुलांचे कलागुण लक्षात आले. सध्याच्या वातावरणात साहित्य खूप महाग झाले असल्याने खरंतर खरेदी करणे आमच्यासाठी आव्हानच होते तरीही कमीत कमी खर्चामध्ये वस्तू बनवण्याचा प्रयत्न केला. यात कागदापासून वस्तू बनवणे यावर जास्त भर देण्यात आला. आपल्या आवडीची गोष्ट विद्यार्थ्यांना शिकविण्याची वेगळीच मजा आम्ही अनुभवत होतो. सांगायला अतिशय आनंद वाटतो की यातील काही विद्यार्थ्यांनी ज्वेलरीचे बरेच प्रकार बनवून विकले. ठरवलेले उद्दिष्ट साध्य झाले असे वाटले. नकळतच आम्हा तिन्ही शिक्षकांची गटबांधणी खूप छान झाली.

**अध्यापिका - सौ. सुरेखा क्षीरसागर**

# नाटकाच्या गोष्टीची गोष्ट

नमस्कार

सालाबादप्रमाणे यंदाही स्पर्धेचे दिवस सुरू झाले. यंदाच्या वर्षी सहभागाचा निर्णय थोडा डळमळीत होता. पण स्पर्धेत भाग घ्यायचा हे ठरले आणि मग गोष्टीचा शोध सुरू झाला. वर्गातल्याच एका गटाची गोष्ट तयार होती. त्याचेच चीज करून घेऊ असे ठरले. आता मात्र पटापट मुलं निवडली, एकूण २२ विद्यार्थी प्रत्यक्ष नाटकात आणि ५ विद्यार्थी इतर साहाय्यासाठी असा गट तयार झाला आणि प्रसंगाची मांडणी सुरू झाली. सातवीच्या मदत गटाने तर पाचवी - सहावीत शिकलेले नाटक प्रत्यक्ष मदत करून कसे उभे रहाते याचा सुद्धा अनुभव घेतला. दोन दिवसांनंतर नाटक उभे राहिले. कलापिनी स्पर्धेसाठी नाटक करणे म्हणजे मुलांना एक दिवसाची सहल आणि सादरीकरणाचा अनुभव असा दुहेरी फायदा असतो. आता सुरू झाला सजावटीचा प्रयत्न. संगीत काय करूया? यावर मुलांनी श्री. समाधानदादांच्या मदतीने एका गाण्याच्या चालीवर नाटकाच्या विषयाला अनुसरून शब्द लिहिले आणि तयार झालं नाटकासाठीचं गाणं. गोष्ट मुलांची असल्याने त्याचे नाटक उभे राहताना मुलांना भूमिकेसाठी अगदी आवश्यक तेवढेच सांगावे लागले. स्पर्धेच्या आदल्या दिवशी वेशभूषेसाठी एक पालक धावून आले आणि दुकानातून विविध प्राणी पक्षी शाळेत अवतरले. आता उजाडला स्पर्धेचा दिवस, १२ फेब्रुवारी २०२३. आदल्या दिवशीच्या सूचनेनुसार, मुले ठरल्या प्रमाणे वेळेत आली आणि आमचा प्रवास सुरु झाला. स्पर्धेच्या ठिकाणी पोहोचल्यावर चेहऱ्याला रंग लावून मुले विविध प्राण्यांच्या वेषात तयार होऊन रंगदेवतेच्या सेवेसाठी सज्ज झाली. प्रयोग पार पडला. सर्व प्राणी मनुष्यरूपात आले आणि पुढच्या स्पर्धेची नाटके बघितली. स्पर्धेचा शेवटचा दिवस असल्याने निकाल त्याच दिवशी समजणार होता. तब्बल ५ पारितोषिके आपण मिळवली. मुले खुश होती. केलेल्या कष्टाचे चीज झालेच पण मुलांनी सुद्धा एका स्पर्धेचा अनुभव आपल्या पोतडीत साठवला. माझे एक शिक्षक मला कायम सांगायचे ''स्पर्धा हे साध्य नाही तर साधन आहे'', स्वतःच्या क्षमता तपासण्यासाठी त्याचा वापर करावा. आज याचा अनुभव मुलांनी नक्की घेतला असेल असे या अनुभवातून जाणवले.

**सौ. मयुरी जेजुरीकर**
अध्यापिका

***

अनुभव

# ध्वनिपुस्तिका

नमस्कार

ध्वनिपुस्तिका करायचे ठरवले त्यावेळी कोणत्या क्रांतिकारकांची नावे घ्यायची, त्या व्यक्तीचे कार्य काय ह्या सगळ्याचा विचार करून लेखन करण्यात आले त्यातून संहिता तयार झाल्या. संहिता तयार झाल्यावर ही प्रत्येक संहिता जिवंत करण्याचे काम वाचक करणार होते. त्या वाचकांच्यामध्ये आपले प्रमुख पदाधिकारी, अध्यापक, माजी विद्यार्थीनी, विद्यार्थी व पाहुणे कलाकार ह्यांचा सहभाग होता. ध्वनिमुद्रण करताना सुरवातीला ज्यांना त्याची कल्पना आहे अशा वाचकांनी अगदी काही वेळात आपले काम पूर्ण केले. तर काहींना हे थोडे नवीन होते त्यामुळे आवाज व्यवस्थित न येणे किंवा भीती वाटणे असे होत होते, परंतु त्या सगळ्यांना मार्गदर्शन होते ते शीतलताई, मयुरीताई व मानसीताई यांचे. वाचकाने आपल्यासमोर असलेल्या माईकवर बोलताना कसे बोलावे, आपले उच्चार स्पष्ट असावेत, कोणत्या शब्दांवर जोर द्यायचा, आपण बोलताना किंवा दोन शब्दांच्या मध्ये श्वास घेतला तर त्याचा आवाज येणार नाही ह्याची काळजी कशी घ्यायची अशा अनेक महत्वाच्या गोष्टींचे पालन करून ध्वनिमुद्रण केले गेले. काही वाचकांच्या बाबतीत असे घडले की त्यांचा आवाज छान आहे परंतु वाचन करताना गडबड होत होती त्यामुळे त्यांनी काही कथा वाचल्या व त्यांच्या अन्य कथा दुसऱ्या वाचकांनी वाचल्या. काही वाचकांनी तर अपेक्षेपेक्षा खूप कमी वेळात आपले काम पूर्ण केले. ध्वनिमुद्रणादरम्यान असे लक्षात आले की प्रत्येकाच्या आवाजाचा पोत वेगळा होता. त्यानुसार २१ आवाज ह्या दरम्यान मला हाताळता आले. वाचन करताना काहींच्या आवाजाला खूप धार होती त्यामुळे त्यांना तुम्ही थोडे खालच्या लयीत वाचन करा असे सांगावे लागले तर काहींचा खूपच कोमल असल्यामुळे मला तसे बदल करावे लागले. वाचनादरम्यान असे लक्षात आले की काही संहिता ह्या जिवंत वाटण्यासाठी त्यात बदल करावे लागतील त्याप्रमाणे बदल करून त्याचे वाचनही उत्तम प्रकारे झाले. ध्वनिमुद्रणादरम्यान मला स्वतःला ७५ क्रांतिकारकांना खूप जवळून अनुभवता आले. त्यांनी केलेले कार्य हे खूपच मोठे आहे ते कार्य ध्वनिमुद्रणाच्या माध्यमातून आताच्या पिढीला प्रेरणादायी ठरेल असा विश्वास वाटत आहे.

**केदार अभ्यंकर**

ध्वनिमुद्रक

***

# जैवतंत्रज्ञान विभाग

CIC Jnana Prabodhini Innovation Foundation (CIC JPIF)

एप्रिल २०२२ मध्ये, नीती आयोगाने, CIC (अटल कॉम्मुनिटी इनोव्हेशन सेंटर) या त्यांच्या फ्लेगशीप कार्यक्रमाच्या अमलबजावणीसाठी ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडीची निवड केली. या कार्यक्रमाचे प्रोजेक्ट डिरेक्टर श्री मंगलेश यादव यांनी जुलै महिन्यात निगडी केंद्राला प्रत्यक्ष भेट दिली. CIC संबधित गट आणि पदाधिकारी यांच्या बरोबर चर्चा केली आणि प्रबोधिनीचे विविधांगी काम समजून घेतले. निगडी बरोबरच त्यांनी आंबी, तळेगाव येथील पॉलिहाऊस आणि साळुंब्रे केद्राला ही भेट दिली. नवोन्मेश (innovation), उद्योजकता विकास आणि स्टार्ट अप या विषयांवर ग्रामीण भागात आणि tier २, tier ३ स्तराच्या गावांमध्ये कामांची विशेष संधी प्रबोधिनीला या कार्यक्रमामुळे मिळणार आहे. या कार्यक्रमाच्या अमलबजावणीसाठी बरीच पूर्वतयारी (compliance) सुरु आहे. त्याची सुरुवात म्हणून जुलै महिन्यात, CIC ज्ञान प्रबोधिनी इनोव्हेशन फौंडेशन (CIC JPIF) या नावाने एक संस्था स्थापन केली आहे.

अटल इनोव्हेशन मिशनने पाँडिचेरी येथे, भारतातील सर्व CIC कार्यक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींसाठी, सप्टेंबर मध्ये ४ दिवसांचा बूट कँप आयोजित केला होता. ज्ञान प्रबोधिनीचे प्रतिनिधी म्हणून संगीता कुलकर्णी आणि दीपक नेसरीकर यांनी या मध्ये सहभाग घेतला. जानेवारी महिन्यात श्री. यशवंतराव लिमये, संगीता कुलकर्णी आणि प्रदीप परांजपे या तिघांनी विजयवाडा येथील KL विद्यापीठाच्या CIC ला प्रत्यक्ष भेट दिली. तेथील संयोजक गटाबरोबर दिवसभराच्या गाठीभेटींमधून त्यांचे प्रयत्न आणि काम समजून घेतले.

प्रबोधिनीने स्थापन केलेली CIC, तळागाळातील समुदाय म्हणजे ग्रामीण तरुण, शेतकरी, महिला बचत गट आणि ग्रामीण महाविद्यालयांमध्ये शिकणारे विद्यार्थी यांच्यासाठी विशेष काम सुरु करणार आहे. या साठी गेले सहा महिने ग्रामीण भागात काम करणाऱ्या विविध संस्था आणि तज्ज्ञ व्यक्ती यांच्याशी योजनाबद्ध पद्धतीने मोठ्या प्रमाणावर संपर्क करण्यात आला. या मोठ्या प्रमाणावर केलेल्या संपर्क अभियानाचे फलित म्हणून अनेक सहविचारी तज्ज्ञांनी व संस्थांनी सहयोगी (पार्टनर) म्हणून प्रबोधिनी बरोबर काम करण्याची लेखी ग्वाही दिली आहे. विपणन, तंत्रज्ञान, सामुदायिक सहभाग या कामाच्या संदर्भात, आता प्रबोधिनी बरोबर अन्य १० सामाजिक संस्था आणि सुमारे ४० हून ही अधिक तज्ज्ञांनी सहयोगी म्हणून सहकार्य करण्याचे निश्चित केले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे, देसाई ब्रदर्स लिमिटेड या

कंपनीने त्यांच्या CSR मधून प्रबोधिनीच्या या प्रकल्पास अर्थ सहयोगी (funding partner) म्हणून मदत करण्याचे आश्वासन दिले आणि त्या नुसार प्रबोधिनीशी करार ही केला आहे.

## बांबू सेतू प्रकल्प

जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख मा. संगीता ताई यांनी प्रबोध उद्योग समूहासमोर शेतकऱ्याचा बांबू म्हणजे हरित सोने कसे हे सिध्द करण्याकरिता प्रकल्प सादर केला त्याला त्यांची मान्यता मिळाली व दिनांक १ एप्रिल २०२२ पासून प्रबोध बांबू सेतू हा तीन वर्ष चालणारा प्रकल्प सुरु झाला. प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट बांबू संशोधन व जागरूकता होय, त्या अंतर्गत प्रकल्पाच्या कामाची विभागणी चार टप्प्यांमध्ये केली आहे. प्रदेशनिष्ठ बांबूच्या प्रजातीचे टिश्युकल्चर व माक्रोप्रोलीफरेशन पद्धतीने रोप निर्मिती करणे, बांबू लागवड प्रात्यक्षिके, मूल्यवर्धन साखळी अंतर्गत कापणीनंतरची प्रक्रिया, नाविन्य पूर्ण उत्पादन विकास व चाचण्या, समुदाय संपर्क आणि बाजारपेठ संपर्क तयार करणे.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये बांबूच्या निवडलेल्या ब्लॅक बांबू, हुडा बांबू आणि कमी काटेरी कटांग बांबू या तीन प्रजातीच्या बांबूची टिश्युकल्चरपद्धतीने उच्च प्रतीच्या रोपांची निर्मिती असे नियोजन असल्याने त्यासाठी पूर्वतयारी प्रामुख्याने मातृवृक्ष निर्मितीसाठी व बड्स आणण्यासाठी स्थळ निश्चितीकरिता संपर्क करणे हे काम झाले आहे. नांदेड सिटी प्रकल्प सिंहगड रोड, पुणे येथे उद्यान विभागाकडून ब्लॅक बांबू, The Bamboo Nursery पाले ता. भोर येथील कमी काटेरी कटांग बांबू, जयतपाड ता. भोर येथील हुडा बांबूची बेटे असणारे शेतकरी अनिल धुमाळ यांच्याशी हुडा बांबू मातृवृक्ष निर्मितीसाठी लागणाऱ्या काठ्या (पोल) मिळण्याविषयी चर्चा झाली. मातृवृक्षनिर्मिती पूर्ण करण्यात आली.

या नंतर तीनही बांबू प्रजातीच्या संशोधनास सुरवात झाली. सर्व प्रजातींचे इनिसिएशन करण्यात आले. कटांग या प्रजातीने चांगला प्रतिसाद दिला व त्याची पूर्वतयारीतील काही रोपे तयार होण्यात यश मिळाले. हुडा व ब्लाक ह्या प्रजातींचे काम चालू आहे.

दर ३ महिन्याला याप्रमाणे प्रकल्प वृत्त आपण प्रबोध उद्योग समूहाला सादर करत आहोत. प्रबोध प्रकल्पाच्या पुढील वर्षाचे नियोजन पूर्ण झाले आहे.

दिनांक ०९ एप्रिल २०२२ रोजी नांदेड सिटी प्रकल्प सिंहगड रोड, पुणे येथे उद्यान विभागाच्या प्रमुख तेजस्विनी कुलकर्णी यांची ब्लॅक बांबू मातृवृक्ष संदर्भात जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख संगीताताई आणि सागर तुपे यांनी भेट घेतली.

दिनांक २९ एप्रिल २०२२ रोजी ब्लॅक बांबू व कमी काटेरी कटांग बांबू यांची Micro-Proliferation या शाखीय पद्धतीचा वापर करून मातृवृक्ष तयार करण्यासठी ट्रायल घेण्यात आली.

***

# संवेद विभाग

**वर्गमित्र**

मुलांशी मैत्रीच्या नात्याने अगदी मोकळेपणाने संवाद साधणे त्यांचे भावविश्व समजावून घेणे त्यांना बोलते करणे ही उद्दिष्ट्ये समोर ठेवून पालक महासंघाच्या मदतीने वर्गमित्र उपक्रमाची सुरुवात झाली.

यामध्ये पालक सहकारी दर पंधरा दिवसातून एकदा वर्गात जाऊन मुलांशी छान गप्पा मारतात. यामध्ये अभ्यास, परीक्षा, मिळालेले गुण यावर अजिबात चर्चा न करता मुलांशी मित्रत्वाच्या नात्याने गप्पा मारणे, त्यांचे वेगवेगळे अनुभव ऐकणे, त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देण्याचा प्रयत्न करणे, त्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करणे. अशा अनेक गोष्टी या उपक्रमातून साध्य केल्या जातात.

कधीकधी मुलं काही विषयावर आपल्या पालकांशी ही मोकळेपणाने बोलायला तयार नसतात. असे अनेक विषय या वर्गमित्र उपक्रमातून संवाद साधणाऱ्या ताई, दादांशी बोलतात. या तासिकांना अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर विषयांवर मुलांशी संवाद होतो. म्हणजे त्यांच्या आवडीनिवडी, खेळ, मुलांनी केलेल्या सहली, त्यांचे मित्रमैत्रिणी, त्यांचे छंद, वेगवेगळ्या स्पर्धा आणि उपक्रमात मुलांना मिळालेले यश असे विषय निघाले की आपसूकच मुलेही खुलतात आणि संवादातील कृत्रिमपणा निघून जाऊन चौफेर विषयांवर ती बोलू लागतात. त्यांच्या मनातील गोष्टी निरीक्षकांना कळायला मदत होते.

याचे फलित म्हणजे यामधून मुले आत्मविश्वासाने पुढे येऊन बोलू लागली. विद्यार्थ्यांशी गप्पा झाल्या व सर्व पालक वर्गमित्र यांची विद्यार्थ्यांशी चांगली ओळख झाली. त्यांना पडणारे प्रश्न, अडचणी स्वतःहून विचारू लागली. यावर्षी इयत्ता तिसरीचे वर्ग सोडून इतर तीन वर्गांवर नियमित वर्गमित्र तास झाले.

**वर्ग संवाद –सातवी**

सातवी अ, ब, क या तिन्ही तुकड्यांमध्ये वर्षभर नियमित आठवड्यातून एक याप्रमाणे वर्ग संवाद तासिका झाल्या. वेगवेगळ्या लेखांचे वाचन त्यातील काही ठळक मुद्दे, तासिकांमध्ये चालू उपक्रम, त्याची उद्दिष्ट्ये याविषयी चर्चा झाल्या. घरकुलातील मराठी माध्यम पूर्व माध्यमिक विभागामधील सातवीच्या तिन्ही तुकड्यांमध्ये आठवड्याला एक या वारंवारीतेने वर्षभर तास झाले.

वेगवेगळ्या लेखांचे वाचन, विद्यार्थ्यांचे काही प्रश्न, काही वेळेला वर्गामध्ये घेतलेली गटकार्ये व त्यावर चर्चा असे वेगवेगळ्या माध्यमातून हे तास झाले. यातील एका तुकडी बरोबर वर्गमित्र तास सुद्धा चालू होते

त्यामुळे महिन्यातील दोन तासिका वर्गमित्र व दोन तासिका वर्ग संवाद असे तीन पैकी एका तुकडीचे नियोजन होते.

### आठवी व नववी

माध्यमिक मराठी मध्ये आठवी व नववीला बुलेटीननुसार काही तासिका मिळायच्या या तासिका ठरलेल्या नसायच्या पण मिळाल्यानंतर त्या वर्गांमध्ये काय बोलूया? याविषयी आमचा विचार झालेला असायचा. वयामुळे होणारे बदल, बदलत्या गरजा याच्यावरून सुद्धा वैयक्तिक किंवा गटागटाने चर्चा होतात व त्यावरून सुद्धा मुलांच्या डोक्यात काय आहे, त्यांचे वागणे याचा अंदाज येतो व त्यांच्याशी बोलायचे विषय निवडले जात होते. त्याचबरोबर विद्याव्रत, गणेशोत्सव, केंद्राच्या काही उपक्रमांच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांशी संवाद होत होता. काही वेळा ही मुले आपणहून मोकळ्या वेळेमध्ये भेटायला विभागात येऊन स्वत:विषयी, मित्र मैत्रिणींविषयी मोकळेपणाने बोलत होती.

### क्रीडाकुल

यावर्षी हे तास गायत्रीताई, अस्मिताताई आणि नोव्हेंबर नंतर रागिणीताई यांनी घेतले. क्रीडाकुलच्या विद्यार्थ्यांचे मानसचे तास असल्यामुळे संवाद हा जास्त खेळाशी निगडीत असायचा. होणाऱ्या तासांमधून त्यांच्याशी खेळ व अभ्यास यांचा मेळ साधत स्वतःचे घडवणे या संदर्भाने विद्यार्थ्यांशी बोलणे होत होते. यावर्षी (२०२२-२०२३) सातवी व आठवी असे दोन वर्ग संवेद विभागाकडे होते.

### समुपदेशन - पहिली ते दहावी

समुपदेशन म्हणजे मुख्यत्त्वे प्रश्न असलेल्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना आणि अध्यापकांना मार्गदर्शन करण्यासाठी काही सत्र असतात. यासाठी विद्यार्थ्यांशी नियमित संवाद साधून त्यांचे प्रश्न जाणून घेऊन; ही मार्गदर्शन समुपदेशन सत्रे आयोजित केली जातात.

साधारणपणे सातवीनंतर विद्यार्थी स्वतःहून येऊन बोलायला तयार असतात याचाच विचार करून यावर्षी समुपदेशनासाठी आवश्यक असणाऱ्या काही चाचण्या विकत घेतल्या. व्यक्तिमत्त्व चाचणी व adjustment चाचणी अश्या दोन चाचण्यांचा समावेश यात आहे.

संवेद विभागाने अध्यापकांसाठी सहा सत्रांचे व पालकांसाठी एका सत्राचे आयोजन केले होते. फौंडेशनचे सदस्य मार्गदर्शन करण्यासाठी येत होते. या निमित्ताने या विषयातील अध्यापक व पालकांच्या मनात असणारे प्रश्न समोर आले, पहिली ते चौथीच्या सर्व पालकांसाठी, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या सर्व अध्यापकांसाठी ह्या सत्राचे आयोजन केलेले होते.

### ओळख स्पर्शाची सत्र

तीन किंवा चार वर्षांपूर्वी निगडीमध्ये प्राथमिकमधील अध्यापकांचे ओळख स्पर्शाची संदर्भातील

प्रशिक्षण झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांचे हे प्रशिक्षण संवेद विभागात नव्याने रुजू झालेल्या सदस्यांनी घेतले. पहिली ते चौथी अश्या एकूण १६ वर्गांमध्ये ही सत्रे झाली. आठ वर्गशिक्षक तेव्हा वर्गामध्ये मदतीसाठी उपस्थित होते.

**विकसनशील विद्यार्थी संवाद व काम**

हा उपक्रम विभागाच्या नियोजनात नसला तरी आवश्यक असल्याने त्यासाठीचे काम केले. अभ्यासामध्ये मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आतापर्यंत वैयक्तिक पातळीवर काम होत होते.

अभ्यासामध्ये मागे असणाऱ्या विद्यार्थ्याचे सर्वच उपक्रमांमधील सादरीकरण पाहून त्यांचे प्रश्न समजून घेतले जातात. त्यानुसारच जो गट मागे पडत आहे त्यांच्यासाठी काम करावे असे ठरले. २० पैकी ७ पेक्षा कमी गुण असणारे विद्यार्थी शाळेच्या वेळातच त्यांना पुढे आणण्यासाठी तासिका घेऊया असे ठरले होते. हा उपक्रम प्राथमिक गटासाठी केला होता.

पालकांकडून महिनाभर जास्तीचा सराव आणि अभ्यास असे स्वरूप आतापर्यंत होते. पण मुलांसोबत प्रत्यक्ष काम करताना त्यांचे प्रश्न व्यवस्थित समजतात हे संवेद विभागाने जाणले. म्हणून संवेद विभागाने असे विद्यार्थी ओळखून त्यांना मार्गदर्शन देऊन पुढील टप्पे त्यांना, त्यांच्या पालकांना व अध्यापकांना समजावेत असे संवेद विभागाने करावे असे ठरले.

विद्यार्थी नक्की कशामुळे मागे पडला आहे हे समजायला या प्रक्रियेचा नक्कीच उपयोग झाला. हे अध्यापकांना समजून सांगायला व त्यानुसार त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधायला अधिकच्या मदतीचा उपयोग होत होता.

**डॉ. शांता वैद्य फाउंडेशन शिक्षक व पालक कार्यशाळा**

विकसनशील विद्यार्थ्यांसाठीच्या कामाचा हा पहिला टप्पा होता. विद्यार्थ्यांना काय काय प्रश्न असू शकतात याची किमान माहिती प्रत्येकाला असायला हवी म्हणून या कार्यशाळेचे आयोजन केलेले होते.

**दहावी करियर अभ्यास सत्र**

दहावीच्या वर्गांमध्ये संवाद तासिकांचे प्रमाण कमी होते तरीही 'स्वयं अध्ययन' 'का आणि कसे' याविषयी विद्यार्थ्यांशी बोलणे झाले. हे विद्यार्थी मोकळ्या वेळेत वैयक्तिक भेटायला येत असल्यामुळे त्यांच्याशी संवाद होत होता. पण वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवरांची सत्रे सुद्धा विद्यार्थ्यांसाठी ठेवता आली. एकूण चार सत्रे विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी आयोजित केली होती.

**आहार– व्यायाम व विश्रांती सत्र विद्यार्थ्यांसाठी**

विद्यार्थ्यांशी वर्गाश: होणाऱ्या संवादातून हे जाणवले की विद्यार्थ्यांचा दिनक्रमातील अनेक चुकीच्या सवयी समाजात होत्या त्यामुळे त्यांच्या तब्येतीवर त्याचा परिणाम होतो आहे हे जाणून खरेतर या सत्राची

कल्पना आली.

आठवी, नववी व दहावी सर्वांसाठी हे घेऊयात असे वाटत असले तरी सुरुवातीला दहावीसाठी व नंतर प्रतिज्ञा ग्रहण व विद्याव्रताच्या निमित्ताने आठवीसाठी वैद्य सौ. दीप्तीताई धर्माधिकारी यांनी हे सत्र घेतले. एका प्रश्नावलीच्या आधारे स्वतःचा आरसा विद्यार्थ्यांसमोर आणला व त्यानुसार त्यांना मार्गदर्शन केले.

Aptitude testing

यावर्षी मार्च महिन्यापासून दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी जाहिरात करून व जाणीवपूर्वक Aaptitude testing करायचे ठरवून सुरुवात केली. आधी घेतलेल्या २७ link व सवलतीच्या दरात मिळालेल्या २०० link अशा एकूण २२७ link होत्या. सध्या त्यातील १७० जणांचे चाचणीकाम पूर्ण झालेले आहे.

Testing करण्यासाठी विभागामध्ये सौ. अस्मिता बारसावडे, सौ. मनीषा खोपडे व सौ. नूतन राणे अशा तीन सदस्य आहेत. आणि समुपदेशन करण्यासाठी सौ. आरती खोत व सौ. नूतन राणे या दोघी जणी आहेत. १६३ जणांचे एकूण समुपदेशन झालेले आहे. १६३ पैकी १२८ जणांचे समुपदेशन सौ. नूतन राणे यांनी केले व सौ. आरती खोत यांनी ३५ जणांचे समुपदेशन केले. सौ. नूतनताईंकडे समुपदेशन झालेल्या जवळपास सर्वांचे feedback form सुद्धा विभागामध्ये आहेत.

## क्रांतिकारकांची गौरव गाथा

नमस्कार

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातर्फे क्रांतिकारकांची गौरवगाथा या उपक्रमांतर्गत एका श्राव्य ग्रंथाची निर्मिती केली गेली. या उपक्रमात सहभागी होऊन काही भागांचे वाचन करायची संधी मला मिळाली. अशाप्रकारचे काम मी याआधी केलेले असल्याने ध्वनिमुद्रणाचा काहीसा अनुभव होता. प्रशालेतल्या काही विभागांबरोबर काम केल्याने तिथल्या कार्यसंस्कृतीचाही अंदाज होता. असं असतानाही हा अनुभव नवा आणि छान होता! मला संहिता चार दिवस आधीच मिळाली. वाचनाच्या दृष्टीने काही किरकोळ बदल करायला पुरेसा वेळ होता. माझे कॉलेज सुरू असल्याने माझ्या सोयीनुसार वेळ ठरवली. प्रत्यक्ष ध्वनिमुद्रण करण्याचा अनुभवही फार छान होता. प्रशालेच्या आवारात असा छोटेखानी स्टुडिओ आहे हे ऐकलं होतं. आजवर ध्वनिमुद्रण केलेल्या अनेक स्टुडिओत मला हा स्टुडिओ सोयीचा, पुरेशी तांत्रिक साधनं असणारा वाटला. इथे प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मला प्रथमच मिळत होता. सौ. शीतल आणि केदारजी यांनी उत्तम नियोजन केले होते. यथावकाश ध्वनिपुस्तिका तयार झाल्यावर मला ती पाठवली आणि इतर कलाकारांचं वाचनही मला ऐकता आलं. बराच दीर्घकाळ ही ध्वनिमुद्रण चालू असावीत. संहितेची आखणी आणि लेखन फार छान झालं आहे. नव्या पिढीच्या माध्यमात सकस साहित्य, इतिहास पोहोचवायचा हा उत्तम उपक्रम असाच बहरावा यासाठी खूप खूप शुभेच्छा!

**डॉ. प्रज्ञा कुलकर्णी**

# गणेशोत्सव

'गणेशोत्सव' हा शब्द जेव्हा जेव्हा ऐकण्यात किंवा बोलण्यात येतो, तेव्हा मनात आनंद, उत्साह, जल्लोष, भक्ती अशा अनेक भावना येतात. बर्चीच्या घोषणा, ढोल ताशाचा आवाज, ध्वजाचे उंच उंच आकाशात लहरणं. हे सगळ आठवून अंगावर शहारे येतात. यंदा २ वर्षानंतर परत नेहमीसारखा जल्लोषपूर्ण गणेशोत्सव होणार होता. कोविडमुळे मिरवणुका, प्रात्यक्षिक, मंडळ व घरांमध्ये प्राणप्रतिष्ठा हे काहीही करता आले नव्हते. पण  यावर्षी आनंद व उत्साहात हे सगळे करता येणार होते आणि यात माझ्यासाठी अजून एक वेगळी गोष्ट म्हणजे युवतींच्या गणेशोत्सवाची प्रमुख म्हणून जबाबदारी माझ्याकडे होती. सुरुवातीला गणेशोत्सव किती प्रमाणत घ्यायचा आणि कसा घ्यायचा इथून प्रश्न होते. पण खूप दिवसानंतर युवती एकत्र गोळा होतील आणि जास्तीत जास्त नवीन युवतींसाठी हा Entry Point असेल असा विचार केला व सार्वजनिक स्वरूपात गणेशोत्सव घ्यायचे ठरले. गणेशोत्सव प्रमुख म्हणून जबाबदारी घेतली तर खरं पण मनात खूप धाकधूक होती. गेले ५-६ वर्ष ध्वज नाचवला होता व बरची घेतली होती पण ढोल-ताशा या गटाला सांभाळायचा अनुभव फार नव्हता. त्यामुळे इतका गट आपण कसा सांभाळू आणि आपल्याकडून या गोष्टीला न्याय मिळेल का असे अनेक विचार मनात चालू होते. हळू हळू बैठका व्हायला लागल्या व जबाबदारी घेणारा गट उभा राहू लागला. सर्वात प्रथम उद्दिष्टांचा विचार केला आणि खातेप्रमुख ठरले. हे करताना जाणवायला लागले की आपण घेतलेली जबाबदारी सोपी नाही आहे. एकटीने सर्व गोष्टी कशा हाताळणार; याचा सुरुवातीला थोडा ताण आला. पण माझ्याबरोबर अंजली कुटे आणि गार्गीताई या दोघी नेहमी होत्या. प्रत्येक ठिकाणी त्यांनी, मला लागेल ती मदत केली. पहिल्या बैठकीचा दिवस ठरला, संपर्क चालू झाला आणि बैठकीचा दिवस आला. साधारण मनात ४० ते ५० युवती असतील असा अंदाज होता, पण युवती हळू हळू यायला लागल्या व आकडा ५०, ६०, ८०, ९० असा वाढायला लागला. मोठा आकडा बघून मनात अनेक प्रश्न पडायला लागले, की १०० युवती आल्या आहेत! इतक्या युवतींना आपण गटात कसं घेणार? इतक्या युवतींचे नीट नियोजन करता येईल का? आपल्याकडे ढोलांची आणि ताशाची संख्या पण इतकी नाही, मग आपण नवीन ढोल-ताशे विकत घेऊ शकू का? आणि या सगळ्या तर पुढच्या गोष्टी. आता बैठकीत तरी आपला आवाज १०० युवतींसमोर पोहचेल का? आणि त्याक्षणी लक्षात आले की यावर्षी नवीन काही करण्यापेक्षा नेहमीसारखा गणेशोत्सव घेणे व तो उत्तम पार पाडणे हेच एक मोठं आव्हान असणार आहे. मग कामाला वेग घ्यायचे ठरवले. सरावाची जागा, साहित्याची संख्या हे सगळं ठरवायला, बघायला सुरुवात केली. मूकबधीर शाळेत सरावाला सुरुवात झाली. सगळे व्यवस्थित नियोजनाप्रमाणे चालू

आहे असे वाटत असतानाच सरावाच्या बाबतीत मोठी तांत्रिक अडचण निर्माण झाली. सुरुवातीलाच हे मोठ्ठं संकट आलं होतं. मग दुसरी जागा शोधायचा मी निर्णय घेतला आणि खूप जागांचा विचार करून शेवटी २ दिवसात आम्ही दुसरी जागा शोधलीआणि पुन्हा सराव नियमित सुरू झाला. याबरोबरीनेच अजूनही सरावाच्या वेळेस अडचणी येत होत्या जसे की जोरदार पावसाची सरावाच्या वेळेसच हजेरी, युवतींची संख्या ढोलापेक्षा जास्त असणे, युवती प्रशिक्षकांचे काही कारणामुळे सरावाला येऊ न शकणं, ऐन वेळेला बरची घ्यायला येणाऱ्या ताईची काहीतरी अडचण असणं बऱ्याच गोष्टी, असे प्रसंग आले की प्रत्येक वेळी सगळ सोडून द्यावं असं वाटायचं किंवा आता आपल्याकडून प्रमुख म्हणून काम करणे होणार नाही असे वाटायचे, तेव्हा नेहमी माझ्या आवडत्या पद्यातली ओळ आठवायची, *'थको कधी न त्राण पावलातले, गळो कधी न धैर्य अंतरातले'* आणि मग परत उत्साहाने कामाला सुरुवात व्हायची. या पूर्ण प्रक्रीयेमध्ये स्वतः नेहमी प्रेरित राहणे हे सगळ्यात अवघड आणि महत्त्वाचे होते.

महिनाभर सराव, परीक्षण, बैठका, नियोजन करून शेवटी बाप्पाचं आगमन झालं. अनेक युवतींनी त्यांच्या घरांमध्ये प्राणप्रतिष्ठा केल्या आणि ठरलेल्या दिवसानुसार मिरवणुका व्हायला सुरुवात झाली. म्हणता म्हणता विसर्जनाची वेळ जवळ आली. बाप्पाला निरोप देण्याबरोबर ह्या गेल्या महिन्याभरातल्या सगळ्या अनुभवांना, लोकांना, सरावाला, वाद्याला असे सगळ्यालाच निरोप द्यावा लागेल हा विचार करून मनात दाटून आले. ज्या मिरवणुकीसाठी गेले महिनाभर परिश्रम, धावपळ, मेहनत केलेली ती मिरवणूक जवळ आलेली. दहावा दिवस आला प्रबोधिनी- निगडी केंद्र, प्रभात रोड, दळवीनगर अशा तीन मिरवणुका आम्हाला करायच्या होत्या.

शाळेची मिरवणूक संपता संपता उशीर झाला आणि प्रभात रोडला दिलेल्या वेळेत जायला उशीर झाला. सतत फोन येऊ लागले पण तरी देखील सर्व गोष्टी सांभाळून युवतींचा गट ठरलेल्या ठिकाणी पोहचला. प्रबोधिनी सावधान अशी आज्ञा दिली आणि ध्वज नमस्ते झाले व तो क्षण आला. ताशाची तर्री, ढोलाचा पहिला ठोका, बर्च्यांचा आवाज हे सगळ ऐकून अंगावर शहारे आले. सगळीकडे फक्त एकच आवाज ऐकू यायला लागला 'आवाज कोणाचा? प्रबोधिनीचा!' सर्व वादक बेधुंद होऊन वादन करत होते. ऊन, पाऊस याचा काहीही विचार न करता आपल्या बाप्पासाठी तहान भूक सोडून सगळ्या युवती बर्ची आणि वादन करत होत्या. पुण्यात निगडी युवती विभागाने मिरवणूक करायची ही पहिली वेळ होती. त्यामुळे प्रभात रोडला पहिले वादन व बर्ची करण्याचा एक वेगळाच सुखदायी अनुभव होता.

पण याउलट अनुभव दळवीनगर मिरवणुकीमध्ये आला. प्रत्येक मिरवणुकीआधी प्रत्येक मंडळाला नियमावली दिली जाते व त्यानुसार त्या नियमांचं पालन ते मंडळ करेल असे आम्ही मंडळाकडून लेखी घेतो. हे करून सुद्धा दळवीनगरला गेल्यावर नियमांचे पालन झाले नाही. आजूबाजूला मद्यपान केलेले काही लोक होते. त्यांच्यापासून गट सुरक्षित असला पाहिजे याची चिंता पण सतत मनात होती. मंडळाच्या मुख्य

कार्यकर्त्यांना आम्ही व्यवस्थित सांगितले की डीजे मोठे स्पीकर्स, बँड नसावा. २-३ वेळा हे सांगून सुद्धा मंडळाने बँड चालू ठेवला. मग कठोर निर्णय घ्यायची वेळ आली, आम्ही ठरवले की जर मंडळाने हा बँड बंद केला नाही तर मिरवणुक आम्ही तिथेच थांबवू. आजूबाजूला आपल्याहून वयाने आणि शरीरयष्टीने मोठे लोक आहेत तेव्हा असा निर्णय घेताना व तो मंडळातल्या लोकांना हे सांगताना मनात भीती वाटत होती पण गीताने मला खंबीर पाठींबा दिला व आम्ही ठाम राहून आपल्या नियमांचे पालन मंडळाकडून व्हायलाच हवे याबाबत आग्रही भूमिका घेतली.

मिरवणुकीचा आधीचा महिना मला प्रमुख म्हणून खूप शिकवणारा होता. दळवीनगरला डीजे वाजवत आहेत म्हणून मिरवणूक तिथे थांबवायचा निर्णय घेणे ते आपल्या गटाची क्षमता ओळखून त्यानुसार सगळ नियोजन करणे व गरज पडेल तिथे गटाची क्षमता ताणणे अशा सगळ्या गोष्टी मी या गणेशोत्सवात केल्या. या सगळ्याबरोबर स्वतःचे अनुभव व कौशल्य नक्कीच वाढले असे वाटते. सध्याच्या बाहेर होणाऱ्या मिरवणुकांमध्ये वाहवत न जाता प्रबोधिनीच्या विचारांप्रमाणे जबाबदारी पार पाडू शकले याचा निश्चित आनंद आहे. अर्थात या सगळ्या गोष्टी जबाबदारी घेतलेल्या युवतींच्या उत्तम सहकार्यामुळे साध्य झाले. त्यामुळे ही जबादारी पार पाडण्यात त्यांचाही सिंहाचा वाटा आहे.

**अबोली भंडारी**

युवती विभाग, निगडी

## तंत्रशिक्षण अभिरुची

तंत्रशिक्षण अभिरुची या गटात आमच्या पाल्याने अनेक महत्त्वपूर्ण कृती उप्रकम केलेले आहेत. या विभागाशी संबंधित अनेक टूल्स व मशीन उत्तम प्रकारे हाताळलेले आहेत त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास नक्कीच वाढलेला जाणवतो. एका स्वीचने दोन दिवे लावणे, सौर ऊर्जा एलईडी पणती लाईट माळा बनविणे, जिना वायरिंग इत्यादी अनेक प्रकारच्या उत्तम कृती उप्रकम आमच्या मुलांनी आवडीने केल्या. कृती उप्रकम विद्यार्थ्यांनी स्वतः केलेल्या असल्यामुळे या विद्यार्थ्यांची या विषयातील असलेली आवड, त्यांना शिक्षकांनी दिलेले प्रोत्साहन यामुळे आमच्या पाल्यांच्या प्रतिभेला मिळालेला वाव आणि या सर्वांचा परिपाक म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेले विविध उपक्रम होय. विद्यार्थ्यांना विषयाची माहिती चांगली आहे हे लक्षात आले, सुयोग्य निवड कशी करावी याचे तंत्र त्यांना अवगत झालेले आहे व त्यामुळेच आमचे पाल्य विविध उपक्रम तसेच विविध उप्रकम उत्तम प्रकारे पूर्ण करू शकले याचा आम्हाला मनापासून आनंद वाटतो. आमच्या पाल्यांना चांगले प्रोत्साहन आणि मार्गदर्शन दिल्याबद्दल संस्था व शिक्षकांचे मनःपूर्वक आभार.

**श्री.प्रसाद प्रमोदकुमार कोहणे**

पालक

## श्री. व्यंकटेश पांडे

माझे बाबा म्हणजेच सर्वांचे लाडके पांडे काका. कोणतेही काम नीट नियोजनपूर्वक करणारे, प्रभावशाली व्यक्तिमत्व असणारे, वेगवेगळे धाडस करणारे, अनेक माणसे जोडणारे, सतत कार्यमग्न असणारे, कुणाच्याही मदतीला तत्पर असणारे, भ्रमंतीची आवड असणारे माझे बाबा असे अनेक विषय त्यांच्याबद्दल बोलण्याचे - लिहण्याचे.

या सगळ्या विषयात त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय म्हणजे भ्रमंतीचा. त्यांनी त्यांची ही आवड आयुष्यभर जोपासली. अगदी शेवटच्या दिवसांमधे सुद्धा त्यांच्या मनात तोच विषय. त्यांच्या या आवडीमुळे आम्हा मुलींना देखील लग्न होईपर्यंत खूप फिरायला मिळाले. दरवर्षी न चुकता दिवाळीच्या, उन्हाळ्याच्या सुट्टीत एकतरी ट्रीपचं नियोजन त्यांनी केलेलं असायचं. गेल्या काही वर्षात जरी ते travel agency तर्फे trip करत असले तरी पूर्वी (आमच्या लहानपणी) सर्व गोष्टींचे नियोजन ते स्वतः करायचे. त्या नियोजनात वर्षातून एकदा शेगाव आणि दर पाच वर्षांनी तिरुपती बालाजी अगदी ठरलेले. या सगळ्या trips च्या आठवणी खरंच खूप सुंदर आहेत. या सगळ्यात अतिशय अविस्मरणीय अशी ठरलेली trip म्हणजे माझं लग्न ठरल्यावर, लग्नाआधी माझ्यासाठी स्पेशल ठरवलेली trip. दार्जिलिंग आणि गंगटोकची. या trip मधे बाबांच्या एका धाडसामुळे एक वेगळीच गंमत आली.

त्याचं झालं असं, त्या trip मधे बाबांचे एक मित्र रमेशकाका त्यांच्या कुटुंबासोबत आमच्या बरोबर आले होते. कलकत्याला रमेशकाकांची तब्येत चित्रविचित्र खाण्यामुळे अचानक बिघडली. रमेशकाका खूप घाबरून गेले. त्यामुळे बाबा त्यांना डॉक्टरकडे घेऊन गेले. डॉक्टरांनी काकांना ॲडमीट करून घेतलं. त्याच दिवशी संध्याकाळी आमची पुढच्या प्रवासाची रेल्वे होती. पण ॲडमीट असलेल्या काकांना डॉक्टर सोडायला तयारच नव्हते. मग काय बाबांनी गुपचुप त्यांच्या सलाईनच्या सुया काढल्या आणि हॉस्पिटलच्या बिलाचे पैसे तिथे कॉटवर ठेऊन काकांना घेऊन रेल्वे स्टेशनवर पळून आले. त्या दिवशी धावतपळत ती रेल्वे आम्ही सगळ्यांनी पकडली. आणि मग पुढचे आठ दिवस त्याविषयावर बोलून बोलून आमची हसता हसता पुरेवाट झाली.

वैष्णोदेवी, चार धाम यात्रा अशा बिकट ठिकाणी ते लोकांना सामान ने आण करायला, सोबत करायला, प्रसंगी म्हाताऱ्या माणसांना पाठकुळी घ्यायला सुद्धा तयार असायचे. त्यांच्या या स्वभावामुळे ते अनेक सेवाभावी संस्थांसोबत कार्यरत होते. रेल्वे कर्मचाऱ्यांकडून इमर्जन्सी कोर्ससाठी असणाऱ्या आर्मी ट्रेनींगमध्ये ते महभागी असायचे. या ट्रेनिंगमधे इतरही कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे याकरता त्यांना प्रेरीत करायचे. या ट्रेनिंगमधे जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांना सहभागी करून घेण्यासाठी आणि सर्वोच्च पद मिळवल्याबद्दल त्यांना 'राष्ट्रपती पदक' देऊन गौरविण्यात आले. इतकेच नाही तर रेल्वेतून रिटायर झाल्यावर रिटायर फेडरेशनचे काम त्यांनी हाती घेतले. यामधून त्यांनी अनेक अडल्यानडल्या लोकांची मदत केली. कर्मचाऱ्याच्या मृत्युनंतर त्यांच्या कुटुंबाला देखोल पेन्शन मि ळवून देण्यासाठी त्यांनी मदत केली. असे माझे बाबा हॉस्पिटलमध्ये ॲडमीट व्हायच्या आधीपर्यंत कार्यमग्न राहिले आणि लोकांसाठी झटत राहिले. असे आमचे बाबा. अजूनही विश्वास बसत नाही की ते आमच्यात नाहीत. त्यांच्या विचारातून, त्यांनी केलेल्या कार्यातून, संस्कारातून ते नेहमीच आमच्या सोबत असतील. त्यांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सौ. वैभवी नरेन्द्र डेंगवेकर**

# पांडे काका

पांडे काका हे एखाद्या लोककथेमध्ये आवर्जून आढळणारे असं हे नाव माझ्याही जीवनामध्ये कधी आलं हे मला कळलेच नाही १९८६ या वर्षात दिवाळीच्या सुट्टीमध्ये पांडे काकांच्या सोबत हरिद्वार, ऋषिकेश, दिल्ली, राजस्थान असा अभ्यंकर आणि पांडे सहकुटुंब प्रवास करण्याचा योग आला. आणि याच प्रवासामध्ये एका उमद्या आणि दिलदार व्यक्तिमत्त्वाशी काका म्हणून नाते जोडले गेले. विविध रेल्वे स्टेशनची वेगवेगळ्या रेल्वेच्या योजनांची रंगतदार माहिती संपूर्ण प्रवासामध्ये काका अखंडपणे देत होते. माझा तो पहिलाच मोठा रेल्वे प्रवास समजत्या वयामधला असल्या कारणाने मी त्या माहितीने हरखून गेलो होतो. त्यानंतर मातृ मंदिर संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये मला पांडे काका सतत भेटतच राहिले. मातृ मंदिर विश्वस्त संस्थेतर्फे घेतल्या जाणाऱ्या समूहगान आणि अन्य स्पर्धा या उपक्रमांच्या निमित्ताने काकांच्या सोबत एकाच वाहनातून सात आठ दिवस प्रवास करण्याचा, महाराष्ट्रभरातील विविध शाळांना भेट देण्याचा असा योग सलग अनेक वर्षे आला. या प्रवासामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यातील विविध सद्गुणांचा प्रभावी पैलूंचा अतिशय जवळून परिचय झाला. अतिशय धडधाकट आणि संयमित, अभ्यासू, अनुभव संपन्न असलेले काका नेहमीच अतिशय विलक्षण अशा प्रकारची काही ना काही माहिती सांगत. या संपूर्ण प्रवासाच्या काळामध्ये कै. भाऊंना अतिशय साजेसे असेच ते सहकारी असल्याचे जाणवत राहिले. त्यांचे नित्य अति पहाटे उठणे, सद्गुरु गजानन महाराजांच्या पोथीचे वाचन, व्यायाम हे कधीही चुकले नाही. साधेपणा, प्रसन्नपणा, विनम्रता आणि कार्य तत्परता अशा गुणांचे अनोखे रसायन म्हणजे पांडे काका. एखादी गोष्ट हौसेने खावीशी वाटली तर हक्काने सांगायचे कोणाला? तर त्याचे उत्तर म्हणजे पांडे काका.

पांडे काकांच्या धीरोदात्त स्वभावाचा आणि त्यांच्या मधल्या व्यवस्थापन कौशल्याचा एक उत्तम नमुना म्हणजे २६ जुलै २००५ या दिवशी जो प्रचंड पाऊस झाला होता. त्यादिवशी त्यांनी ठाणे रेल्वे स्टेशनची परिस्थिती ज्या प्रकारे हाताळली होती ती कित्येक लोकांनी वाखाणली होती आणि अनेक वर्ष त्यांनी हाताळलेला हा प्रसंग लोकांच्या लक्षात सुद्धा राहील. पांडे काका त्याकाळी ठाणे रेल्वे स्टेशनचे स्टेशन मास्तर म्हणून काम पाहत होते. मुंबईपासून बदलापूर पर्यंतचा संपूर्ण टापू प्रचंड पडणाऱ्या पावसाने खूप मोठ्या पुराच्या तडाख्यात सापडलेला होता. या सगळ्या प्रदेशांमध्ये अवघ्या २४ तासांमध्ये १००० मिलिमीटर पेक्षाही जास्त पाऊस बरसला होता. कित्येक इमारतींच्या दुसऱ्या मजल्यापर्यंत पाणी पोहोचलेले होते. नद्या नाले तुडुंब वाहत होते. मुंबईची जीवन वाहिनी असलेली रेल्वे बराच काळ प्रयत्न करूनही थांबली होती. रुळांवर, प्लॅटफॉर्मवर सर्वत्र पाणीच पाणी होते. कित्येक प्रवासी रेल्वे स्थानकावरती अडकून पडले होते.

अवतीभवतीचे अनेक लोक आश्रयाला रेल्वे स्थानकावरती येऊन थांबलेले होते. पुढे काय होणार कोणालाच काही समजत नव्हते. कोणाची मुले घरी एकटी होती तर काही मुलेच रेल्वे स्थानकावरती अडकून पडली होती. अनेक वृद्ध माणसं घरांमध्ये तर काही रेल्वे स्थानकावरती  अडकून पडली होती. क्षणोक्षणी पाणी वाढत होतं. भीती गोंधळ आणि चिंता आणि त्यात गर्दीची भर पडत होती. रेल्वेने काहीतरी व्यवस्था करावी अशी अपेक्षा करत अनेक लोक आरडाओरडा करत होते. रेल्वेचे कर्मचारी सुद्धा आपल्या परीने प्रयत्न करत होते परंतु त्यांच्या प्रयत्नांना फारच मर्यादा होत्या. या प्रसंगात पांडे काकांनी अनेक प्रवाशांना, अडचणीत सापडलेल्या लोकांना धीर देऊन त्यांच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली. त्यांच्या कामाच्या वेळेचा वगैरे तर अजिबातच विचार न करता सलग २४ तासांपेक्षाही अधिक काळ काम करत विविध लोकांच्या घरी निरोप पोहोचवणे, स्थानकावरती लोकांना आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढून काहीतरी अन्नपदार्थ पुरवणे आणि लवकरच हा आकाशातून कोसळणारा पाऊस थांबेल तोपर्यंत धीर धरा आम्ही तुमच्या सोबत आहोत असा विश्वास देण्याचे मोलाचे काम पार पाडले. खरे तर सर्वांच्या सारखेच परिस्थितीसमोर हतबल होऊन हातपाय गाळून ते बसू शकले असते परंतु आपल्यावरची जबाबदारी ओळखून समाजाप्रती असलेल्या आपल्या नात्याचा विसर न पडता अखंड २८ तास काम करून त्यांनी ठाणे स्थानकावरचा अतिशय गंभीर प्रसंग मोठ्या धीराने हाताळला. आपल्या असण्याचा इतरांना काही लाभ द्यावा आपले संपर्क, आपले कौशल्य, आपला अभ्यास याचा अनेकांना आधार वाटावा याकरता ते स्वतःहून प्रयत्न करत. रेल्वे मधल्या अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना काही कार्यालयीन तर कधी कौटुंबिक स्तरावरची मदत सुद्धा करण्यामध्ये पांडे काका अग्रगण्य असत. पांडे काकांच्या बरोबरच्या प्रत्यक्ष संवादाची ३५ वर्षे ही अतिशय संस्मरणीय अशीच राहिली आहेत. कुठलाही विषय मोकळेपणाने बोलण्याचं एक हक्काचं ठिकाण हे पांडे काकांच्या निधनाने आपण हरवून बसलो आहोत; अगदी कायमचेच.

**श्रीकृष्ण अभ्यंकर –** ज्ञान प्रबोधिनी गुरुकुल विभाग

## माझे आजोबा

माझ्याकडे आजोबांच्या खूप साऱ्या आठवणी आहेत. त्यातल्या काही आठवणी मी तुम्हाला सांगणार आहे. चिंचवडहून मी आजोबांना फोन करायचे. त्यावेळेला आजोबा म्हणायचे हॅलो नभा राणी, गाते गाणी, हा, हा, हा आणि खूप हसायचे. आजही माझ्या कानात ते हसणे घुमत आहे. एकदा आजोबा चिंचवडला आले होते. त्यांना मी मराठीचा धडा बिनचूक व खणखणीत वाचून दाखवला. ते खूप खूष झाले आणि त्यांनी लगेच मला १०० रुपये बक्षीस दिले. मला म्हणाले, आईबरोबर जाऊन तुला आवडेल ते घेऊन ये. मी त्यांचे water colours आणले. आजही चित्र रंगवताना मला त्यांची आठवण येते. अशा प्रेमळ कौतूक करणाऱ्या आजोबांना माझे शतशः नमन.

**नभा नरेंद्र डेंगवेकर**

# आजोबा

त्यांच्या माझ्या नात्याचे नाव आजोबा ऐवजी आबोजा असे म्हणण्याचा, गडबड घोटाळा माझ्या न कळत्या वयात झाला, पण त्यात जो गोडवा आणि वेगळेपणा होता, त्यामुळे नंतरही त्यांना नेहमी तसेच हाक मारत राहिलो.

मला अंधुक आठवते, पण आई अनेकदा सांगते की, मी लहानपणी बाईआजी आणि त्यांच्यासोबत खूपदा गजानन महाराजांच्या बागेत जायचो, माझे मन भरेपर्यंत ते मला खेळू द्यायचे..

थोडा मोठा झाल्यावर त्यांच्याकडून त्यांचे मिल्ट्रीचे अनुभव ऐकणे खूप प्रेरणा देणारे होते, ते ऐकताना भारतीय संरक्षण व्यवस्थेचा अभिमान, प्रेम, आदर निर्माण झाला, आणि भविष्यात त्याचा भाग व्हावे याचे बीज मनात घोळत असते.

पत्ते खेळणे मी त्यांच्याकडून शिकलो, त्यात काहीही वाईट नाही, त्यातूनही अनेक क्षमता विकसित होतात, याची पूर्ण खात्री त्यांना असल्याने कधीतरी आमच्या दोघांचे पत्त्यांचे डाव रंगायचे.

दर गुरुवारी संध्याकाळी राजे (त्यांना म्हणे माझे नाव युवराज ठेवायचे होते) अशी हाक मारून गजानन महाराजांचा माझ्यासाठी न चुकता आणलेला प्रसाद ते मला द्यायचे.

अजूनही खूप काही आहे, सांगत राहिलो तर त्याचे स्वतंत्र पुस्तक होईल आणि कमी अधिक फरकाने अनेकांना असेच वाटत असेल, अशी ज्यांची सागरा इतुकी माया, आभाळाएवढे प्रेम अनुभवले. त्यातले काय काय सांगावे, खोलवर रुजलेल्या शब्दात का बांधावे, हे समजत नसल्याने, त्यांच्या वेगवेगळ्या गुणांची यादी करायला बसलो, तर कोणता गुण बघितला नाही हे सांगताच येणार नाही म्हणून, त्यांच्या नावात सामावणारे गुण किमान माझ्यात येवोत, असे आशीर्वाद त्यांच्याकडे (कारण ते विचार, आशीर्वाद, शुभेच्छा कोणत्या ना कोणत्या रुपात सदैव माझ्यासोबत असणार आहेत) आणि ईश्वराकडे मागतो.

आबोजा, खूप लवकर पुढचा प्रवास सुरु केलात, काय हरवले हे नेमकं नाही सांगू शकत, कारण तुम्ही नाहीत हेच अजून स्वीकारले नाहीये.

एकच सांगतो, माझ्याकडून काही चुकले असेल, राहिले असेल त्याला माझी कमतरता समजून माफ करा आणि यापुढे ज्या ज्या वेळी योग्य-अयोग्य निवडीची वेळ येईल तेव्हा विचार बनून मार्गदर्शन करा.

**तुमचा नातू, (राजे) गंधार**

## आनंदाचे झाड

आयुष्य नुसतं जगायच नाही तर त्याचा महोत्सव करायचा असतो हे खरं की काल्पनिक याच्या तपशीलात न जाता असं जगता येतं हे जाणवणं महत्त्वाचं. अशा विचारांचे चिंतन करीत वयाची ७३ वर्षे जीवनाची वाटचाल करणारे कै. व्यंकटेश पांडे म्हणजे सर्वांचे पांडे काका.

रोज गीतेचा एक अध्याय पठण करायचा त्यांचा नेम होता. त्यातूनच कर्ममार्गाने जाण्याची प्रेरणा मिळाली असावी. 'नेकी कर और दर्या में डाल' असे ते म्हणायचे. 'असु आम्ही सुखाने पत्थर पायातील' या उक्तीप्रमाणे शाळेसाठी ते सतत कार्यरत राहिले. कोणते काम श्रद्धेने, समर्पण भावनेने व त्याचबरोबरीने आवडीने करावे असे ते म्हणत. कामाची आवड असेल तर सवड काढता येते आणि कामातून आनंद व समाधान मिळते अशी त्यांची कामाकडे बघण्याची दृष्टी होती. ते कुटुंबात, नातेवाईकांमध्ये, समाजात आणि कोठेही असले तरी आपल्या सहवासाने वातावरण आनंदित करायचे. समस्येवर उत्तर शोधण्याची विलक्षण हातोटी त्यांच्याकडे होती. माणसे ओळखणे, त्यांच्याकडून त्यांच्या शक्तीप्रमाणे काम करून घेणे, कोणाचेही मन दुखावले जाणार नाही अशा पद्धतीने वागणे हे त्यांना सहजपणे जमे. उतारवयानुसार थोडी धावपळ कमी करावी असे मी त्यांना सुचवले त्यावर 'काम हाच माझा खरा श्वास आहे' असे ते म्हणाले. निरपेक्षपणे शुद्ध भावनेने दुसऱ्याचे हित व्हावे या हेतूने ते आयुष्यभर कार्यरत राहिले. अनेकांना त्यांनी एका विशाल वटवृक्षाप्रमाणे छाया दिली, प्रेरणा दिली. शनिवार दिनांक ४ मार्च २०२३ रोजी हे आनंदाचे झाड अनंतात विलीन झाले. त्यांच्या स्मृतींना शतशः नमन.

**श्रीमती पद्मावती व्यंकटेश पांडे**


## व्यंकटेश एकनाथ पांडे... माझे बाबा

*सांडूनिया ही जरजीर्ण वस्त्रे मनुष्य घेतो दुसरी नवीन।*

*तशीच टाकून जुनी शरीरे आत्मा ही घेतो दुसरी निराळी।।*

श्लोक म्हणत बाबांच्या पुढच्या प्रवासाला सुरुवात झाली. या श्लोकाचा किंवा त्यानंतरच्या साऱ्या उपचाराचा एक वेगळाच अनुभव घेतला, कारण काही नाती आपल्याला शेवटच्या श्वासापर्यंत हवीच असतात.

त्यांच्यासाठी अशी कोणतीही वेळ येईल, याला मनाने मान्यताच नसते. आनंद चित्रपटात




म्हटल्याप्रमाणे, आपण फक्त एक कठपुतली आहोत, विश्वाच्या या रंगमंचावर कोणतीही गोष्ट आपल्या इच्छेने घडतच नसते याचा पुरेपूर अनुभव घेतला. याला परिपक्व होत जाणे म्हणत असतील, तर मला नाही व्हायचे मोठे. याची तरी कुठे परवानगी आहे..? त्यामानाने आपण भाग्यवान की, वयाची चाळीस वर्ष आपण बाबांच्या वात्सल्याचा मनसोक्त आनंद घेतला.

५ मार्च नंतर सलग काही दिवस बाबांचे मित्र, नातेवाईक भेटायला यायचे, आठवणींनी गदगदून जायचे. अनेकांनी आपल्या भावना शब्दात मांडल्या. तूही लिहितेस ना नेहमी? मग बाबांविषयी लिही, असे सांगितले.पण मला नेहमीच कुणाबद्दल बोलायचे, लिहायचे म्हणले, की ती व्यक्ती समोर हवी असते. माझ्यासोबत ज्यांच्या विषयीच्या प्रत्येक गोष्टीत त्यांचा अर्धा वाटा आहे, ते सारे फक्त आमच्या दोघांचे आहे. ते त्यांच्याशिवाय कसे सांगू. या संभ्रमात इतके दिवस गेले,

*जन पळभर म्हणतील हाय हाय..*

या गीताचा प्रत्येक शब्द खरा होताना, गेले तीन महिने अनुभवत आहे. स्वतः मी सुद्धा माझ्या दिनक्रमात अडकून गेलेच ना. आठवण यायला एकही सेकंद त्यांना विसरलेले नाही, ते शक्यही नाही पण त्याच्या शरीराने सोबत नसण्याचा आता हळूहळू स्वीकार केला आहे. लिहायला घेतले कारण, ते विचार, संस्कारांनी सदैव सोबत असणारच आहेत आणि शब्दांत व्यक्त होताना, त्यांच्यासोबत अनेक क्षण पुन्हा नव्याने जगता येणार आहेत.

**सौ. वृषाली डेग्वेकर**

## क्रांतिकारकांची गौरवगाथा

नमस्कार

इतिहासाच्या पुस्तकात अनेक क्रांतिकारकांची माहिती वाचली होती पण ती फक्त परीक्षेत गुण मिळवण्यासाठी पण त्यांच्या कार्याबद्दल कधीच जाणून घेतलं नाही आणि थोडी फार माहिती दिली त्या आपल्या बॉलीवूडच्या चित्रपटांनी. पण शाळेच्या क्रांतिकारकांची गौरवगाथा या प्रकल्पाच्या निमित्ताने पुन्हा एकदा संधी दिली या क्रांतिकारकांच्या कार्याबद्दल आणि त्यागाबद्दल जाणून घ्यायची. ७५ क्रांतिकारक पुन्हा एकदा नव्याने समजले असे म्हणायला हरकत नाही. प्रकल्पाची बरीचशी जबाबदारी अंगावर असल्याने मुळापासून तयारी करायची होती. नावं तर ठरली पण वाचल्यानंतर असं लक्षात आलं की प्रत्येकाचं कार्य इतकं मोठं आहे की त्याला संक्षिप्त स्वरुप द्यायचं कसं. पण ती जबाबदारी विनयाताईने लीलया पेलली त्यामुळे काम सोपे झाले. आजपर्यंत बऱ्याच ठिकाणी रेकॉर्डिंग केले पण इथे स्क्रिप्ट तयार करण्यापासून रेकॉर्डिंगपर्यंत सगळीच जबाबदारी होती त्यामुळे एक वेगळाच अनुभव होता. त्या निमित्ताने अनेक मान्यवर लोकांना भेटण्याची आणि त्यांच्याशी बोलण्याची संधी मिळाली. त्या निमित्ताने प्रत्येक वाचकाच्या वाचनातला, आवाजातला वेगळेपणा अनुभवता आला. केदारदादा बरोबर स्टुडिओत बसून अनेक तांत्रिक गोष्टी नकळतपणे शिकता आल्या. देशाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने असा प्रकल्प करायची संधी मिळाली याचा आनंद वाटतो. क्रांतिकारकांचे हे योगदान पुन्हा एकदा ऑडिओ स्वरुपात नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न नक्की यशस्वी होईल यात शंका नाही.

**सौ. मानसी फाटक – वाचक**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत २०२२ पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता आठवीमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे.**

| विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण % | विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण % |
|---|---|---|---|
| कु. सृजा खातू | ८६.००% | चि. यश पिंगळे | ८३.००% |
| चि. कार्तिक पाटील | ७३.००% | कु. समृद्धि काळे | ७१.००% |
| कु. आर्या कुलकर्णी | ७०.००% | कु. अथिला पाटील | ६९.००% |
| चि. कृष्णा गावडे | ६४.००% | कु.आस्था प्रधान | ६३.००% |
| कु. सृष्टी कोटकर | ६२.००% | | |

# सेवाव्रती कै. व्यंकटेशजी पांडे

मी आणि व्यंकटेशजी पांडे पहिल्यांदा भेटलो ते निगडी येथील प्राधिकरणात. ८ जून १९८० रोजी प्राधिकरणात राहायला आलो. तेव्हापासूनची आमची मैत्री. त्यावेळेला हा परिसर New Town Development असा होता. त्यालाच मराठीत नवनगर असे म्हणतात. त्यावेळी अनेक सुविधांचा येथे अभाव होता. जसे की किराणा दुकान, दूध केंद्र, पीठ गिरणी, रस्त्याची व पाण्याची व्यवस्था, पोस्ट ऑफिस इत्यादी. या सुविधा या नगरवासीयांना मिळाव्यात म्हणून प्रयत्न करणाऱ्यांमध्ये व्यंकटेशजीही सहभागी होते. या नवनगर मधील पहिला स्वातंत्र्यदिन सादरीकरणाच्या कार्यक्रमात व्यंकटेशजी पांडे यांचा मोलाचा वाटा आहे. व्यंकटेशजी हे मूळचे लातूर जिल्ह्यातील. त्यांचा जन्म १६ फेब्रुवारी १९५० रोजी झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. पर्यंत झालेले होते. आई वडील, दोन भाऊ, तीन बहिणी आणि त्यांच्या पत्नी असा मोठा परिवार त्यांचा आहे. या परिवारात त्यांच्या दोन कन्याही आनंदाने वाढल्या आणि उच्च शिक्षित झाल्या.

प्राधिकरणात एक चांगली शाळा असावी यासाठी आग्रही भूमिका धरणारे व्यंकटेशजीही एक होते. पुण्यात ज्ञान प्रबोधिनी ही एक चांगले सामाजिक काम करणारी आणि मनुष्यघडणीचे शिक्षण देणारी संस्था आहे असे आम्ही ऐकून होतो. तसेच यापैकीच्या काही कामांचा अनुभव ही आम्ही घेतलेला होता. प्राधिकरणात ज्ञान प्रबोधिनी यावी असा आम्ही ठाम निश्चय केला. १९८१ साली फेब्रुवारी महिन्यात ज्ञान प्रबोधिनी पुणे येथे कै. आप्पासाहेब पेंडसे यांचे समवेत मी, व्यंकटेशजी पांडे, बाबा पटवर्धन, सुधाकर बराटे, शशिकांत जोशी, जगदीश राणे, अशा १० - ११ व्यक्तींची बैठक झाली. त्यावेळी आप्पा म्हणाले की नव्याने शाळा सुरु करणे सध्या अवघड आहे. मात्र तुमच्या प्रस्तावाचा विचार करतो. आप्पांसोबत झालेल्या दुसऱ्या बैठकीत मी आणि व्यंकटेशजी पांडे उपस्थित होतो. त्यावेळी आप्पा म्हणाले की, ज्ञान प्रबोधिनीचे काम सुरू होईल मात्र आर्थिक व्यवस्था तुम्हाला उभी करावी लागेल. आप्पांचे हे म्हणणे मान्य करून आम्ही पुढील प्रयत्न सुरू केले. तिसरी बैठक प्राधिकरणात घेण्याचे आम्ही ठरवले आणि यासाठी आप्पांना निमंत्रित केले. प्राधिकरणातील सर्व व्यक्तींना शाळा सुरू होण्यासंबंधीची कल्पना व पत्रक देऊन बैठकीस येण्याचे आवाहन आम्ही केले. व्यंकटेशजी पांडे यांच्या पुढाकारामुळे डी. डी. पाटील यांच्या बंगल्यात झालेल्या या बैठकीस प्राधिकरणातील ९० पेक्षा अधिक स्त्री-पुरुष आलेले होते. या बैठकीत आप्पांनी मार्गदर्शनानंतर एक आवाहन केले. ज्यांना ज्यांना नवनगर मध्ये ज्ञानप्रबोधिनी ची शाळा सुरू व्हावी वाटते त्यांनी त्यांनी एक पत्र लिहून येत्या आठ दिवसात मला द्यावे असे सांगितले.त्यानुसार दुसऱ्या दिवशी व्यंकटेशजींनी स्वतः चे पहिले पत्र मला आणून दिले. त्यानंतर इतर व्यक्तींची पत्रे आम्ही गोळा केली. ही पत्रे घेऊन आम्ही

आप्पांना भेटायला गेलो त्यावेळी किती जणांनी स्वतः तुम्हाला पत्रे आणून दिले असे आप्पांनी विचारले. नऊ दहा जणांनी असे आम्ही सांगितले. म्हणजे हे नऊ दहा जण नक्की काम करतील असा विश्वास वाटतो असे आप्पा म्हणाले.

प्राधिकरणात शाळा सुरू व्हावी म्हणून विद्यार्थ्यांचा सर्व्हे करण्यात आला. त्यावेळी व्यंकटेशजी पांडे, सुधाकर बराटे, शशिकांत जोशी यांनी हा सर्व्हे केला. २२ जून १९८१ रोजी भाऊंच्या हस्ते उद्‌घाटन होऊन ज्ञान प्रबोधिनी मार्गदर्शित नवनगर विद्यालय या नावे एल आय जी कॉलनीत शशिकांत जोशी, खिरापते यांच्या घरात आपली शाळा सुरू झाली. भाऊंसोबत अध्यापकांच्या निवडीमध्येही व्यंकटेशजी पांडे सहभागी होते. विद्यालयासाठी प्राधिकरणात जागा मिळावी म्हणून आम्ही प्रयत्न करत होतो. प्राधिकरणाचे पहिले अध्यक्ष मा. वि. म. दांडेकर यांच्या सहकार्याने आप्पांनी प्राधिकरणातील साडे चार एकर जागेची व्यवस्था केली. भाऊंनी कै. व्यंकटेशजी पांडे यांचे नामकरण पांडे काका असे केले. पांडे काका रेल्वेत नोकरीला होते. रेल्वेत रात्रपाळी असेल तर ते दिवसभर शाळेत थांबायचे. म्हणजे आपल्या नोकरीच्या ठिकाणी काम करून उर्वरित वेळ ते शाळेसाठी आणि आपल्या कुटुंबासाठी द्यायचे.

पांडे काका भाऊंकडून गीता अध्याय शिकले. रेल्वे संरक्षक प्रशिक्षक म्हणून केलेल्या उत्तम कामाबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्कारही मिळालेला होता. त्यांच्या सौभाग्यवती यांनी आपल्या विद्यालयात अध्यापिका म्हणून काम केले. त्यानंतर त्यांच्या कन्या वृषाली ताई यांनीही अध्यापिका म्हणून काम केले. पांडे काका आपल्या कुटुंबासाठी ही त्यांच्या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढत होते. अनेक सहली त्यांनी कुटुंबासाठी योजल्या. तसेच कुटुंबातील सदस्य उच्चशिक्षित व्हावेत आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. पांडे काका मी आणि भाऊ रोज ६:१५ वा. विद्यालयात उपासनेला हजर असायचो. त्यानंतर व्यायाम करायचो. १९८५ साली विद्यार्थी प्रवेश नियंत्रणासाठी विद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी गीतेचा एक अध्याय पाठ करावा असा नियम केला गेला. यावेळी इच्छुक पालकांना गीता अध्याय शिकवला जावा यासाठी आम्ही भाऊंकडे विनंती केली. भाऊंनी गीता अध्याय शिकवायला सुरुवात केली. सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी आपली ही शाळा असल्याने प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे याची गरज नव्हती. प्रथम नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. तसेच आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचा प्रवेश आपल्या विद्यालयात नाकारला गेला नाही. पांडे काका नाटकातही छान अभिनय करायचे. एल आय जी कॉलनीतील मारुती मंदिराचा पहिला चौथरा तयार करून त्यावर मारुतीची प्रतिष्ठापना करण्यामध्ये पांडे काका सहभागी होते. ते मॉडेल रेल्वे सोसायटीचे मेंबर होते. काश्मीरलाही त्यांनी रेल्वेसाठी काम केले होते. निवृत्त रेल्वे कर्मचारी संघटनेचे ते सचिव होते. ते लेखनही करत असत. जीवन आनंद या पुस्तकात त्यांच्या लेखाचे प्रकाशन झालेले होते. विद्यालयाच्या कार्यालयातही ते मदत करत असत. पांडे काकांनी भारतभर प्रवास केला. सकस आहार, व्यायाम आणि योग्य दिनचर्या यामुळे पांडे काकांचे आरोग्य उत्तम होते. मातृमंदिर विश्वस्त संस्थेचे ते संस्थापक विश्वस्त होते. राज्यस्तरीय समूहगान स्पर्धे

च्या अनेक दौऱ्यांमध्ये ते सहभागी झाले. शालेय उपक्रम आणि सहलींमध्ये सहभागी होऊन अध्यापकांना मदत करणे देणगीदारांच्या भेटी घेणे अशी कामे पांडे काका आवडीने आणि उत्साहाने करायचे. कै. भाऊंच्या अमृत महोत्सवात ही पांडे काकांनी विविध प्रकारची जबाबदारी पार पाडली. विद्यालयासाठी आपला देह पांडे काकांनी सतत झिजता ठेवला. सतत कर्म करणे आणि कार्यरत असणे हा त्यांचा ध्यास होता. अल्प कालावधीतील शारीरिक व्याधींमुळे पांडे काकांनी ४ मार्च २०२२ रोजी या जगाचा निरोप घेतला. ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र हे स्वबळावर उभे राहिले पाहिजे असा आग्रह कै. आप्पांचा होता. निगडी केंद्राचे पहिले केंद्रप्रमुख कै. भाऊ तथा वा. ना. अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली येथील कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम करून निगडी केंद्र उभे केले. सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या विकासनापासून ते समाजाच्या विकासापर्यंत येथे काम उभे राहिले पाहिजे यासाठी विविध उपक्रमांची योजना होत गेली. राष्ट्र घडणीसाठी मनुष्य घडणीचे शिक्षण देणारे निगडी केंद्र हे आज वटवृक्षाप्रमाणे विस्तारलेले आहे. केंद्रप्रमुख श्री. मनोजराव देवळेकर यांच्या नेतृत्वात निगडी केंद्र हे बहरत चाललेले आहे. त्यांच्या पुढाकाराने देशपातळीवर येथील प्रयोगांचे अनुकरण केले जात आहे. अनेक माजी विद्यार्थी, कार्यकर्ते हितचिंतक यांच्या सहयोगाने निगडी केंद्राचा सातत्याने विकास होत आहे. निगडी केंद्राचा असाच नावलौकिक वाढत राहावा व राष्ट्र कार्यासाठी अधिकाधिक कार्यकर्ते येथून घडावे हीच अपेक्षा आम्हा सर्वांची आहे.

**श्री. ज्ञानेश्वर सावंत,** संपर्क प्रमुख - ज्ञा. प्र. निगडी केंद्र
मुलाखतकार - श्री. समाधान सुसर (अध्यापक)

## TEACHING AIDS COMPETITION

Teaching aid is anything used by a teacher to help teach a lesson or make it more interesting to students. Teaching aids can come in almost any form. Some of the most common are pictures, videos, charts, flashcards, and objects, like three-dimensional models or educational toys.

Our teachers conducted a competition on teaching aid in the academic year 2021-2022.

During teaching in classa teacher uses their own creativity so that students can grasp the concept easily, While interacting with students I came to conclusion that most students know the days of the week, but get confused with the concept of yesterday, today and tomorrow.

This realisation made me think of an easier and visual way to teach the related concept. So I made a wheel which consisted days of week which benefited them to understand the concept of yesterday,today and tomorrow easily and all the students enjoyed the following activity which we conduct in the class every day.

Was happy that this concept was appreciated and made me secure third place in the competition.

**Poornima Kadam**
Teacher

# योग प्रशिक्षण वर्ग

मला शाळेत नौकरीला लागून एक वर्ष झाले, मला योगासने करायचा क्लास लावायचा अनेक दिवसांपासून मनात होते. जीवनात बऱ्याच गोष्टींना सामोरे जात, संघर्ष करत, स्वतःवर पडलेली जबाबदारी सांभाळत असतांना स्वतःची आवडनिवड, छंद, स्वतःसाठी वेळ काढून काही करणे झालेच नाही.

शाळेनी पण ह्याच वर्षी एक महिन्यासाठी योग प्रशिक्षण आयोजित केले तो माझा योगायोग समजावा त्या बद्दल शाळेचे आणि ताईंचे सर्वप्रथम मनःपूर्वक धन्यवाद.

ताईनी एका महिन्यासाठी योग वर्ग सुरु केले त्यामध्ये सुरूवातीला थोडासा त्रास झाला. कारण आमच्या शरीराला कुठे वाकायची सवयच नव्हती काही दुखलं की मेडीकलची गोळी खायची, झोपी जायचे अशी सवय झाली होती. नेहमी मानसिक, शारीरिक ताणतणावाने त्रस्त असलेले शरीर मन योगासनामुळे प्रसन्न झाले. वेगवेगळी आसने करताना मनाची एकाग्रता वाढली, शरीराला लवचिकता हळूहळू आली. एका महिन्यात सगळी आसने जमायला लागली.

योगासने झाल्यानंतर शरीर हलकंफुलकं,  ताजंतवानं होत होतं. ताणतणाव जाणवायचा नाही. रात्रीची झोप लवकर लागायची. सकाळी पण छान फ्रेश वाटायचं. श्वासाकडे कधी लक्ष दिलंच नव्हतं तेही योगामुळे कळलं. ताई प्रेमाने शिकवत होत्या. प्रत्येकाला लक्षपूर्वक बघायच्या, जवळ येऊन पुन्हा पुन्हा आसनं करायला सांगायच्या

ताईंची भाषा,

*।। साच आणि मवाळ। मिथले आणि रसाळ ।। शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे।।*

या भाषेचा प्रभाव एकदम प्रखरपणे दिशादर्शन करणारा ठरला. योगाचे महत्त्व प्रत्येक अवयवाचे आसन करणे किती महत्त्वाचे हे छान समजावून सांगितले. आम्हाला अगदी सोप्या पद्धतीने सोप्या भाषेत शिकवले एक महिना कसा संपला कळालेच नाही. कोणतेही प्रशिक्षण घेत असतांना त्या क्षेत्रातील तज्ज्ञ गुरु लागतात, ते गुरु आम्हाला लाभले आहेत. ज्ञानेश्वरीतील ओवी आठवली

*।। अगा योगी जो म्हणीजे ।। तो देवांचा देवो जाणिजे। आणि सुखसर्वस्व माझे। चैतन्य तो ।।*

ताई तुम्हाला अंतःकरण पूर्वक धन्यवाद हा उपक्रम शाळेने ठेवला त्याबद्दल संयोजकांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

**विठाबाई वाघमारे**, सेविका

अनुभव

# स्नेहसंमेलन गुरुकुल

या वर्षी गुरुकुल विभागाचे स्नेहसंमेलन हे अत्यंत वेगळ्या प्रकारचे असे झाले. हा कार्यक्रम म्हणजे भारताच्या गेल्या ७५ वर्षांमध्ये मिळवलेल्या यशाचे व प्रगतीचे कलात्मकरित्या केलेले सादरीकरण होते. कार्यक्रमाची सुरुवात विविध क्रांतिकारकांनी दिलेल्या योगदानातून स्वतंत्र झालेल्या भारतापासून करत क्रीडा विश्वातील यश, हरित क्रांती, अवकाश विश्व, शिक्षण, काश्मीरचा धगधगता प्रश्न व सध्या रद्द केलेले कलम ३७०, राममंदिर यासारखे विविध विषय विविध कलांच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर सादर केले गेले. विशेष म्हणजे कार्यक्रमामध्ये निगडी केंद्रातील सदस्याने लिहिलेली कलम ३७० व राममंदिर या विषयांवरील २ गाण्यांचे सादरीकरण झाले. ही  गाणी आपल्याच शाळेतील रेकॉर्डिंग स्टुडियोमध्ये रेकॉर्ड केली गेली होती.

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील ७५ वर्षांचा धगधगता इतिहास जाणून घेताना सर्व प्रेक्षक भारावून गेले होते. प्रेक्षकांपैकी अनेक सदस्य हे या घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार असल्याने सर्वांना हा कार्यक्र आपलासा वाटत होता. एका बाजूला अवकाश विश्व, अणुक्षमता, शिक्षण यांसारख्या विषयातील कामगिरीमुळे उर भरून येत होता तर दुसऱ्या बाजूला भारताला करावी लागलेली युद्धे, काश्मीर खोऱ्यातील भारतीयांनी सोसलेले अत्याचार, दुष्काळग्रस्त भारतातील विदारक प्रसंग पाहून दुखःदेखील होत होते. कार्यक्रमाची सांगता गेल्या ७५ वर्षात झालेल्या प्रगतीच्या आधारे आता पुढील २५ वर्षाच्या वाटचालीसाठी आपण साऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत व त्याचसाठी राष्ट्रार्थ भव्य कृतिकाही आपण सर्वांना मिळून करावयाची आहे या भावनेने संपूर्ण प्रार्थना म्हणत झाली.

१४ एप्रिल ते २८ एप्रिल या कालावधीत रोज या कार्यक्रमाची पूर्वतयारी सुरु होती. प्रत्यक्ष कार्यक्रम २९ एप्रिल २०२३ रोजी निगडी केंद्रातील मनोहर सभागृहामध्ये पार पडला. या कार्यक्रमामध्ये गुरुकुलातील २०० विद्यार्थी, १५ अध्यापक, ३५ पालक व माजी विद्यार्थी यांचा सहभाग होता. कार्यक्रमासाठी निगडी केंद्रातील मुक्तीसोपान संगीत विद्यालयातील प्रशिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी ५५० जणांचा प्रेक्षक वर्ग उपस्थित होता.

**शुभम गायकवाड**
(अध्यापक)

# निगडी केंद्र

## स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

सोमवार दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख अभ्यागत म्हणून जडणघडण मासिकाचे संपादक श्री सागर देशपांडे हे उपस्थित होते. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यालयाने ठरविलेल्या ७५ विविध क्षेत्रातील विषयावरील अभ्यास शिक्षक, पालक, विद्यार्थी करत आहेत त्यावर संशोधन प्रकल्प तयार व्हावेत. अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रत्येक विषयाची एकेक पुस्तिका तयार होईल असेही यावेळी ते म्हणाले; ''आपल्या देशाला सन १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्या ज्या क्षेत्रात अतिशय महत्त्वपूर्ण कामगिरी केली अशा ७५ विषयांवर अभ्यास पूर्ण मांडणी केली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंतचा काळ खूप महत्त्वाचा होता. या कालावधीत अनेक चांगल्या वाईट घटनांना आपला देश सामोरा गेलेला आहे. त्या सर्वांचे स्मरण ठेवून आजवर देशाला प्रगती पथावर नेणाऱ्या शेतकरी, श्रमिक, शास्त्रज्ञ संशोधक, यांच्या बद्दलची कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्याच बरोबर विद्यार्थ्यांनी या सर्वांचे भान ठेवून पुढे आपले करियर निवडावे'' असे विद्यार्थ्यांना सुचवले. ''देश प्रश्नांचा अभ्यास करा, जेवढे प्रश्न समोर येतील तेवढ्या करीअरच्या संधी तुमच्यासमोर असतील.'' असेही यापुढे ते म्हणाले.

## गणेशोत्सव

चौदा विद्या आणि चौसष्ठ कलांचा अधिपती म्हणून ओळखला जाणारा आणि आपला सर्वांचाच लडका गणपती बाप्पा यावर्षी ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रात नवा उत्साह घेऊन आला.

उत्सवाची सुरुवात दिनांक ३१ ऑगस्ट २०२२ रोजी श्रींच्या प्राणप्रतिष्ठापना समारोहाने झाली. याप्रसंगी पद्मश्री गिरीश प्रभुणे अभ्यागत म्हणून उपस्थित होते. त्यांनी यावेळी उपस्थित पलक अध्यापक आणि विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

केंद्रातील वेगवेगळ्या विभागांमध्ये त्या त्या वयोगटानुसार विद्यार्थ्यांसाठी रांगोळी, गणपती बनवणे, पाककला, गणपती सजावट, चित्रकला स्पर्धा, कीर्तन, कथाकथन, गणेश मूर्ती रंगवणे, असे प्रशिक्षण, सादरीकरण व स्पर्धा उपक्रम घेतले. याबरोबरच वयोगटानुसार श्री गणेशाच्या छोट्या श्लोकांपासून अथर्वशीर्ष पठणापर्यंत पाठांतर उपक्रमही घेतले. विद्यार्थ्यांना गणेशाच्या पौराणिक कथा सांगितल्या. काही विभागांमध्ये

गणेशाच्या गीतांचा छोटेखानी कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांना पंचखाद्यापासून ते अथर्वशीर्ष निरूपणापर्यंत विविधांगी माहिती मुलांना सांगितली. पालकांसाठीही काही स्पर्धांचे आयोजन केले होते.

या बरोबरच दररोज सकाळी एक व संध्याकाळी एक याप्रमाणे एकेका विभागाने महाआरतीचे आयोजन केले होते. 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' हा विषय गणेशोत्सवाला धरून महाआरतीच्या वेळी अभ्यासपर्वातील अभ्यासक गटाने विविध विषयांवर मांडणी केली.

या सर्व विषयांची संक्षिप्त स्वरूपातील मांडणी करण्यासाठी प्रदर्शनाचे आयोजन केले होते यात सर्व विषयांचे तक्ते मांडले होते.

बुद्धीच्या देवतेचा प्रसाद म्हणून नववी दहावीचे सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक, आणि परिसरातील नागरिकांसाठी व्याख्यानांचे आयोजनही केले होते. यात

१) भारताच्या कृषी क्षेत्रातील गत ७५ वर्षांचा लेखाजोखा - व्याख्याते मा. श्री. चंद्रशेखर भडसावळे, कृषिरत्न- महाराष्ट्र शासन.

२) भारताच्या जडणघडणीत सामाजिक संघटनांचे योगदान-व्याख्याते मा. श्री. सुभाषराव देशपांडे -कार्यवाह ज्ञान प्रबोधिनी

३) भारताच्या जडणघडणीतील विविध धोरणांचे योगदान व्याख्याते मा. श्री. अविनाशजी धर्माधिकारी

अशा व्याख्यानांचा समावेश होता.

अशाप्रकारे दिनांक ३१ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर दरम्यान झालेल्या गणेशोत्सवात शिक्षक पालक आणि विद्यार्थ्यांसाठी बौद्धिक, वैचारिक व अनेक कौशल्यपूर्ण विविध उपक्रम घेण्यात आले.

दिनांक ९ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या श्री गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये 'भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' हा विषय धरून भारत देशाच्या विविध संस्कृती परंपरांची ओळख शोभायात्रेच्या निमित्ताने करून देण्यात आली. यात देशातील विविध प्रांतांच्या वेशभूषा, नृत्यप्रकार सादर केले गेले, पालकच्या विविध वेशभूषा आणि बर्ची पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. चालू मिरवणुकीत सादर केलेली मल्लखांब प्रात्याक्षिके ही या मिरवणुकीची वैशिष्ट्ये ठरली.

## कै. अप्पांचा स्मृतीदिवस

यावर्षी कै. अप्पांचा स्मृती दिवस हा केंद्रातून एकत्रितपणे शुक्रवार दिनांक १९ ऑगस्ट २०२२ रोजी आयोजित केला होता. यात 'शैक्षणिक दृष्टीकोनातून उद्योग' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते.

व्याख्यानासाठी प्रबोधिनी परिवारातीलच शिरीषराव जोशी यांनी मार्गदर्शन केले. ''आपण करिअरचे क्षेत्र असे निवडले पाहिजे की ज्यामध्ये आपल्याला रुची आहे आणि त्यातून स्वतःलाही आनंद मिळतो आहे.

अशा क्षेत्रात आपण जास्त चांगल्या प्रकारे कार्य करू शकतो आणि स्वतःला वेळही देऊ शकतो. कुठलीही कला आपल्याला जगायला शिकवते, परंतु ती कळली पाहिजे.'' असे ते पुढे म्हणाले.

आपला कल कुठे आहे? हे जाणून घेऊन त्या क्षेत्रातील विविध प्रकारचे मार्ग पाहून त्याच क्षेत्रात करिअर, नोकरी किंवा व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला पाहिजे. असे शिरीषजी जोशी यांनी सांगितले.

## शारदीय नवरात्र

ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रात यावर्षी शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले त्यापैकी एक म्हणजे सरस्वती पूजन.

माननीय श्री देवळेकर सरांच्या कल्पनेतील शारदा पूजन अत्यंत अनोख्या पद्धतीने सोमवार दिनांक ३ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी दोन ते साडेतीन या वेळेत मनोहर सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण आणि चैतन्यदायी वातावरणात साकार झाले. साहित्य क्षेत्रात भरीव काम करीत असलेल्या, परिश्रमपूर्वक मिळवलेल्या ज्ञानाने विद्यार्थ्यांसाठी पर्यायाने समाजासाठी आवश्यक असलेल्या विवेकनिष्ठ विचारांची जोपासना करून आणि साहित्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष कृतीत उतरवणाऱ्या ज्ञानप्रबोधिनीच्या माजी विद्यार्थिनी डॉक्टर सौ प्रज्ञा कुलकर्णी, डॉक्टर सौ अनघा लवळेकर, डॉ. अंजली ओक, डॉ. मृणाल मायदेव आणि सौ वृंदा कुलकर्णी - देशपांडे या अभ्यागत म्हणून लाभल्या.

श्रीसूक्त आणि प्रस्तावनेनंतर पाचही अभ्यागतांनी सरस्वतीची पूजा व आरती केली. विद्यालयातील इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थिनींनी एकेक अभ्यागतांचे पाद्यपूजन केले. विद्यालयातील भाषा अभिरुचीच्या शिक्षिकांनी अभ्यागतांचे औक्षण करून साडी, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन यथोचित सत्कार केला. सर्व अभ्यागत ताई या सहृदय सत्काराने भारावून गेल्या होत्या.

डॉ. प्रज्ञा कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात रियाजाचे म्हणजेच सरावाचे महत्त्व स्पष्ट केले. सौ वृंदा कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात बालपणातल्या शाळेतील काही आठवणी सांगितल्या.

वाच. अनघा लवळेकर यांनी पाद्यपूजनामागील खरी संकल्पना स्पष्ट केली.

अशा प्रकारे तीनही अभ्यागतांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सरस्वती उपासनेचे अनुभव आपापल्या मनोगतातून व्यक्त केले. शारदा पूजनाच्या ह्या  अनोख्या उपक्रमाबद्दल सर्वांनीच कौतुक केले.

## धन्वंतरी याग सोहळा

रविवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२२ रोजी धनत्रयोदशीच्या शुभमुहूर्तावर विद्यालय निगडी केंद्र व आयुर्वेद व्यासपीठ (पिंपरी चिंचवड शाखा) यांच्या संयुक्त विद्यमाने श्री धन्वंतरी याग संपन्न झाला. समुद्रमंथनातून प्रकट झालेले रत्न म्हणजे भगवान श्री धन्वंतरींचे मा. सौ. व श्री. डॉ. पराग पाटील,  मा. श्री. व सौ. डॉ.

बागेश्री देवकर व मा. श्री. व सौ. वैद्य ज्योती मुंडर्गी यांच्या शुभहस्ते पूजन झाले. उपस्थित सर्वांनी भगवान श्रीधन्वंतरींच्या चरणी निरोगी दीर्घायुष्य प्राप्तीसाठी मनोभावे प्रार्थना केली.

यावेळी RCFC-WR (Regional Cum Facilitation Centre Western Region), National Medicinal Plant Board, Ministry of YUSH, Depatment of Botany Savitribai Phule Pune University यांच्या सहकार्याने औषधी वनस्पतींच्या प्रदर्शनीचेही आयोजन करण्यात आले. मा. श्री. डॉ. दिगंबर मोकाट (विभागीय संचालक व प्रमुख संशोधक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांनी  वनस्पती उपलब्ध करून देण्यास मोलाचे सहकार्य केले. वैद्य दीप्ती धर्माधिकारी, वैद्य नितीन देसाई, वैद्य गुरुप्रसाद कुलकर्णी प्रदर्शनीसाठी यांनी प्रदर्शनीसाठी औषधी वनस्पतीची उपलब्धी व मांडणीसाठी योगदान दिले. दीपावलीच्या निमित्ताने उपस्थित प्रत्येकाला वनस्पती भेट देण्यात आली व प्रत्येकाने किमान एका औषधी वनस्पतीचे स्वगृही संगोपन करण्याचा पर्यावरणपूरक संकल्प केला. या कार्यक्रमास आयुर्वेद व्यासपीठ पिंपरी चिंचवड कार्यकारिणीचे सन्माननीय सदस्य वैद्य दीप्ती धर्माधिकारी, वैद्य संगीता रानडे, वैद्य सायली पेंडसे, वैद्य योगेश जोशी, वैद्य शिल्पा स्वार, वैद्य लता पुणे, वैद्य नीलेश शिर्के उपस्थित होते.  तसेच ज्ञान प्रबोधिनीचे केंद्रप्रमुख मा. श्री मनोज देवळेकर, मा. श्री यशवंतराव लिमये, ज्ञान प्रबोधिनी पालक महासंघातील वैद्य पालकही उपस्थित होते.

## प्रतिज्ञाग्रहण

सौर अग्रहायण १, शके १९४४ म्हणजेच २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी केंद्रामध्ये प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम झाला. यामध्ये ९वी आणि १० वीच्या सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी शालेय प्रतिज्ञा घेतली तर प्रौढ सदस्यांपैकी ९ जणींनी प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा तर दोन जणींनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

प्रतिज्ञाग्रहणाचा अर्थ उलगडत नेणारे 'शुभ्र सुगंधित पुष्पे..'हे पद्य सादर केल्यानंतर सर्व विद्यार्थी व सदस्य यांचे उतारावाचन झाले. विद्यार्थिनींपैकी तनिष्का सूर्यवंशी तर प्रौढ सदस्यांपैकी ऋतुजाताई जोगळेकर यांनी प्रतिज्ञा घेतल्यावरचे त्यांचे अनुभव सांगितले. प्रतिज्ञेमुळे ते एखादी गोष्ट समोरच्याच्या दृष्टिकोनातून बघण्यात आपण कशा समृद्ध होत गेलो याचा अनुभव ऋतुजाताईंनी सांगितला.

कार्यक्रमाच्या शेवटी मा. संचालकांनी सर्वांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की ''देशासाठी काम करायचे तर त्यासाठी अगोदर देशामध्ये झालेली प्रगती आपण जाणून घेतली पाहिजे.'' आणि त्यानंतर हळूहळू देशातील प्रश्न समजून घेऊन सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

''मातृभूमीसाठी जगणे आणि वेळप्रसंगी मातृभूमीसाठी प्राण देणे असा काहीजण या प्रतिज्ञेद्वारे निश्चय करतात. प्रत्येक व्यक्तीला प्रतिज्ञा कशा प्रकारे उमगली आहे त्याने त्या प्रमाणे वागायला सुरुवात केली पाहिजे. आणि त्या विचारानुसार त्यावर काम करायला पाहिजे.'' असेही त्यांनी सांगितले.

या  मार्गदर्शनानंतर उपासनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## सामुदायिक संपूर्ण गीता पठण

रविवार दिनांक ४ डिसेंबर २०२२ रोजी मातृमंदिरात सामुदायिक संपूर्ण गीता पठणाचा कार्यक्रम संपन्न झाला. आ. भाऊंच्या अमृत महोत्सवापासून त्यांच्याच प्रेरणने सुरू असलेल्या या कार्यक्रमाचे हे सातवे वर्ष. परिसरातील, विद्यालयातील अशा एकूण १५० जणांच्या सहभागाने व पठणाने वातावरण पवित्र झाले. मातृमंदिरात अत्यंत भावपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम झाला. निगडी केंद्राचे प्रमुख माननीय श्री देवळेकर सर व सौ. शिल्पाताई केळकर यांच्या हस्ते श्रीकृष्णाचे व भगवद्‌गीता, गीताई, श्री ज्ञानेश्वरी, गीता रहस्य, शंकर भाष्य अशा पवित्र ग्रंथांच्या तसेच आदरणीय भाऊ व माईंच्या प्रतिमेचे पूजन झाले. कै. भाऊ आणि कै. माई दोघांचीही प्रकर्षाने आठवण झाली. त्यांचे आशीर्वाद घेऊन त्यानंतर पठणास सुरूवात झाली. सौ. प्रतिभाताई दलाल व सौ. जोशी काकू, सौ. शिल्पाताई केळकर या मुख्य वाचक म्हणून उपस्थित होत्या. पूर्ण गीता मुखोद्‌गत असणाऱ्या एका विद्यार्थ्याचाही यात समावेश होता. पठण पूर्ण झाल्यानंतर छोटासा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम झाला. गुरुवर्य वामनराव अभ्यंकर स्मृती सेवा फाऊंडेशन यांच्या वतीने सौ. शिल्पाताई केळकर यांना कै. इंदिरा अभ्यंकर म्हणजे माईंच्या स्मरणार्थ इंदिरा गीता पुरस्कार श्रीमती भारती कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात आला. योगिनी ताईंनी मानपत्राचे वाचन केले. श्रीकृष्ण दादाने याविषयीची छोटीशी प्रस्तावनाही केली.

त्यानंतर मा. सौ. शिल्पाताई यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये त्यांनी सर्वांचे आभार मानले. गीता सर्वांनी शिकली पाहिजे त्याप्रमाणे त्याचे आचरण केले पाहिजे. प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्याला गीता म्हणता यावी यासाठी सर्वांनी प्रयत्न करू या असे विचार त्यांनी मांडले. मा. लिमयेकाका यांनी देखील आपल्या मनोगतात गीता समजून घेण्यामध्ये धन्यता आहे असे उद्‌गार काढले.

आदरणीय मनोजराव देवळेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. मुलांसाठी गीतेतील सहावा अध्याय कसा महत्त्वाचा आहे? आत्मसंयम योगाचा हा सहावा अध्याय मुलांनी जरूर पाठ करावा असेही सरांनी सांगितले. तसेच परिसरातील इतर शाळा व सर्वांपर्यंत गीतेचे ज्ञान व पठणाचे महत्त्व पोहचवावे असेही सरांनी सांगितले. उपस्थित सर्वांनी पुष्प अर्पण केले. अशा प्रकारे संपूर्ण गीता पठणाचा कार्यक्रम अतिशय प्रसन्न वातावरणात संपन्न झाला.

## प्रजासत्ताक दिवस

यावर्षी प्रजासत्ताक दिनाला इयत्ता सहावीच्या आदिनाथ तारकुंडे या विद्यार्थ्याला ध्वजारोहणाचा मान मिळाला. तो शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेत प्रथम आला. याच बरोबर प्रमुख अभ्यागत म्हणून विद्यालयाची माजी विद्यार्थिनी आणि सध्या पूर्व माध्यमिक विभागात कार्यरत असलेल्या सौ. स्मिताताई माने उपस्थित होत्या. अभ्यासपर्वात केलेल्या न्याय विषयक अभ्यासाची अतिशय उत्तम मांडणी त्यांनी यावेळी केली. याप्रसंगी राज्य आणि राष्ट्रीय स्तरांवर पारितोषिके मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

## आचार्यव्रत

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच यावर्षी आचार्यव्रताच्या पूर्व तयारीचे संदर्भात उपक्रम सुरु झाले होते. प्रथमतः आचार्यव्रत स्वीकारू इच्छिणाऱ्या सदस्यांशी संवाद झाल्यावर काही अभ्यास आणि नंतर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरातील व्याख्यानांच्या आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून अध्यापक ते आचार्य हा प्रवास समजून घेतला. दिलेला अभ्यास पूर्ण करून आणि उपासनेतून आचार्यव्रतासाठी पूर्व तयारी होत होती.

दि. १८ मार्च २०२३ म्हणजेच भारतीय सौर २७ फाल्गुन, शके १९४४ रोजी मातृमंदिरात आचार्यव्रत उपासना झाली. यावेळी निगडी केंद्रातील नऊ सदस्यांनी मा. संचालकांकडून आचार्यव्रताची दीक्षा घेतली.

मा. प्रशांत दिवेकर यांनी प्रास्ताविकात आचार्यव्रत पोथीतील श्लोकांचा अर्थ व त्यामागची भूमिका उलगडून दाखवली. मा. संचालकांनी आपल्या मार्गदर्शनात आचार्यव्रताची संकल्पना नेमकी स्पष्ट करून व्रतार्थींना शुभेच्छा दिल्या. यावेळी निगडी केंद्रातील सदस्य, माजी अध्यापक व व्रतार्थींचे नातेवाईक उपस्थित होते.

## निगडी केंद्र वर्षांत उपासना

२२ चैत्र, शके १९४५ (१२ एप्रिल, २०२३) रोजी निगडी केंद्रात वर्षान्त उपासना झाली. उपासनेनंतर सभेच्या कार्यक्रमात सर्व विभागांची मिळून आठ प्रातिनिधिक निवेदने झाली. यावेळी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण विभागाचे सह-संचालक श्री. हरून अत्तार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

सौर चैत्र २४, १९४५ म्हणजे १४ एप्रिल, २०२३ रोजी ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्रात मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित उपासनेला सोलापूर आणि निगडीचे मिळून सुमारे ५० कार्यकर्ते उपस्थित होते. उपासनेनंतर कल्पेशदादा कोठाळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची आणि विचारांची थोडक्यात ओळख सर्वांना करून दिली. बाबासाहेब आंबेडकरांनी इथल्या वंचित गटांचा विचार करत असतानाच एकूण भारताच्या ऐक्याचा, समग्र विचार कसा केला याबद्दल दादाने मांडणी केली. केंद्रप्रमुख श्री. मनोजराव देवळेकर यांनी. समारोपीय मार्गदर्शनात ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी समग्रतेचा विचार कसा केला पाहिजे व आपल्या कृतीत कसा उतरवता येईल याबद्दल मांडणी केली.

***

# आचार्यव्रत

२०२२- २०२३ मध्ये आचार्य व्रत या व्रतासाठी शिबिर आणि संस्कार असे असणार आहे अशी संकल्पना समजली. सर्व प्रबोधिनीमधून निवडक काही जणांसाठी आणि तेही अध्यापकांसाठी हे असेल असेच कळले होते. पण मग वाटले की हरकत नाहीये आपण हे व्रत समजून घेणे. मा. मनोजरावांना, प्रशांत सरांना पण सांगितले आणि निवेदनाच्या वेळी संचालकांना पण सांगितले की माझी इच्छा आहे.

शिबिराच्या अगदी काही दिवस आधी मला प्रशांत सरांचा निरोप आला की ते मला गटात घेत आहेत. छान वाटले होते खूपच. काय कारणाने संचालकांनी मला होकार दिला याची मला फार कल्पना नव्हती, पण मी ठरवलेली माझी उद्दिष्टे माझ्यासाठी पुरे होती. माझ्यासोबत शिबिरात माझ्या महितीतले होते अनेक जण पण सगळे अध्यापक होते. मी एकटीच अध्यापन तर करत नव्हते पण तरी त्या गटामध्ये होते.

Whatsapp गट झाल्यावर शिबिराला जाण्यापूर्वी काही कृती उपक्रम सर्वांनी पूर्ण करायचे होते, त्याचे लिखाण किंवा ध्वनिचित्रफीत करायची होती. त्या अभ्यासाला सुरुवात केली. मा. संचालकांनी कथाकथन करायला हवं असं पूर्वीच सुचवले होत. पण त्यावेळी मी  फार मनावर नाही घेतले, मात्र यावेळी या अभ्यासाच्या निमित्ताने चरित्रकथनाचा प्रयत्न केला आणि त्याबरोबर इतर अनेक task होते. बैठका होत होत्या. आचार्य व्रत घेण्यापूर्वी 'वरिष्ठांनी सांगितलेली कृती कोणतेही आढेवेढे न घेता करायला हवेत. आपल्यासाठी त्यांनी चांगलाच विचार केला आहे हे लक्षात घेऊन शिकायला हवे असे जाणवले. आणि आचार्यव्रत अजून एक टप्पा कळला असे वाटले.

एकीकडे दिलेला अभ्यास आणि शिबिराची तयारी सुरू असताना मी का बरे आहे या गटामध्ये?? असे मला सारखे प्रश्न पडत होते कारण विषय अध्यापन पद्धतीचे होते. सर्व गट अध्यापकांचा होता.

प्रत्यक्ष शिबिर हे मे मध्ये २८ मे ते ३१ मे २०२२ असे होते. शिबिरात जोनाथनची गोष्ट वाचन आणि चर्चा चालू होती. संपूर्ण शिबिरात ते मला खूप भावले आणि लक्षात पण राहिले. बाकी सत्र पण मस्तच झाली पण यासाठी मी या शिबिरात आहे किंवा आचार्यव्रत संस्कार घेऊ शकते असे जाणवायला जोनाथनची गोष्ट कारणीभूत ठरली.

यापूर्वी वाचलेली होती, ऐकलेली होती पण त्या शिबिरात ती नव्याने कळली. त्या जोनाथनसारखी निश्चय करून कामे करायची आणि वेळ येईल तेव्हा सोबतच्यांना आपल्या सोबत, आपल्या पुढे घेऊन जायचे हे जाणवले, आणि मानसतज्ज्ञ म्हणून किंवा समुपदेशक म्हणून आपल्याला आयुष्यभर असेच वागायचे आहे

हे पक्के झाले. अध्यापकांना त्यासाठी लागणारी तंत्र वेगळी आहेत आणि समुपदेशकाला लागणारी वेगळी आहेत. शिबिरात अध्यापकांची शिकवली, समजावली गेली आपल्याला आपली शोधायची आणि शिकायची आहेत असे माझे मलाच उत्तर मी असण्याचे मिळाले.

शिबिर झाल्यावर खरा प्रवास सुरु झाला. संस्कार अजून व्हायचा होता त्यामुळे समजून घेतलेले मुरवायला वेळ होता. जोनाथन डोळ्यासमोर ठेवून कामाला सुरुवात केली आणि आचार्यव्रत मिळावे म्हणून पत्र दिले. आणि मग शिबिर ते संस्कार हा एक वेगळा प्रवास झाला. आता संस्कार झाल्यापासून एक नवीन प्रवास सुरु झालेला आहे.

मानसतज्ज्ञ – समुपदेशक म्हणून कायमच मी प्रामाणिक आणि अभ्यासू, चिंतक व्यक्ती असण्याचे मी ठरवले आणि तसे वागण्यात आणण्याचा पूर्ण प्रयत्न करत आहे.

**सौ. अस्मिता इनामदार – बारसावडे**
संवेद विभाग प्रमुख

## चित्रकला अभिरुची

सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना जमेल, रुचेल अशा नवनवीन गोष्टींना अनुसरूनच चित्र काढण्यास द्यायचे असे मनात पक्के ठरवले आणि वर्ष सुरू झाले. प्रतिसादही तसाच मिळाला. आधी थोडा विचार केला की काय काढण्यास दिले म्हणजे मुलांचा उत्साह टिकून राहील. यादी केली तर चित्रकलेतील चाळीस ते पन्नास विषय सापडले. पण एवढे सगळ एकदम घेण्यापेक्षा थोडेच घ्यायचे पण चांगले शिकवायचे हा विचार करून आम्ही विषय निवडले. कोणतेही चित्र शिकवताना आदर्श कृती करून दाखवायची, घेतलेल्या विषयाचे खूप दर्शन द्यायचे, त्याची मुलभूत माहिती द्यायची हे ठरलेले होतेच. चित्र काढत असताना विद्यार्थ्यांनी लक्षपूर्वक चित्र समजून घ्यावे. चित्र काढण्याचा आनंद घ्यावा, त्यांची कल्पकता त्यात दिसावी हा आमचा अट्टाहास होता. मुलांना कधी कधी वेळ अपुरा पडला तर विद्यार्थी अन्य वेळेत येऊन पूर्ण करायचे. मुले सुंदर चित्रे काढायची अर्थातच एक-दोन मुले त्याला अपवादही होती. पण तरीही आम्ही प्रयत्न करत होतोच. आम्ही संकल्प हाच केला होता की केवळ युट्युबवरचे मुलांना न दाखवता आम्हाला जितके शक्य होईल तितके आम्ही त्यांना प्रत्यक्ष करून दाखवू आणि त्याप्रमाणे त्यांना खूपशा गोष्टी आम्ही दाखवल्या, शिकवल्या, सांगितल्या. दरवर्षी प्रमाणे आम्ही चारही शिक्षक आमच्या या अभिरुचीने जोडलेलो असल्याने गटबांधणी छान होतीच व त्यामुळे समाधानकारक काम आम्ही करू शकलो.

**अध्यापिका – सौ .श्रद्धा कुलकर्णी**

संघटन विभाग

# युवक विभाग

**मार्गदर्शक दल –** युवक विभागामध्ये वर्षभर जबाबदारी घेतलेल्या युवकांचे मार्गदर्शक दल पाक्षिक पद्धतीने होत असते. या दलाचे स्वरुप हे १ तास प्रत्यक्ष मैदानावर दल होत होते. नंतरचा एक तास बैठक व्हायची. या बैठकांमध्ये मुख्यतः शालेय व महाविद्यालयीन गटाच्या चालू कामाबद्दल चर्चा, निवेदन झाले. तसेच प्रबोधिनीच्या साहित्याचे वाचन नियमित पण झाले. वर्षभर अपेक्षित ३३ नियुक्त सदस्यांपैकी १८ सदस्य उपस्थिती नियमित होती. वर्षभर एकूण २० दले झाली. वेदांत कट्टी व अनुज देशपांडे यांनी वर्षभर मार्गदर्शक दलाची जबाबदारी घेतली होती.

**गणेशोत्सव –** दोन वर्षांच्या खंडानंतर यंदाच्या वर्षी गणेशोत्सव युवक विभागात मोठ्या स्तरावर आयोजित केला गेला. निगडी व चिंचवड ताफा याच रचनेतून गटाचे काम दीड महिने चालू होते.

**यंदाच्या गणेशोत्सवाची ठळक वैशिष्ट्ये:**

एकूण १७५ युवकांनी यंदाच्या गणेशोत्सवात सहभाग नोंदवला होता. त्यातील २४ जणांनी विविध जबाबदाऱ्या घेतल्या होत्या. नियमित सरावासोबत नव्याने गटात सहभागी झालेल्या युवकांसाठी प्रबोधिनी परिचयाची सत्र आयोजित करण्यात आली होती. ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पा पेंडसे यांची जयंती दोन्ही ताफ्यांवर साजरी करण्यात आली. यावेळी दोन्ही ताफ्यांवर आ. आप्पांचे संक्षिप्त चरित्र, बर्ची पथक उभी करण्यामागची योजना त्यातून साधलेला परिणाम याबद्दलचे प्रासंगिक झाले.

ऐच्छिक बर्चीमध्ये विद्यालयातील ८० विद्यार्थी सहभागी झाले होते, तर गुरुकुलाच्या इयत्ता ८ वी ते १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी यात उस्फुर्त सहभाग नोंदवला.

मुख्य उत्सवामध्ये एकूण ६ मिरवणुका व ६ प्रात्याक्षिके युवकांनी पिंपरी चिंचवड व पुण्याच्या विविध परिसरात केली.

श्री. गणपतीच्या आरतीच्या दिवशी चैतन्य नातू या युवकाने तो सध्या ताशा या तालवाद्यावर स्पेन येथे करत असलेल्या संशोधनाची माहिती आरतीच्या निमित्ताने उपस्थित सर्व युवकाना सांगितली. आरतीसाठी एकूण १०० युवक उपस्थित होते.

**विस्तार शिबिरे**

१७-१९ एप्रिल, मागझन अमडस पोफळी चिपळूण, १६ युवक सहभागी

ज्ञान प्रबोधिनी चिपळून केंद्रातर्फे झालेल्या नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे १७ ते १९ एप्रिल २०२३ या कालावधीत पार पडली. सदर शिबिरे घेण्यासाठी युवक विभागातून १६ युवक सहभागी झाले होते. शिबिरे आंबडस, माखजन, चिपळूण, पोफळी येथील शाळांमध्ये पार पडली. ह्या शिबिरांमध्ये जवळ जवळ २५० विद्यार्थी सहभागी झाले होते. आंबडस, माखजन येथे शिबिराचा पहिलाच अनुभव होता. सर्व ठिकाणी उत्तम प्रतिसादांनी शिबिरे पार पडली. शिबिरांमध्ये नियोजन, गट बांधणी ह्या कौशल्याधारित सत्र झाली. कोंडाजी फर्जंद व वासुदेव बळवंत फडके ह्यांची चरित्र कथने, मानवी मनोरे, पोस्टर तयार करणे, पाककला अशी कृतीसत्रे झाली. शिबीर प्रमुख म्हणून अनुज देशपांडे ह्याने काम केले.

***

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता आठवीमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे.**

| विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण % | विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण % |
|---|---|---|---|
| चि. प्रद्युम्न चंद्रकांत शिंदे | ८४.६६% | चि. सारंग मायदेव | ७१.८२% |
| कु. अनन्या संदेश माजगावकर | ८०.६६% | कु. श्रेया विशाल ताठे | ७१.३३% |
| चि. अवधूत गणेश भागानगरे | ७८.६६% | कु. शर्वरी सचिन गुर्जर | ७१.३३% |
| चि. अन्वय देव | ७८.५२% | कु.आर्या केसकर | ७१.१४% |
| चि. जय थोरात | ७७.६५% | चि. श्रेयस गिरीश कुलकर्णी | ७०.६६% |
| चि. नचिकेत सुमीत पंडित | ७६.६६% | चि. उपेंद्र पित्रे | ६८.४६ % |
| कु. सई तळेगावकर | ७५.८३ % | कु. इती चेट्टी | ६७.७८ % |
| चि. चैतन्य दामोदर दिक्षित | ७२.६६% | कु. जुई देशमुख | ६७.११ % |
| कु.आदिती दिलीप परळे | ७२.००% | | |

# युवती विभाग

२०२२-२३ यावर्षी युवती विभागातर्फे काही नियमित दले आणि काही प्रासंगिक उपक्रम घेण्यात आले. दलांमधून प्रामुख्याने युवतींचे नेतृत्त्व गुण वाढीस लागणे तसेच त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होऊन त्यांच्यात सामाजिक जाणीव वाढणे ही महत्त्वाची उद्दिष्टे होती. युवती विभागाच्या भवितव्य लेखात प्रामुख्याने युवतींमधील नेतृत्त्व गुण वाढवणे, सामाजिक जाणीव वाढवणे, युवती विभागाची रचना स्थिर करणे आणि अन्य शाळा महाविद्यालयातील युवतींशी संपर्क अशा प्रकारची उद्दिष्टे मांडली आहेत. त्यापैकी पहिल्या तीन उद्दिष्टांवर या वर्षी जाणीव पूर्वक काम केले गेले.

**प्रतिज्ञाग्रहण** – सौर श्रावण २९, शके १९४४ अर्थात २० ऑगस्ट २०२२, शनिवार रोजी निगडी केंद्रात युवतींच्या प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम झाला. युवती विभागातील ६ सदस्यांनी पहिली प्रतिज्ञा घेतली.

आदरणीय संचालकांनी नवीन प्रतिज्ञित सदस्य आणि उपस्थितांना मार्गदर्शन करताना गटात काम करत असताना गटातील व्यक्तींना त्यांच्या गुणदोषांसकट ते आपले आहेत म्हणून स्वीकारायला पाहिजे आणि त्याआधी स्वतःला जसे आहे तसे स्वीकारायला पाहिजे असे सांगितले. लष्करातील उदाहरण देऊन देशासाठी आवश्यक असेल ते सगळं करण्याचा प्रयत्न करा असे म्हणत त्यांनी नवीन प्रतिज्ञित सदस्यांना शुभेच्छा दिल्या. संपूर्ण उपासनेने कार्यक्रमाची सांगता झाली. पुणे, हराळी तसेच अन्य केंद्रावरील युवती देखील कार्यक्रमात सहभागी होत्या.

खालील युवतींनी प्रतिज्ञा घेतली –

१.वेदश्री काळे, २.सृष्टी सापटणेकर, ३.सायली पतकी, ४.मीनल गजेंद्रगडकर, ५.देविका उपाध्ये, ६.अबोली भंडारी

यंदाच्या वर्षी युवती विभागात प्रासंगिक उपक्रमांमध्ये यावर्षी गणेशोत्सव आणि दीपोत्सव हे दोन मोठे उपक्रम झाले.

## विभागाचे वर्षभराचे उपक्रम

गणेशोत्सवाच्या निमित्ताने १२५ महाविद्यालयीन युवतींशी संपर्क झाला. ९५ युवती ध्वज-बरची-वाद्य गटात सहभागी होत्या. ऐच्छिक बरची मध्ये ६५ शालेय विद्यार्थिनी व या व्यतिरिक्त १२० दहावीच्या मुली सहभागी

होत्या. २५ युवतींनी जबाबदारी घेऊन काम केले त्यापैकी १२ युवतींनी नव्याने पहिल्यांदा जबाबदारी घेतली होती. १६ युवतींनी स्वतःच्या घराव्यतिरिक्त मंडळ व घरांमध्ये प्राणप्रतिष्ठा केली.

**दीपोत्सव –** दीपोत्सवामध्ये ६२ युवती सहभागी झाल्या. त्या निमित्ताने युवतींच्या कला-गुण दर्शनाचा कार्यक्रम झाला. ४०-४२ युवतींनी नृत्य, नाट्य, अभिनय, कविता अशा वेगवेगळ्या कलांचे सादरीकरण केले.

याशिवाय नियमित दलांमध्ये इयत्ता ७ वी साठी असीमा विज्ञान दल, इयत्ता ८वी साठी येसूबाई दल तर चिंबळी गावातून आलेल्या आणि आपल्या शाळेत शिकत असलेल्या मुलींसाठी प्रेरणा दल अशी ३ शालेय युवतींसाठीची दले झाली तर महाविद्यालयीन युवतींसाठी 'अरुणिमा दल' होत होते. प्रेरणा दल साप्ताहिक तर बाकी सर्व पाक्षिक वारंवारतेने जमत होते. सर्व दलांवर २० ते २५ युवती जमत होत्या.

**शालेय दले**

१. प्रेरणा दल - इयत्ता - ८वी ते १२वी. - वर्षभरात ११ वेळा दल झाले.

**विशेष नोंद–** ह्या वर्षी मुलींचे सामान्य ज्ञान वाढवण्यावर भर देण्यात आली. त्या साठी वर्षभर प्रत्येक दलामध्ये वर्तमानपत्र वाचन तसेच त्यावर चर्चा देखील घेतली. त्याच बरोबर सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा, वेगवेगळे खेळ सुद्धा घेतले. महायुद्ध १ व २, कारगिल युद्ध ह्या ऐतिहासिक विषयांवर अभ्यास मांडणी देखील घेतली.

२. असीमा विज्ञान दल - इयत्ता- ७वी अ, ब, क, एच् - वर्षभरात ८ वेळा दल घेण्यात आलं.

३. येसूबाई दल - इयत्ता : ८ वी मुली - वर्षभरात ८ वेळा दल घेण्यात आले.

**विशेष नोंद :** वर्तमान पत्रात असलेल्या समस्यांवर चर्चा घेतल्या व आपण काय करू शकू हे बोललो. मुलींचे अनेक कृतीसत्रे घेतले. मुलींचा खेळातला उत्साह पाहून क्रीडा दलेही घेतली. पद्य अर्थासहित शिकविण्यात आले. इतिहासाविषयी गट चर्चा घेतली गेली. वाद - विवादातून मत मांडणी घेतली.

महाविद्यालयीन दल - अरुणिमा दल

**विशेष नोंद :** नवीन युवतींचा सहभाग वाढला. यांदाच्या वर्षी शाळेच्या युवती सोबत बाहेरील युवतींचाही सहभाग होता. क्रीडादल आणि गिर्यारोहणातून शारीरिक क्षमता वाढवण्याचा प्रमुख हेतू होता. बाहेरील युवतींना 'प्रबोधिनीची' थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न केला.

***

# पालक महासंघ

**निर्मिती कौशल्य तासिका**

कोणतीही गोष्ट स्वतः करून बघायला, त्यातून पडत, धडपडत सरावाने त्यात प्राविण्य मिळवायला आपल्या सर्वांनाच मनापासून आवडते. अर्थात मुलंही याला अपवाद नाहीत. निर्मितीची प्रक्रिया समजावून घेऊन नवनिर्मितीचा आनंद घेणं हे त्यांचं आवडतं काम!

विद्यालयात २०२२-२३ मध्ये आठवीच्या मुलांसाठी पालक संघातर्फे निर्मिती कौशल्य हा उपक्रम राबवला गेला.

यामध्ये माती, वर्तमानपत्र, लोकर, कापड, बांबू या वेगवेगळ्या घटकांपासून विविध वस्तूंची निर्मिती शिकवली गेली. या सगळया प्रक्रियेत वजन कसे करावे? मापे कशी घ्यावीत ? वेगवेगळ्या गोष्टी कशा हाताळायच्या ? सर्वांनी गटाने एखादे काम कसे पूर्ण करायचे ? त्यासाठी पूर्वतयारी कशी करायची ? अशा अनेक गोष्टी या तासांना मुलांना शिकवल्या गेल्या.

बीजारोपण, कागदी फुले, बांबूच्या राख्या, लोकरीच्या फुलांच्या माळा, तिळगुळाच्या वड्या, बांबूची भेटकार्ड, जुन्या कपड्यांपासून पायापुसणी इत्यादी कौशल्ये यात प्रशिक्षकांनी मुलांना शिकवली. काहीतरी वेगळं शिकायला मिळतं आहे या जाणिवेतून मुलांनी अतिशय आनंदाने आणि उत्साहाने या गोष्टी शिकण्याचा प्रयत्न केला.

निर्मिती कौशल्य गटात जवळपास पंधरा एक महिला पालक सहभागी आहेत. संक्रांतीच्या सुमारास मुलांनी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर तिळगुळाच्या वड्यांची निर्मिती केली ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे.

अशा रीतीने पालक संघाकडून नेहमीच मुलांसाठी अतिशय कृतिशील उपक्रम राबवण्याचा प्रयत्न सुरु आहे.

**बर्ची पथक**

मागच्यावर्षी (२०२२) गणपती विसर्जन मिरवणुकीत महिला बर्ची पथकासाठी नाव दिले. सकाळी ७/७:३० वाजता मनोहरच्या गच्चीवर एकत्र यायला लागलो. पहिल्याच दिवशी अनघाताईंनी प्रबोधिनीच्या शिस्तीत गोष्टी घ्यायला सुरूवात केली.

युवती विभागातून दोन ताई आम्हाला शिकवायला येत होत्या. नवीन महिला पालकांना क, ख, ग, घ पासून शिकवायचे काम दोन्ही ताई आणि आधीपासून बर्ची करणाऱ्या पालक यांनी अतिशय उत्तम पद्धतीने केले.

दुसऱ्या/तिसऱ्या दिवशी अनघाताईंनी पूर्ण गटाला Big Picture दिले. काय (एकूण ५ हात, २ formations), कधी (कधीपर्यंत हात शिकून व्हायला हवेत, परीक्षण कधी होणार, actual ढोलताशावर सराव कधी करायचा), कसं (learning process) हे सांगितल्यामुळे पूर्ण गटालाच एक confidence आला होता. गरज पडेल तेव्हा रागावून, कधी शांतपणे तिन्ही तायांनी आमच्याकडून बर्चीचे ५ हात आणि formations बसवून घेतले.

बर्चीसाठीचा उत्साह आणि अनघाताईंनी काहीच दिवसात आमच्यात भिनवलेली शिस्त याची झलक प्रत्यक्ष road वरच्या सरावाच्या दिवशी पाऊस कोसळला तेव्हा बघायला मिळाली. Actual मिरवणूकीपेक्षा हा दिवस माझ्यासाठी नक्कीच जास्ती लक्षात राहील.

यानिमित्ताने काही नवीन मैत्रिणी मिळाल्या आणि खूप दिवसांनी परत एकदा एकत्र येऊन काहीतरी छान करण्याचा अनुभव घेतला.

***

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२२-२३ इयत्ता पाचवीमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे.**

| विद्यार्थ्यांचे नाव | एकूण गुण % | जिल्ह्यातील प्राप्त क्र. | एकूण गुण % |
|---|---|---|---|
| कु. आर्या भोज | ८६.६६% | चि. वसिष्ठ विठ्ठल पाटील | ७८.००% |
| कु. चंद्रमा टिळेकर | ८५.३३% | चि. स्वराज किरण कळेल | ७४.६६ % |
| चि. ओम चंद्रशेखर कळके | ८३.३३% | कु. देवयानी पृथ्वीराज भोसले. | ७४.६६% |
| कु. सुरभी भगवंत चेचे | ८३.३३% | कु. सई विशाल दिवाळकर | ७४.००% |
| चि. साकेत भाटे | ८३.३३ % | चि. मेय्यन कौशिक शितोळे | ७२.६६% |
| चि. अर्णव विवेक कुलकर्णी | ८०.६६% | चि. शौनक धोतारकर | ७२.६६% |
| चि. श्रीहरी रामकृष्ण घुले | ८०.००% | चि. आयुष हेमचंद्र मोरे | ७२.०० % |
| कु. अर्चिता दीपक अटकर | ७८.६६ % | | |

# स्नातक संघ आणि मेडिकल SPG

**व्याख्यानमाला –** यावर्षी स्नातक संघातील वैद्य गटाने पुढील व्याख्याने व मार्गदर्शन उपक्रम घेतले.

डॉ बागेश्री देवकर यांनी १६ सप्टेंबर २०२२ रोजी दहावी इंग्रजी माध्यमाच्या मुलींसाठी Reproductive System वर lecture घेतले. त्या अनुषंगाने मासिक पाळीच्यावेळी घेतली जाणारी स्वच्छता आणि काळजी तसेच कुटुंब नियोजन या संदर्भातही माहिती दिली.

दिनांक २० सप्टेंबर २०२२ रोजी मेन्स्ट्रुअल हायजिन या विषयावर मोशी येथील साधू वसवानी इंटरनॅशनल स्कूल मधील इयत्ता सहवी आणि सातवीच्या मुलींना मार्गदर्शन केले. एकूण ६० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजी किशोर दिनाच्या निमीत्त डॉ. बागेश्री देवकर आणि डॉ. शुभांगी बहिरट यांनी ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय निगडी मधील इयत्ता सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना, Say no to Juncs and Yes to exercise या विषयावर मार्गदर्शन केले. एकूण ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

दिनांक ११ व १२ फेब्रु २०२३ रोजी Sports Ayurved– या विषयावरील परिषदेत स्नातक संघाचा सक्रीय सहभाग होता. डॉ. सौरभ देशमुख व डॉ बागेश्री देवकर यांनी परिषदेआधी ३ महिने चालू असलेल्या बैठकींना उपस्थिती लावली तर डॉ अमरीश देडगे, डॉ मयूरा जाधव, डॉ अस्मिता इटकरकर, डॉ शर्वरी इनाम दार, डॉ तेजस लिमये, डॉ शुभांगी बहिरट, डॉ राजीव नगरकर व ॲड. प्रतिभा दलाल यांनी जबाबदारीपूर्वक परिषदेचे काम केले.

दिनांक १८ मार्च २०२३ रोजी महिलांचे आरोग्य व पाळीच्या समस्या, या विषयावर डॉ. सोनल बोंद्रे यांनी व्याख्यान दिले. स्नातक संघ, मेडिकल गट व पालक महासंघ, सखी गट यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सलग तिसऱ्या वर्षी प्रामुख्याने केंद्रातील सर्व अध्यापिका, सेविका, पालिका, परिसरातील महिला यांच्यासाठी हा आरोग्यपूर्ण उपक्रम आयोजित केला. साधारण २०० महिलांनी ह्या सत्रास उपस्थित राहून मोकळेपणाने प्रश्न विचारले.

**स्नातक संघ मेळावा**

दिनांक– २२–२३ एप्रिल, २०२३ रोजी स्नातक संघाच्या सदस्यांचा मेळावा आयोजित केला होता. यात १९८५ ते २०१५ या वर्षांतील एकूण ४८ जण सहभागी झाले होते.

शनिवारी (२२ तारीख) संध्या. ७:०० ते रविवारी (२३ तारीख) स. ८:०० वाजेपर्यंत विविध कार्यक्रम झाले. कार्यक्रमाचे वेळापत्रक प्रामुख्याने गीत रामायण, विविध खेळ, नवीन क्रीडादालनात खेळांचा अनुभव, अशया उपक्रमांचे आयोजन केले होते. त्यानंतर केंद्रप्रमुख आ. देवळेकर सरांनी सर्वांना मार्गदर्शन केले आणि त्यानंतर  सर्व स्नातकांनी आपापले अनुभव मांडले व त्यावर गप्पा झाल्या.

यामधूनच नवीन वर्षासाठी स्नातक संघ समितीची स्थापना करण्याचे ठरले. त्याप्रमाणे नवीन समितीची नियुक्तीही करण्यात आली आहे.

***

## पत्रलेखन स्पर्धेतील यश प्राप्त विद्यार्थ्याचे पत्र

पुरुषोत्तम मकरंद इनामदार
दिनांक – १६ फेब्रुवारी २०२३
पत्ता – मनोमय रेसिडेन्सी निगडी, पुणे.

आदरणीय,
स्वातंत्र्यवीर सावरकर
शि. सा. न. वि. वि.

''शब्द सारथी'' या स्पर्धेअंतर्गत पत्रलेखन स्पर्धेसाठी 'कोणाला पत्र लिहावे?' असा विचार मी करत असताना आपले नाव माझ्या डोळ्यासमोर आले, आणि म्हणूनच मी आपल्याला हे पत्र लिहीत आहे. आपली ओळख मला माझ्या दादा कडून झाली. दादाने आपली अनेक पुस्तके वाचली आहेत. त्याच्या बोलण्यातून आपल्याबद्दलच्या अनेक रोमांचकारी कथा मी ऐकल्या, तेव्हापासून आपल्याबद्दलचा आदर माझ्या मनात वृद्धिंगत झाला. आपल्याबद्दल जाणून घेण्याची ओढ लागली. आपल्या जीवनातील अनेक प्रसंगाचे वर्णन मी दादाकडून ऐकले, त्यातून मला खूपच प्रेरणा मिळते. कठीण प्रसंगात आपल्या ध्येयापासून न ढळता अढळ विश्वास ठेवण्याची प्रेरणा मला स्फूर्ती देते. तात्याराव, माझ्या शाळेच्या हस्तपुस्तिकेच्या मलपृष्ठावर आपले ''जयोस्तुते'' हे गीत छापले आहे. तुचे भाषण, वक्तृत्व कौशल्य अफाट होते, अनेकांच्या मनात देशभक्तीची ज्योत पेटवून तुम्ही तुमच्या वक्तृत्वाने थक्क केले होते. त्याबद्दलची माहिती मी पुस्तकात वाचली आहे. अनेक इंग्रजी शब्दांना मराठीतून प्रतिशब्द देण्याचे महत्त्वपूर्ण काम आपण केले. यावरून मराठी भाषेवरील आपले प्रेम लक्षात येते. आपली विज्ञाननिष्ठा आदर्श मानून प्रगती साधता येते. यावर्षी स्वातंत्र्याचा

''अमृतमहोत्सव'' असल्याने आमच्या शाळेने समाजाच्या प्रगतीसाठी आवाश्यक असणाऱ्या ७५ विषयांचा अभ्यास करून अभ्यासपर्वाचे आयोजन केले होते. यावेळी आपल्या साहित्याचा आम्हाला खूप उपयोग झाला. 'शिक्षण विवेक' अंतर्गत काव्य अभिवाचन स्पर्धेसाठी आमच्या शाळेचा एक गट डेक्कन पुणे येथील अध्यासन केंद्रामध्ये गेला होता. या गटात मी देखील होतो तेथे आपल्या जीवनातील अनेक प्रसंगांची चित्रे मी पाहिली. मार्सेलीसची उडी, कोलूची शिक्षा अशी चित्रे पाहून माझे मन हेलावून गेले. तेथील आपले स्मारक पाहून आपल्या आठवणींना उजाळा मिळाला.

गेल्या ७५ वर्षात आपल्या मातृभूीने बऱ्याच चढउतारांचा सामना केला आहे. यशापयश अनुभवले, पण तुमच्या विचारांची सोबत आम्हाला नेहमीच प्रेरणा देत आहे. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात अनेक क्रांतिवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यामुळेच आम्ही आज स्वातंत्र्य अनुभवत आहोत याची आम्हाला जाणीव आहे. तात्याराव, तुम्ही लावलेलं स्वातंत्र्याचं हे रोपटं आज ७५ वर्षांचं झालं. आणि आता अनेक क्षेत्रातील यशाची गोड फळे त्याला लागली आहेत. हे सर्व पाहण्यासाठी आज तुम्ही हवे होतात, असं राहून राहून वाटतं. आपल्या मातृभूीचे नाव या जगाच्या पटलावर आदराने घेतले जाते, शिक्षण क्षेत्र, उद्योग क्षेत्र, संरक्षण क्षेत्र, निर्मिती क्षेत्र अशा अनेक क्षेत्रात आपण भरारी घेतलेली आहे आपल्या विज्ञाननिष्ठेच्या आधारावर स्वयंपूर्णतेकडे चाललेली आपल्या देशाची वाट उजळून निघत आहे.

मान्य आहे की, काही आव्हाने आजही देशासमोर आहेत पण आपण दाखवलेल्या मार्गाने जाताना ही आव्हाने पेलण्याची सशक्तताही डळमळत आहे.

''देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि आपण या देशाचे देणे लागतो'' हे तुमचे वाक्य अनेकांच्या मनावर कोरले गेले आहे. देशप्रेमासाठी योगदान देण्यास येथील युवक आजही उत्साहीत आहेत. हे आपण आम्हाला दिलेले विचाराचे फलित आहे, असे मला वाटते. आपल्यासह असंख्य क्रांतिकारकांविषयी कृतज्ञतेची भावना देशवासीयांमध्ये आहे. आणि म्हणूनच तुमचे नाव विचारले तरीही देश प्रेमाची लाट उस्फ ूर्तपणे उसळत आहे. अंदमानातील काळ्या पाण्याची शिक्षा आपली मार्सेलीसची उडी हे सारे माझ्या वाचनात आले, आणि माझी जीवनाकडे बघण्याची सकारात्मकता आणखीनच वाढली. मी त्या देशाचा, ज्या देशात क्रांतीसूर्य जन्मास आले असे म्हणताना माझा उर अभिमानाने भरून येतो. भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या क्रांतीचा महामेरू पेलणाऱ्या असंख्य क्रांतिकारकांना वंदन करून मी कृतज्ञता व्यक्त करतो. अशा वेळी मला सुरेश भटांच्या ओळी आठवतात.

*'हे माय भू तुझे मी फेडीन पांग सारे,*
*आणीन आरतीला हे सूर्य चंद्र तारे''*

**पुरुषोत्तम इनामदार**

***

# मातृमंदिर विश्वस्त संस्था

दरवर्षीप्रमाणे मातृमंदिर विश्वस्त संस्थेचे सर्व उपक्रम उत्साहात संपन्न झाले. त्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

**गुरुपौर्णिमा कार्यक्रम:**

गुरुपौर्णिमा हा मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा वर्धापनदिन! या दिवशी समर्पणपूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींना आदर्श समाज व विद्यार्थ्यांपुढे रहावा या उद्देशाने विविध पुरस्कारांने सन्मानित करण्यात येते, यंदाचा 'गुरुगौरव पुरस्कार' ज्येष्ठ तबला वादक पंडित रामदास पळसुले, 'अध्यापकोत्तम पुरस्कार' रत्नागिरीतील पंचकोषाधारीत गुरुकुलातील अध्यापक श्री. किरण जोशी, 'धन्य राधामाता पुरस्कार' सासवड मधील सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती माई पंडित तर, कार्यकर्ता ज्ञान प्रबोधिनीतील स्पर्धा परीक्षा केंद्राच्या प्रमुख वाच. सविताताई कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. रामभाऊ डिंबळे हे उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात रामभाऊ यांनी गुरुपौर्णिमा हा कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे त्या निमित्ताने, आपल्यातील चांगल्या गुणांची जोपासना करण्याचा संकल्प करायला हवा असे त्यांनी आवर्जून सांगितले.

**राज्यस्तरीय विद्यार्थी – अध्यापक निबंध स्पर्धा**

मातृमंदिर विश्वस्त संस्था आयोजित २४ व्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ २७ सप्टेंबर २०२२ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अभ्यागत म्हणून ज्येष्ठ संशोधक डॉ. मिलिंदजी वाटवे यांना आमंत्रित करण्यात आले होते. राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत चार जिल्ह्यांतील ३० शाळांमधून ३५५ विद्यार्थ्यांनी व २७ पालक आणि शिक्षकांनी सहभाग घेतला होता.

संस्थेतर्फे तपस्वी विद्वत् पुरस्कार डॉ. मिलिंदजी वाटवे यांना संस्थेचे अध्यक्ष मा. नितीनभाई कारिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रमुख पाहुणे मिलिंद वाटवे यांनी गेल्या ४० वर्षातील त्यांच्या विविध क्षेत्रातील संशोधनात्मक अनुभवांचे कथन केले. संशोधक होण्यास 'संशोधन वृत्ती' असणे महत्वाचे असे मत व्यक्त केले. तसेच संस्थेतर्फे देण्यात येणारा वेदाध्यायी पुरस्कार वेद अभ्यासक श्री. ऋषिकुमार व्यास यांना तर 'ज्ञानयोगी पुरस्कार' ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रातील क्रीडाकुल विभागात कार्यरत असणाऱ्या श्री. नरेंद्र जाधव यांना प्रदान करण्यात आला. वेद अभ्यासक श्री. ऋषिकुमार व्यास यांनी यजुर्वेदातील वेदमंत्रांचे पठण केले.

**पालखेड लढाई देखावा**

दिवाळीच्या सुट्टीत संस्थेतर्फे पालखेडच्या लढाईचा देखावा उभारण्यात होता. करण्यात आला. सुमारे २५० चौरस फुटातील युद्धभूमीवर ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून इतिहास प्रेमींनी पालखेडची लढाई अनुभवली. प्रसिद्ध इतिहास तज्ज्ञ श्री. मोहन शेटे यांच्या आवाजातील ध्वनीफित, विद्युत रोषणाई, युद्धभूमीची प्रतिकृती ही या देखाव्याची वैशिष्ट्ये ठरली. पहिल्या बाजीराव पेशव्याचा पराक्रम बघताना श्रोतृवर्ग हरखून गेला. सुमारे २००० विद्यार्थी, नागरिकांनी देखाव्यास भेट दिली.

**समूह गायन व अन्य स्पर्धा**

कोरोनाचा दोन वर्षाचा कालखंड वगळता गेली २८ वर्षे या स्पर्धा सुरू आहेत. यंदाच्या वर्षी स्पर्धातून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. २० जिल्ह्यातून ९० शाळातून सुमारे २५००० विद्यार्थी, अध्यापकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. १६ फेब्रुवारी रोजी स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. सावित्रीबाई फुले विद्यापीठातील मुक्त आणि दूरस्थ अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. वैभव जाधव आणि सृजन नृत्यालयाच्या संचालिका डॉ. मीनल कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

***

# चिपळूण विस्तार

सौर २३ चैत्र शके १९४५ रविवार दिनांक २३ व २४ एप्रिल २०२३ या दोन दिवशी माननीय संचालक यांची चिपळूण संपर्क केंद्रातील सदस्यांसोबत पूर्वनियोजित भेट झाली. माननीय संचालकांनी याप्रसंगी म ार्गदर्शन केले. ''युवक गटाचे काम करताना मनुष्यबळ, त्यांच्या क्षमता, त्यांच्याकडे उपलब्ध असणारा वेळ असा विचार करुन क्रीडा, कला, तंत्रज्ञान, पर्यावरण, मनाचे श्लोक अशासारखे लहान लहान अभ्यास गट करत या प्रबोधिनी प्रवेशाच्या दारांमधून आत येणाऱ्यांसाठी उपक्रमाशिवाय वेळ देणे आवश्यक आहे. कारण या सवांदातून स्नेहाचे, मैत्रीचे धागे निर्माण झाले की समूहगुण विकसन प्रशिक्षणाचा विचार करता येतो. सध्या चालू असणारे आरोग्यविषयक काम आणि हिरकणी प्रकल्प यासाठीची पद्धत समजून घ्यावी पण त्यामागचे आपले उद्दिष्ट, हेतू निश्चित करून आपली पद्धती निर्माण करावी. प्रबोधिनी विस्तार व आयुर्वेद प्रसार यासाठी हिरकणीसारखा प्रकल्प उपयुक्त ठरू शकेल.'' असे सुचवले आणि ''स्वतःच्या, आपल्या गटाच्या समूहगुण विकसन, कौशल्य विकसन, आणि किती लोकांपर्यंत पोहोचायचे याचा समतोल या तिन्हींचा विचार कार्यसंकल्पात व्हावा असे सुचवताना, फुलोरा कमी झाला तरी मुळं किती खोल गेली आणि फळं किती लागली असा विचार केंद्राच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरेल.'' असे मार्गदर्शन माननीय संचालकांनी केले.

**पुरक शिक्षण अंतर्गत...**

छोटे सायंटिस्ट या उपक्रमाच्या माध्यमातून या वर्षी विज्ञान अध्यापक संघासोबत (चिपळूण तालुका) एकत्रित काम सुरु झाल्यामुळे ओंकारदादा बाणाईत यांच्या उपस्थितीत विज्ञान शिक्षकांची कार्यशाळा, दुर्दम्य आशावादी पुस्तकांचे मोफत वितरण इत्यादी उपक्रम संपन्न झाले. या उपक्रमाच्या माध्यमातून आता चिपळूण, खेड, गुहागर तालुका येथीलही विज्ञान शिक्षक संपर्कात येत आहेत.

अग्रणी योजना तालुक्यातील पोफळी आणि युनायटेड चिपळूण अशा दोन शाळांमध्ये स्वयंप्रेरणेने चालू असलेला अग्रणी उपक्रम आणखी काही शाळांमध्येही चिपळूण संपर्क केंद्राच्या माध्यमातून सुरु करावा या उद्देशाने काही संपर्कात असणाऱ्या शाळांमधील निवडक निमंत्रित शाळांमधील अध्यापकांची एक दिवसीय कार्यशाळा श्रीरामदादा इनामदार यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. कार्यशाळेत उपस्थित अध्यापकांच्या सकारात्मक प्रतिसादानंतर निगडी केंद्राच्या युवक विभागाच्या सहकार्याने यातील ५० शाळांसाठी पुढील

शैक्षणिक वर्षात अग्रणी उपक्रम सुरु करण्यासाठीची पूर्वतयारी म्हणून चार दिवसीय नेतृत्व शिबिर घेण्यात आले.

**छोटे कलाकार**

या वर्षात छोटे कलाकार उपक्रमाअंतर्गत नवरात्रीच्या निमित्ताने महाविद्यालयीन युवती गटासाठी आणि चिपळूण मधील सर्व महिलांसाठी सौ.सायली मुळये-दामले यांचे नारदीय कीर्तन आयोजित करण्यात आले होते. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने चिपळूण तालुकास्तरीय आंतरशालेय समूहगायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या निमित्ताने विविध शाळातील संपर्कात आलेल्या विद्यार्थ्यांसाठी १३ एप्रिल ते १६ एप्रिल २०२३ या कालावधीत संगीत शिबिर घेण्यात आले. विद्यार्थ्यांना कलांगण संगमेश्वर आणि माखजन पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित कार्यक्रमात 'शुभ्र सुगंधित मने' हा सांगितिक कार्यक्रम करण्याची संधी देण्यात आली.

याशिवाय पूरक शिक्षणाचा भाग म्हणून काही शाळांमधून वाचक मेळावे, निरीक्षण कौशल्य सत्रे, छात्र प्रबोधन दिवाळी अंक व दिनदर्शिका वितरण, मातृभूमी परिचय शिबिरे, छात्रप्रबोधन आणि मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या विविध स्पर्धा, स्वयं अध्ययन कार्यशाळा इत्यादी उपक्रमांसाठी सहकार्य करण्यात आले.

अरुणाचल प्रदेशातील 'करुणा ट्रस्टच्या' माध्यमातून सामाजिक काम उभे करणाऱ्या आणि ज्ञान प्रबोधिनीच्या तेथील कामाच्या निमित्ताने नियमित संपर्कात असणाऱ्या मौशमीदिदी गोगई यांनी चिपळूण केंद्राला सदिच्छा भेट देऊन तेथील कार्यकर्त्यांशी हितगुज केले.

यावर्षी पासून DBJ महाविद्यालय चिपळूण येथे नारदीय कीर्तनाच्या निमित्ताने पुन्हा सुरु झालेला संपर्कातून निरीक्षण कौशल्य सत्रे, महाविद्यालयीन अध्यापक गटासाठी आणि विद्यार्थ्यांसाठी कोकण प्रतोद श्री.आदित्य शिंदे यांचे मार्गदर्शन सत्र, इत्यादी उपक्रम झाले.

चिपळूण संपर्क केंद्रातील कार्यकर्त्यांची प्रदीर्घ बैठक संगमेश्वर तालुक्यातील आंबेड खुर्द या गावातील 'अरुकांक्षा' या श्री.शांताराम लघाटे यांचे शेतघराच्या परिसरात संपन्न झाली.

हिरकणी या केंद्रात नव्याने सुरु झालेल्या उपक्रमाचे प्रशिक्षण, मेळावा असे स्वरुप असलेले पहिल्या टप्प्याचे सत्र पोफळी येथे संपन्न झाले यात १२ प्रशिक्षणार्थी माता पालक सहभागी होत्या.

***

# रौप्य महोत्सव

## क्रीडा आयुर्वेद परिषद

क्रीडाकुल रौप्य महोत्सवी वर्ष जसे सुरू झाले, तशी वेगवेगळया उपक्रमांची लगबग सुरू झाली. पंचवीस वर्षांचा हा महत्वाचा टप्पा. हा टप्पा क्रीडाकुलाच्या लौकिकाला साजेसा असाच साजरा व्हावा, ही प्रत्येक सदस्याच्या मनातली इच्छा होती. आणि याच प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर आकाराला आलेला उपक्रम म्हणजे दिनांक १८ व १९ फेब्रुवारी २०२३ रोजी संपन्न झालेली राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा आयुर्वेद परिषद.

क्रीडा आयुर्वेद परिषद घेऊया, अशी निश्चिती झाल्यानंतर दर बुधवारी सकाळी साडे आठ वाजता या विषयासाठी बैठक सुरू झाली. सुरुवातीच्या टप्प्यात केवळ मी, मेधाताई, देवळेकर सर असे तीनच सदस्य उपस्थित असायचो, हळूहळू आयुर्वेद प्रेमी व आयुर्वेद विषयातील तज्ज्ञ असे पालक महासंघातील वैद्य महेश पाटील, वैद्य निलेश शिर्के, वैद्य पराग पाटील, वैद्य अमृता देशपांडे, डॉ सौरभ देशमुख, डॉ बागेश्री देशमुख यांचा या ग्रुप मधे समावेश होत गेला आणि संकल्पना आकाराला येत गेली.

विषयांची निश्चिती, वक्त्यांची निश्चिती, सत्र निश्चिती, कार्यक्रम व निमंत्रण पत्रकाची आखणी या सारख्या विषयांवर तावून सुलाखून चर्चासत्रे पार पडली. आणि परिषदेची रूपरेषा नक्की झाली. क्रीडा क्षेत्रामध्ये आयुर्वेदाचे योगदान असणारे वेगवेगळे विषय केंद्रस्थानी ठेवून या परिषदेची रचना करण्यात आलेली होती.

आयुर्वेद व्यासपीठ, चंद्रशेखर आगाशे महाविद्यालय या दोन संस्थांसह आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेला आयुष मंत्रालयाचा लोगो सपोर्ट मिळविण्यासाठी प्रयत्न चालू होते. एकीकडे परिषदेचे नियोजन, वक्त्यांशी संपर्क, महाविद्यालयात संपर्क ही कामे तितक्याच नेटाने चालू होती. नियोजनासंदर्भात सरांसमवेत चर्चा चालू असताना एक दिवस अचानक आयुष मंत्रालयातून क्षेत्रभेटीसाठी व ओळखपत्र देण्यासाठी डॉ. गुरव यांची शाळेत प्रत्यक्ष भेट झाली, त्यांनी सांगितलेल्या कार्यालयीन बाबींची पूर्तता केली आणि अवघ्या दोन दिवसात आपल्या परिषदेला मंत्रालयाचा लोगो सपोर्ट प्राप्त झाला. उत्साहात भर टाकणाऱ्या या गोष्टीचा परिणाम म्हणून परिषदेची सत्यता आणि गांभीर्यही वाढले, सहभागी होणाऱ्यांचा प्रतिसाद वाढत गेला.

परिषदेतील सहभाग वाढावा या साठी आयुर्वेद व्यासपीठ संस्थेतील केंद्रीय स्तरावरील ज्येष्ठ वैद्यांसमवेत zoom च्या माध्यमातून सातत्याने संवाद होत होता, वैद्य निलेश शिर्के, वैद्य मेधा देवळेकर यांनी काही महाविद्यालयामध्ये वैयक्तिक संपर्क साधून भरीव प्रयत्न केले.

सोशल मीडियाची ताकद श्री. देवळेकर सरांनी आम्हाला अनुभवायला दिली. त्यांच्या योगदानामुळे या परिषदेची जाहिरात सामाजिक प्रसार माध्यमातून तसेच वेगवेगळ्या ११२० महाविद्यालयांना ईमेल द्वारे संपर्क करून करण्यात आली. याचा परिणाम म्हणून साडेआठ लाख वाचकांनी पंधरा दिवसांमध्ये या विषयाच्या page ला भेट केली, तर एकूण परिषदेसाठी संपूर्ण भारतातून प्रत्यक्ष उपस्थिती २०४ वैद्यांची होती. याव्यतिरिक्त १५० जणांनी युट्युब वरती तर ८० जणांनी फेसबुक पेज वरती या परिषदेमध्ये सहभाग नोंदविला.

शेवटच्या तयारीच्या टप्प्यात क्रीडाकुल सदस्यांची गट हे शिवधनुष्य पेलण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी सज्ज झाला होता. अत्यंत मनापासून, तळमळीने, बारकाईने नियोजन करत परिषदेची तयारी अंतिम टप्प्याम ध्ये आली.

क्रीडाकुल विभागातील सर्व सदस्य, पालक महासंघातील वैद्य, माजी विद्यार्थी गटातील वैद्य, पालक या सर्वांच्या सहकार्याने ही परिषद समाधान कारकरित्या पार पडली.

या परिषदेने खूप मोठा अनुभव गाठीशी बांधता आला. एकाच वेळी वेगवेगळ्या आघड्यांवर काम करण्याचा अनुभव, परिषद पूर्ण होईपर्यंत चाललेली मनात असलेली धाकधूक, अनेक वैद्यांशी संवादाची संधी, ज्येष्ठ वैद्यांची पाठीवर कौतुकाची थाप, सहकाऱ्यांनी केलेली आश्वासक आणि भरघोस मदत, आदरणीय देवळेकर सरांनी दाखवलेला विश्वास, संपूर्ण केंद्रातील सदस्यांचा परिषद यशस्वी व्हावी म्हणून चाललेला आटापिटा; हे सगळेच अनुभव मनावर कायमचे ठसले आहेत.

गेली २५ वर्षे क्रीडाकुल विभागात होत असलेला आयुर्वेदाचा अवलंब हा आयुर्वेद क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या समोर यावा, या प्रक्रियेवर विचार मंथन घडून क्रीडाक्षेत्रातील खेळाडूंच्या आरोग्यासाठी ठोस उपाययोजना निश्चित व्हाव्यात, या उपाययोजनांना लोकाश्रया समवेत राजाश्रय प्राप्त व्हावा हा हेतू मनात ठेवून केलेला हा छोटासा प्रयत्न. हा प्रयत्न म्हणजे पूर्णविराम नसून स्वल्पविराम आहे. भविष्यात अश्याच खेळाडूच्या आरोग्यासाठी अनेक उपाययोजना करण्याचे बळ मिळो, हीच भगवान धन्वंतरी चरणी प्रार्थना......

**वैद्य दीप्ती धर्माधिकारी**
(क्रीडाकुल वैद्य)

***

# खेळाडू विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र

वर्ष २०२२-२३ हे क्रीडाकुल साठी आणि माझ्यासाठी खूप महत्त्वपूर्ण वर्ष होते. आम्ही क्रीडाकुल रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करत होतो आणि १९ वर्ष मी या विभागात मानसशास्त्र प्रकल्पात काम करत आहे ही गोष्ट माझ्यासाठी खूप अभिमानाची आहे.

क्रीडाकुलमध्ये खेळाडूची उत्तम खेळाडू होण्यासाठी मानसिक जडण घडण होण्यासाठी, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, खेळात यशस्वी होण्यासाठी विविध मानसशास्त्रीय संकल्पनांवर आधारित सत्र घेतली जातात. यामध्ये प्रत्येक वर्गावर असणारे मानसशास्त्राचे तास. इयत्ता पाचवी ते दहावी साठी वेगवेगळे विषय ठरवून घेतलेले होते. यामध्ये विविध बौद्धिक खेळ घेणे, यातून स्वगुणांची ओळख, कल्पना विकसन, शब्दसंग्रह वाढवणे, भावना परिचय, स्वावलंबन हे विषय छोट्या गटासाठी तर विजयी वृत्ती, ध्येय निश्चिती, प्रोत्साहन, सकारात्मक स्वसंवाद यासारखी बौद्धिक कौशल्ये आणि स्पर्धादरम्यान यांचा वापर करत अपेक्षित यश प्राप्ती कशी करायची हे इ ८ वी ते १० वीच्या खेळाडूंना शिकवले जाते. विविध खेळाडूंचे चरित्र वाचन, उत्तम अभ्यास सवयी, खेळातून विकसित होणाऱ्या विविध मानसिक क्षमता या विषयांचाही अंतर्भाव या सत्रांमध्ये केला जातो. खेळाडू विद्यार्थ्यांना खेळातील उत्तम यश मिळवण्यासाठी विशेष मानसिक प्रशिक्षण दिले जाते अंत:प्रेरणा ओळखून किंवा आव्हान स्वीकारून आपली खेळावरची निष्ठा दृढ करणे ही यशस्वी खेळाडूच्या वृत्तीघडण प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट. ही प्रक्रिया निरंतर चालत असते आणि यासाठी खेळाडूचे वृत्तीघडण होणे खूप महत्त्वाचे असते. यासाठी जाणीवपूर्वक खेळाडूंना याचे प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अपेक्षित बदल घडून येतात. असे विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावर अतिशय उत्तम कामगिरी करत पदक प्राप्त करतात. काही विद्यार्थ्यांच्या बाबतीत हे बदल खूप लवकर दिसून येतात तर काही खेळाडू विद्यार्थ्यांच्या बाबतीमध्ये हे बदल लवकर दिसून येत नाहीत अशा खेळाडूंच्या बाबतीत सत्रांची वारंवारिता वाढवावी लागली. त्याच बरोबर प्रशिक्षक व पालक यांच्याशी संवाद साधला जातो. प्रशिक्षकांशी संवाद साधताना खेळाडूचे व्यक्तिमत्त्वातले घटक कसे आहेत व यामुळे एकूणच प्रशिक्षणाची पद्धती काय असावी? खेळाडूंशी मैदानावर कशा पद्धतीने संवाद साधावा? तसेच काही वेळेला सरावानंतर त्याच्याशी अनौपचारिक गप्पा मारत त्याच्या क्षमतांची ओळख त्याला कशी करून द्यावी याबाबत मार्गदर्शन केले जाते. तर पालकांशी संवाद साधताना पालक म्हणून त्यांनीही आपले वर्तन कसे ठेवावे? मुलांशी सकारात्मक संवाद

कसा साधावा, त्याविषयी संवाद साधला. प्रामुख्याने अभ्यास हा विषय सोडून त्यांच्याशी गप्पा मारणे काही गोष्टींवर चर्चा करणे यामुळे या वृत्तीघडणीमध्ये चांगल्या प्रकारे मदत होत गेली आणि अपेक्षित बदल खेळाडू विद्यार्थ्यांमध्ये दिसून येण्यास सुरुवात झाली.

प्रत्येक स्पर्धेमध्ये प्रत्येक सामन्यांमध्ये प्रतिस्पर्धी खेळाडूपेक्षा अधिक चांगली कामगिरी करणे, आपल्या क्षमता सिद्ध करणे ही प्रत्येक खेळाडूची मूलभूत जबाबदारी असते. आणि ती आपण पार पाडली तरच आपण विजयी होण्याची शक्यता असते. खेळामध्ये यश प्राप्तीसाठी आपली गुणवत्ता टिकून ठेवण्यासाठी, खेळाशी निष्ठा कायम राहण्यासाठी आणि त्याला योग्य मेहनतीची जोड देऊन विजयश्री खेचून हा आणण्यासाठीचा विश्वास खेळाडू विद्यार्थ्यांना मानसिक प्रशिक्षणातून दिला. खेळाडू जसा वरच्या दर्जाच्या स्पर्धांमध्ये भाग घ्यायला लागतो तसे त्याचे अपयशाशी सामना करणे फार जड असते. आपल्या ध्येयाची असलेली बांधिलकी लक्षात घेऊन गुणवत्तेला निष्ठेची आणि अविश्रांत मेहनतीची जोड दिली तर आपण सुवर्णपदक मिळवू शकतो हे स्वप्न सत्यात उतरवायला मानसिक प्रशिक्षणाची खेळाडूंना नक्की मदत होते.

मानसिक प्रशिक्षणाबरोबर विविध सायकॉलॉजिकल ऑपरेटर्सचाही वापर केला जातो. खेळाडूंचा खेळ प्रकार, स्पर्धेचा स्तर बघून ऑपरेटर निश्चिती केली जाते. या वर्षी काही खेळांच्या बाबतीत थोडासा बदल करून बघितला. ह्या ऑपरेटर्सच्या मदतीने खेळाडूंना मार्गदर्शन करताना एकाच दिवसात या खेळाडूची दोन – दोन सत्र घेतली आणि त्यामुळे खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर उत्तम कामगिरी करण्यास मदत झाली.

थोडक्यात असे म्हणता येईल की खेळातील उत्तम यशासाठी खेळाडूंची मानसिकता ही 4C CONTROL-COMMITMENT-CHLLENGE-CONFIDENCE.. मध्ये घडविणे अंत्यत महत्वाचे असते.

**सौ. आरती खोत.**
क्रीडाकुल मानसतज्ज्ञ
क्रीडाकुल

***

**अभिनंदन –** समर्थ भारत अभियान आयोजित, मनाचे श्लोक पाठांतर अंतिम स्पर्धेमध्ये इयत्ता ६क मधील चि.स्वर पत्तेवार आणि इयत्ता ६ब मधील चि.विश्वराज निघोट यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले आहे.

# अतिथी देवो भव !

ज्ञान प्रबोधिनीचे निगडी केंद्र हे परिसरातील  सर्वांसाठी व्यक्तिमत्त्व विकासाचे एक केंद्र व्हावे हे स्वप्न कै.आ.भाऊंनी पाहिले होते. १४ वेगवेगळ्या विभागांच्या माध्यमातून होत असलेले येथील  काम २२०० हून अधिक विद्यार्थी, २०० अध्यापक व अन्य सदस्य, ५०० युवक - युवती, हजारोंच्या संख्येने पालक, अनेक माजी विद्यार्थी इथे अनुभवत आहेत.

नवीन शैक्षणिक धोरण, पंचकोश शिक्षण प्रणालीचा प्रचार प्रसार, क्रीडाकुल आयोजित राष्ट्रीय परिषद, JPF चे काम करणारे कार्यकर्ते या सारख्या अनेक कारणांनी महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अनेक मान्यवरांनी, शिक्षणात काम करु इच्छिणाऱ्या अनेक संस्थाचालकांनी, प्रगतशील अध्यापकांनी, दिल्ली सरकारच्या अध्यापक व अधिकाऱ्यांच्या गटाने यंदा निगडी केंद्राला भेट दिली. यातील दिल्ली अधिकाऱ्यांच्या भेटीबद्दल तपशीलात पुढे लिहित आहे.

## पार्श्वभूमी

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने प्रशाला व नवनगर विद्यालयाच्या अध्यापाकांचा गट दिल्ली येथे तेथील सरकारी शाळा व शिक्षणात महत्त्वाचे काम करणाऱ्या अन्य खाजगी शाळा, शिक्षण तज्ज्ञांच्या भेटीसाठी गेला होता. या भेटीच्या निमित्ताने तेथील शिक्षण सहाय्यक संचालक सौ. निरुपमाताई अभ्यंकर यांचा आपल्या गटाशी परिचय झाला. निरुपमाताई निवृत्तीनंतर ताई पुण्यात स्थायिक झाल्या. मागच्या काही वर्षात विविध निमित्तानी ताईंसोबतचा आपला संपर्क अधिक पक्का झाला. निरुपमाताईंच्या पुढाकारातून दिल्ली सरकारच्या सरकारी शाळांमध्ये काम करणारा निवडक ३० अध्यापकांचा गट व दिल्ली सरकारच्या शिक्षण खात्यातील सर्व उच्च पदाधिकाऱ्यांची निगडी केंद्राला अनुक्रमे जानेवारी व एप्रिल महिन्यात भेट झाली.

### Mentor - Teachers Group

दिल्ली सरकार दर दोन वर्षांसाठी २०० तरुण, उत्साही, प्रयोगशील शिक्षकांची निवड विशेष प्रशिक्षणासाठी करते. हे २०० अध्यापक दिल्ली मधील सर्व सरकारी शाळांचे mentor (मार्गदर्शक) म्हणून काम करतात. यातील ३० अध्यापाकांचा गट ३० जानेवारी २०२३ ते १ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत प्रबोधिनी भेटीसाठी आला होता. पहिला दिवस सर्व अध्यापकांनी ज्ञान प्रबोधिनी पुणेला भेट दिली. या भेटीतून मुख्यतः

प्रबोधिनीची ओळख त्यांनी करुन घेतली. प्रशालेचा बुद्धिमंतांच्या शिक्षणाचा प्रयोग त्यांनी समजून घेतला.

निगडी केंद्राच्या भेटीमध्ये पहिल्या दिवशी मुख्यतः सध्या काम करत असलेल्या विभागांची उद्दिष्टे, महत्वाची वैशिष्ट्ये, काही उपक्रम आणि त्यांच्या प्रक्रिया याची मांडणी प्रत्येक विभागाचे प्रमुख व सहविचार समितीच्या सदस्यांनी केली होती. दुसऱ्या दिवशीच्या भेटीमध्ये परिपाठ सर्व अध्यापकांनी अनुभवला व विद्यार्थ्यांसोबत मुक्त संवाद साधला. क्रीडाकुल व गुरुकुल या दोन्ही शैक्षणिक प्रयोगांना तपशिलात भेटी झाल्या होत्या, यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक तत्त्वज्ञान, उपक्रमांची मांडणी, रचना, विद्यार्थी नोंदी, यश, विद्यार्थी संवाद हे झाले होते.

**शिक्षण खाते, दिल्ली सरकार**

जानेवारीमध्ये आलेल्या गटाच्या प्रतिसादानंतर दिल्ली सरकार च्या शिक्षण खात्याचे संचालक श्री. हिमांशू गुप्ता व त्यांच्या अन्य ५ सहकारी अधिकाऱ्यांची भेट निगडी केंद्राला झाली. यावेळी या पाहुण्यांचे स्वागत बर्ची नृत्याने करण्यात आले. प्रबोधिनीचे शैक्षणिक मॉडेल काय आहे याची प्रथम मांडणी ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणेचे प्राचार्य वाचस्पती मिलिंद नाईक सर यांनी केली. गुरुकुल व क्रीडाकुल बद्दलची तपशीलवार मांडणी त्यावेळी अधिकाऱ्यांसमोर करण्यात आली. प्रबोधिनीचे संचालक आ. गिरीशराव बापट यांच्यासोबतच्या संवादाने भेटीचा शेवट झाला.

**परिणाम**

या भेटींचा परिणाम म्हणून प्रबोधिनी व दिल्ली सरकार यांच्यामध्ये विविध उपक्रम, अध्यापक प्रशिक्षण यासाठी साहचर्याच्या रचना होऊ शकतात हे लक्षात आले व तसा संवाद सुरु झाला. प्रबोधिनीचे काम राष्ट्रीय आणि शासकीय पातळीवर प्रभावीपणे पोहचाविण्यासाठीचे एक माध्यम तयार झाले. येत्या वर्षभरामध्ये असे अनेक कार्यक्रम दोन्ही संस्था एकत्र मिळून करतील असे वातावरण यानिमित्ताने तयार झाले असे वाटते.

आपले काम आपल्या मातृभाषेत तसेच हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये देखील तितक्याच प्रभावीपणे मांडण्यासाठी येणाऱ्या मर्यादा व त्यासाठीचे आवश्यक प्रशिक्षण यासाठीची चर्चा केंद्रस्तरावर करण्यात आली, त्याला आवश्यक कार्यवाही देखील सुरु झाली.

**श्रीराम इनामदार**
अध्यापक

***

# JNANA PRABODHINI NAVNAGAR VIDYALAY

| Donor's Name | Amount |
|---|---|
| 4 | 5 |
| Shri Nitin Ratilal Karia | 2,500,000.00 |
| Matrumandir Vishwasth Sanstha | 6,500,000.00 |
| Prabodh Arth Sanchay Pvt Ltd | 1,368,000.00 |
| Kavita Swapnil Bagul | 500,001.00 |
| Icon Turnkey Ventures Llp | 500,000.00 |
| Shri Ajit Narayan Kanitkar | 500,000.00 |
| Prabodh Arth Sanchay | 500,000.00 |
| Fleetguard Filters Pvt Ltd | 500,000.00 |
| Raviraj Hi Tech Pvt Ltd | 221,000.00 |
| Pradeept Bharat Foundation | 109,000.00 |
| Devidas Baban Tapkir | 100,000.00 |
| Smt Geeta Chandrakant Doshi | 100,000.00 |
| Durgadevi Chartable Trust | 100,000.00 |
| Shri Rahul Anil Darveshi | 55,000.00 |
| Rameshwar Hari Pakhare | 51,000.00 |
| Seventh Heaven Foodwork Pvt Ltd | 51,000.00 |
| Deepika Vijay Joshi | 50,000.00 |
| Alka Vasant Narkhede | 50,000.00 |
| Santosh Babaji Bhor | 50,000.00 |
| Uma Constructions | 50,000.00 |
| Anant Vishwnath Joshi | 100,000.00 |
| Sahyadri Prakashan Pune | 50,000.00 |
| Kishor Dattatray Deshmukh | 40,000.00 |
| Om Harihareshwar Mitra Mandal | 30,000.00 |
| Vidya Devendra Udas | 30,000.00 |
| Deepak Vasant Narkhede | 25,000.00 |
| Vinaya Vaze | 25,000.00 |
| Bhagyesh Kulkarni | 25,000.00 |
| Vishkha Rakesh Pandit | 25,000.00 |
| Shaligram Realty Llp | 22,500.00 |

| | |
|---|---|
| Anil Ramchandra Gurav | 21,000.00 |
| Kores India Ltd | 21,000.00 |
| Rck & Co | 21,000.00 |
| Shree And Shree Udyog | 21,000.00 |
| Gayatri Arvind Wagaj | 21,000.00 |
| Janhavi Ashok Kamathe | 20,000.00 |
| Sharp Engineers | 16,500.00 |
| Maruti Shamrao Bhosale | 15,000.00 |
| Shri Aniruddha Kulkarni | 14,000.00 |
| Sumod Sudhakar Khot | 11,151.00 |
| Manoj Vasant Deolekar | 11,111.00 |
| Kiran Dattatray Deshmukh | 11,000.00 |
| Nirupama Abhyankar | 21,100.00 |
| Shri Sanket Manojkumar Shingavi | 11,000.00 |
| Shri Pankajkumar M Chapolikar | 11,000.00 |
| Anant Vishwanath Joshi ( Huf) | 21,000.00 |
| Rahul Ganesh Sancheti | 11,000.00 |
| Gayatree Anant Sewak | 11,000.00 |
| Vasant Terwadkar | 10,001.00 |
| Prakash Vasudeo Kathe | 10,000.00 |
| Swapnil Subhash Pattewar | 10,000.00 |
| Rishi Rajendra Manohar | 10,000.00 |
| Jnana Prabodhini Sevak Sahkari Patsanstha | 10,000.00 |
| Shree Samarth Mitra Mandal | 10,000.00 |
| Gayatri Ravindra Dabage | 10,000.00 |
| Smt Radhika Yashwant Mithbha-kare | 10,000.00 |
| Dattatray Shivaji Kad | 10,000.00 |
| Pravin Hiraman Darshale | 10,000.00 |
| Neha Dighe | 10,000.00 |
| Rahul Narayan Wani | 10,000.00 |
| Sagar Uttam Kalate | 10,000.00 |

| | |
|---|---|
| Yogita Gore | 10,000.00 |
| Chaitanya Pharmaceuticals Pvt Ltd | 10,000.00 |
| Nagmani Murthi Katta | 10,000.00 |
| Madhuri Baliram Sawant | 9,000.00 |
| Shri Dilip Kanade | 8,829.00 |
| Shree Dhootpapeshwar Ltd | 17,000.00 |
| Rajashree Ozarde | 8,000.00 |
| Yashwant Laxman Limaye | 7,500.00 |
| Pradhikaran Jeyshtha Nagarik Sangh | 7,000.00 |
| Mahesh Shantaram Pawar | 7,000.00 |
| Dattatray Shivaji Kad | 6,200.00 |
| Shri Alok Madhav Ingale | 6,000.00 |
| Anuja Abhijit Soman | 6,000.00 |
| Jayashree Mukund Sharangdhar | 5,501.00 |
| Sarika Sachin Balawade | 5,000.00 |
| Shamal Shrikant Khaladkar | 5,000.00 |
| Yogeshchandra Prabhakar Deolalkar | 5,000.00 |
| Yogita Anil Gawhale | 5,000.00 |
| Shri Umesh Rameshchandra Muley | 5,000.00 |
| Prithveeraj Amritrao Bhosale | 5,000.00 |
| Rck & Co | 5,000.00 |
| Vanashree Ayurved Aushadhalay | 5,000.00 |
| Shri Yogeshwar Prabhakar Deolalkar | 5,000.00 |
| Shri Santosh Kondiba Gore | 5,000.00 |
| Parashuram Tukaram Patil | 5,000.00 |
| Atul Yashwant Nadhe | 5,000.00 |
| Anjali Sham Bilurkar | 5,000.00 |
| **Total Donation During The Year** | **14,830,394.00** |

ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशनने (JPF) "Sponsor A Child" या उपक्रमाच्या अंतर्गत २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात आर्थिक परिस्थितीमुळे शुल्क भरू न शकलेल्या विद्यार्थ्यांना मदत म्हणून रु.१३,००,५००/- एवढी रक्कम शुल्क स्वरूपात मिळाली. यामध्ये ६९ विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता आला. ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशनने दिलेल्या या देणगीसाठी फाऊंडेशनचे मन:पूर्वक धन्यवाद!